सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८**

# महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६

**(दिनांक १३ नोव्हेंबर २००६)**

# Maharashtra Act No. XXXVIII of 1976
# The Maharashtra Irrigation Act, 1976

***(As modified upto 13th November 2006)***

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[किंमत रु. १६ ]

# महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे पृष्ठ


### भाग एक

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ ... ... ... ... १

२. व्याख्या ... ... ... ... १

३. कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्राखालील जमिनी ... ... ... ५

४. ओलिताची जमीन ... ... ... ६

#### पाटबंधारे क्षेत्रे

५. राज्याच्या पाटबंधारे क्षेत्राची विभागणी ... ... ... ... ६

### भाग दोन

#### कालवा अधिकारी, त्याचा कार्यभार व अधिकार

६. कालवा अधिकारी ... ... ... ... ६

७. पाटबंधाऱ्यांच्या बाबींसंबंधातील मुख्य नियंत्रक प्राधिकार ... ... ... ७

८. कालवा अधिकाऱ्यांची नेमणूक ... ... ... ... ७

९. कालवा अधिकारी दुय्यम असणे ... ... ... ... ७

१०. कालवा अधिकाऱ्यांमध्ये कामे वाटून देण्याचा अधिकार ... ... ... ७

### भाग तीन

#### कालवे बांधणे व ते सुस्थितीत ठेवणे

#### कालव्याच्या प्रयोजनासाठी पाण्याचे उपयोजन

११. कालव्याच्या प्रयोजनासाठी किंवा पाण्याचे नियमन, पुरवठा किंवा साठा यासाठी पाणी-पुरवठ्याचे उपयोजन करताना अधिसूचना काढणे. ८

#### जमीन, इत्यादींवर प्रवेश करण्याचा अधिकार

१२. पाण्याचे अशा रीतीने उपयोजन करण्याच्या प्रयोजनासाठी कालवा अधिकाऱ्यांचे अधिकार ८

१३. चौकशीसाठी प्रवेश करणे ... ... ... ... ८

१४. पाणीपुरवठ्याची तपासणी व विनियमन करण्याचे अधिकार ... ९

१५. दुरुस्त्यांसाठी व अपघातांना प्रतिबंध करण्यासाठी प्रवेश करण्याचा अधिकार ... ९

१६. पुरांचे नियमन करण्यासाठी दारांची उघडझाप करण्याचा कालवा अधिकाऱ्यांचा अधिकार ... ९

१७. इमारत इत्यादींच्या ताबाधारकास नोटीस देणे ... ... १०

#### कालवा ओलांडणी

१८. कालवा ओलांडण्याच्या साधनांची सोय करणे व जलनिस्सारणातील अडथळा टाळणे ... १०

अनुक्रमणिका--चालू

उद्देशिका

कलमे | पृष्ठ

**जलनिस्सारणास होणारे अडथळे दूर करणे**

१९. समुचित प्राधिकरणास विवक्षित सीमांच्या आत नद्या, इत्यादींचे अडथळे निर्माण होण्यास प्रतिषेध करता येईल. १०

२०. अडथळा निर्माण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कालवा अधिकारी आदेश देऊ शकेल १०

२१. कालवा अधिकारी अडथळा दूर करून घेऊ शकेल १०

**जलनिस्सारणाची बांधकामे**

२२. जलनिस्सारणाची बांधकामे आवश्यक असतील तेव्हा समुचित प्राधिकरणास योजनेची अंमलबजावणी करण्याचा आदेश देता येईल ११

**भाग चार**

**शेतातील पाट**

**शेतातील पाट बांधणे**

२३. शेतातील पाट बांधणे ... ... ... ११

२४. शेतात नवीन पाट बांधण्यासाठी कालवा अधिकाऱ्याकडे अर्ज करणे ... ११

२५. शेतातील पाट बांधण्याची कार्यपद्धती ... ... ... १२

२६. शेतातील पाट बांधल्यानंतरची कार्यपद्धती ... ... ... ... १२

**शेतातील पाटांच्या मालकांचे हक्क व त्यांच्यावरील आबंधने**

२७. शेतातील पाटाच्या मालकावरील आबंधन ... ... ... ... १२

२८. अन्य व्यक्तीने मालकाबरोबर व्यवस्था करणे ... ... ... १३

२९. कालवा अधिकाऱ्यास चौकशीनंतर पुरवठ्याचा प्राधिकार देता येईल किंवा अर्जदार संयुक्त मालक असल्याचे घोषित करता येईल १३

३०. पाटाकरिता संपादित केलेल्या जमिनींचा अन्य प्रयोजनासाठी उपयोग करण्यास मनाई आणि शेतातील पाटामध्ये फेरफार करण्यास मनाई १३

३१. मालक शेतातील पाटाचे काम पार पाडण्यात किंवा पाट दुरुस्त करण्यात कसूर करील तर कालवा अधिकाऱ्यास ती कामे पार पाडता येतील १३

३२. शेतातील पाट सुस्थितीत ठेवण्यात कसूर केल्यास पाणीपुरवठ्याची मंजुरी रद्द करणे १४

३३. शेतातील पाटाचा उपयोग करणाऱ्या व्यक्तीने दुरुस्तीच्या खर्चाचा हिस्सा देणे ... १४

**शेतातील पाट सक्तीने बांधण्यासाठी योजना**

३४. शेतातील पाट सक्तीने बांधण्यासाठी योजना ... ... ... १४

३५. अंतिम योजनेखाली शेतातील पाट बांधणे धारकांवर बंधनकारक असणे ... ... १५

## अनुक्रमणिका—चालू

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ३६. | कलम १३ च्या तरतुदी लागू असणे ... ... ... | १५ |
| ३७. | शेतातील पाट बांधण्यासंबंधी जमीनधारकांस व ताबाधारकांस नोटीस ... ... | १५ |
| ३८. | कालवा अधिकाऱ्यास शेतातील पाट बांधण्यास प्राधिकृत करण्याचा अधिकार ... | १५ |
| ३९. | शेतातील पाट बांधून पूर्ण झाल्याचे परिणाम ... ... ... | १६ |
| ४०. | शेतातील पाट बांधण्याचा खर्च, इत्यादी देण्याची पद्धती ... ... ... | १६ |
| ४१. | सार्वजनिक हितासाठी योजना तयार करण्याकरिता निदेश देण्याचा समुचित प्राधिकरणाचा अधिकार | १६ |
| | **शेतातील पाटासंबंधीच्या विवादांबाबत समझोता** | |
| ४२. | शेतातील पाटांमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे परस्परांतील हक्क व दायित्वे यासंबंधीच्या विवादांबाबत समझोता. | १६ |
| ४३. | सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ या अन्वये बांधलेल्या शेतातील पाटांना या भागाच्या तरतुदी लागू नसणे | १७ |
| | **भाग पाच** | |
| | **भूमि संपादन** | |
| ४४. | कालवे आणि शेतातील पाट यांसाठी जमीन संपादन करणे ... ... | १७ |
| | **भाग सहा** | |
| | **पाणीपुरवठा** | |
| | **प्रकरण एक** | |
| | **पाणीपुरवठ्यासंबंधीच्या सर्वसाधारण तरतुदी** | |
| ४५. | प्रकरण दोन ते पाचखालील पाणीपुरवठ्यास हे प्रकरण लागू करणे ... ... | १८ |
| ४६. | कालव्याच्या पाणीपुरवठ्याची पद्धत ; किमान पाणीपट्टी आकारण्याचा अधिकार ... | १८ |
| ४७. | कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील जमिनींमध्ये विनिर्दिष्ट मुदतीत पेरणी करणे, लावणी करणे किंवा पिकांचे उत्पादन काढणे या गोष्टींचे नियमन करण्याचा समुचित प्राधिकाऱ्याचा अधिकार | १९ |
| ४८. | पिकांच्या क्षेत्रावर कमाल मर्यादा निश्चित करण्याचा अधिकार ... ... | २० |
| | **पुरवठ्यासंबंधी तरतुदी** | |
| ४९. | पाणीपुरवठा बंद करण्याचा अधिकार ... ... ... | २० |
| ५०. | पाणीपुरवठ्याचा कालावधी ... ... ... | २१ |
| ५१. | पाणीपुरवठ्याचा करार हा, ज्या मालमत्तेच्या बाबतीत पुरवठा करण्यात येत असेल अशा मालमत्तेबरोबरच हस्तांतरणीय असेल, इत्यादी. | २१ |

अनुक्रमणिका—चालू

उद्देशिका


कलमे पृष्ठ

**प्रासंगिक पट्टी**

५२. अनधिकृतरीतीने पाण्याचा वापर करणारी व्यक्ती ओळखता येत नसेल त्यावेळचे दायित्व. . . . २२

५३. पाणी वाहून वाया जात असेल अशा वेळेचे दायित्व . . . २२

५४. शास्तींसह आकार वसुलीयोग्य असणे . . . २३

**पाझरणे व गळती याबद्दल पट्टी**

५५. पाझरणाऱ्या पाण्याचा फायदा मिळणारी जमीन पाणीपट्टीस पात्र असणे . . . २३

५६. पाझरलेले पाणी सिंचनेतर प्रयोजनांसाठी वापरण्याबद्दल पाणीपट्टी बसविणे . . . २३

**प्रकरण दोन**

**अर्ज केल्यावर पाणीपुरवठा करणे**

५७. पाणीपुरवठ्याचे विनियमन . . . २३

५८. पाणीपुरठ्यासाठी अर्ज करणे . . . . . . २४

**पुरवठा पट्टी**

५९. कालव्यातील पाण्याचा पुरवठा केल्याबद्दल पट्टी निर्धारित करणे . . . . . . २४

**प्रकरण तीन**

**घनपरिमाण आधारावर पाणीपुरवठा**

६०. घनपरिमाण आधारावर पाणीपुरवठा करणे आणि पाणी समिती स्थापन करणे . . . २५

**प्रकरण चार**

**सिंचन करारानुसार पाणीपुरवठा**

६१. सिंचन करार करण्याचा अधिकार . . . . . . . . . . . . २६

६२. सिंचन कराराची व्याप्ती . . . . . . . . . . . . २६

६३. करार केव्हा करता येईल . . . . . . . . . . . . २७

६४. धारकाव्यतिरिक्त इतर ताबाधारकाच्या ताब्यात जमीन असेल त्याबाबतीत करारास संमती आवश्यक असणे. २७

६५. करार करण्यापूर्वी नोटीस प्रसिद्ध करणे . . . . . . . . . . . . २७

६६. उपसा करून सिंचित होणाऱ्या जमिनीचा समावेश करणे . . . . . . २८

६७. पाणीपुरवठ्यासाठी आकार . . . . . . . . . . . . २८

६८. सिंचन करारामुळे पडणारे दायित्व . . . . . . २८

६९. परस्पर संमतीने करार रद्द करणे . . . . . . २९

७०. शेतातील पाट सुस्थितीत ठेवण्यात कसूर केल्याबद्दल करार रद्द होणे . . . . . . २९

७१. करार रद्द करण्याचा सर्वसाधारण अधिकार . . . . . . . . . २९

अनुक्रमणिका—चालू

उद्देशिका


कलमे — पृष्ठ

प्रकरण पाच

योजनेखालील पाणीपुरवठा

७२. योजनेखालील पाणीपुरवठा ... ... ... २९

७३. योजना अंमलात येणे ; योजनेत फेरबदल करण्याचा अधिकार ... ३०

७४. योजना अंमलात आणण्यासाठी पाणी समिती नेमणे व तिचे अधिकार ... ३०

भाग सात

भरपाई देणे

भरपाईची मागणी केव्हा करता येईल

७५. निश्चित करता येण्याजोग्या भरीव नुकसानीच्या प्रकरणात भरपाई देणे ... ... ३२

७६. मागण्यांवरील मुदत मर्यादा ... ... ... ... ३२

संक्षिप्त निर्णय

७७. जमीन, इत्यादींवर प्रवेश केल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई ... ३२

७८. पाणीपुरवठ्यात खंड पडल्याबद्दल भरपाई ... ... ३३

७९. मागील दोन कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये दिलेला भरपाईच्या रकमेबाबतचा निर्णय निर्णायक असणे. ३३

रीतसर अभिनिर्णय

८०. विवक्षित प्रकरणांत भरपाईच्या मागण्यांबाबत नोटीस ... ... ३३

८१. मागण्या जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करणे ... ... ... ३३

८२. भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या तरतुदींनुसार जिल्हाधिकाऱ्याने काम करणे ... ३३

८३. भरपाई निश्चित करताना बाजार मूल्यातील घट विचारात घेणे ... ... ३३

८४. भरपाई केव्हा देय होईल ... ... ... ३४

जमीन महसूल व खंड कमी करणे

८५. पाणीपुरवठ्यात खंड पडल्यामुळे मागणी केलेला महसूल कमी करणे ... ... ३४

८६. पाणीपुरवठ्यात खंड पडल्यामुळे कनिष्ठ धारकाचा खंड कमी करणे आणि पाणीपुरवठा पूर्ववत चालू झाल्यावर अशा खंडात वाढ होणे ३४

८७. या भागाच्या तरतुदी कलम ४४ अन्वये केलेल्या संपादनास लागू नसणे ... ... ३४

भाग आठ

पाणीपट्टीची वसुली

८८. पाणीपट्टीच्या रकमा देणे व त्यांची वसुली ... ... ... ... ३४

८९. कंपनी, जिल्हा परिषद, इत्यादींना देय असलेली पाणीपट्टी, इत्यादींची वसुली ... ३५

अनुक्रमणिका—चालू

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| | **भाग नऊ** | |
| | **निकडीच्या परिस्थितीमध्ये कालव्यांसाठी कामगार मिळविणे** | |
| ९०. | तातडीने आवश्यक असलेल्या कामांसाठी किंवा दुरुस्त्यांसाठी कामगार मिळविण्याची कार्यपद्धती. | ३६ |
| ९१. | कामगारांची यादी ... ... ... ... | ३७ |
| ९२. | कालवा अधिकाऱ्याने माहिती पाठविणे ... ... ... ... | ३७ |
| | **भाग दहा** | |
| | **शास्ती** | |
| ९३. | कालवा, इत्यादींचे नुकसान केल्याबद्दल शास्ती ... ... ... | ३७ |
| ९४. | कालवा, इत्यादींच्या स्थैर्यास धोका पोचवण्याबद्दल शास्ती ... ... ... | ३८ |
| ९५. | अडथळा दूर करणे व नुकसानीची दुरुस्ती करणे ... ... | ३९ |
| ९६. | कालव्यावर नेमलेल्या व्यक्तींना, अपराध्यास अभिरक्षेत घेता येईल ... ... | ३९ |
| ९७. | ज्याच्या सहाय्याने कालव्याचे पाणी अनधिकृतरीत्या वापरण्यात येते अशा यंत्राच्या व उपकरण संचाच्या बाबतीतील कार्यपद्धती. | ३९ |
| ९८. | विवक्षित अपराधांची दखल ... ... ... ... | ४० |
| ९९. | अपप्रेरणा ... ... ... ... | ४० |
| १००. | माहिती देणाऱ्यास बक्षीस देणे ... ... ... | ४० |
| १०१. | क्षती पोहोचलेल्या खाजगी व्यक्तींना भरपाई ... ... ... | ४१ |
| १०२. | अपराध समोपचाराने निकालात काढणे ... ... ... | ४१ |
| | **भाग अकरा** | |
| | **अपील व पुनरीक्षण** | |
| १०३. | अपील व पुनरीक्षण ... ... ... ... | ४१ |
| | **भाग बारा** | |
| | **संकीर्ण** | |
| १०४. | विवक्षित प्रकरणी दाव्यांना आडकाठी ... ... ... ... | ४२ |
| १०५. | कालव्याच्या सिंचनलाभ क्षेत्रातील जमिनीमध्ये विहिरी खोदल्याचे कळविणे ... | ४२ |
| १०६. | समुचित प्राधिकरणाद्वारे नियंत्रण केल्या जाणाऱ्या किंवा व्यवस्था ठेवण्यात येणाऱ्या तलावाच्या पात्रामधील जमिनीसंबंधीचा आणि तलाव, इत्यादीमध्ये मच्छीमारी करणे व नौका चालवणे यासंबंधीचा हक्क समुचित प्राधिकरणाकडे निहित असणे. | ४२ |
| १०७. | खाणकाम, दगड खाणकाम यास मनाई ... ... ... | ४२ |
| १०८. | अपराधी निश्चित करता येत नसेल त्यावेळी नुकसानीच्या दुरुस्तीच्या खर्चाची वसुली ... | ४३ |
| १०९. | साक्षीदारांना समन्स काढून बोलावण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार ... | ४३ |

## अनुक्रमणिका—समाप्त

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ११०. | अधिकार व कर्तव्ये सोपवणे . . . . . . . . . . . . | ४३ |
| १११. | नोटीस बजावणे . . . . . . . . . . . . | ४३ |
| ११२. | कंपनी व जिल्हा परिषदांना त्यांच्या कालव्यांच्या सुस्थितीत ठेवण्याच्यासंबंधात निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | ४३ |
| ११३. | लोकसेवक व अन्य काही व्यक्ती यांना कायदेशीर कार्यवाहीपासून संरक्षण देणे . . . | ४४ |
| ११४. | नियम . . . . . . . . . . . . | ४४ |
| ११५. | विवक्षित जलदाय व्यवस्थांची व्यावृत्ती . . . . . . . . . . . . | ४६ |
| ११६. | सहकारी संस्थांच्या उपसा सिंचनाच्या बांधकामांना अधिनियमाच्या विवक्षित तरतुदी लागू होणे | ४६ |


## भाग तेरा

### दुसऱ्या वर्गाची पाटबंधारेविषयक बांधकामे


| | | |
|---|---|---|
| ११७. | दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामांना हा भाग लागू असणे . . . . . . | ४७ |
| ११८. | दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामांना या अधिनियमाची विवक्षित कलमे व भाग लागू असणे. | ४७ |
| ११९. | पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखांचे पुनरीक्षण . . . . . . . . . | ४८ |
| १२०. | हक्क कमी करणे . . . . . . . . . . . . | ४९ |
| १२१. | पुरवठा वाढविणारी कामे हाती घेण्यात येतील त्याबाबतीत राज्य शासनाचा अधिकार . . . | ४९ |
| १२२. | पाटबंधारेविषयक हक्क अभिलेख प्रसिद्ध करणे. . . . . . . . . . . | ४९ |
| १२३. | पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखातील नोंदी पुरावा म्हणून संबद्ध असणे . . . | ४९ |
| १२४. | जिल्हाधिकाऱ्यास वादाची नोटीस देणे . . . . . . . . . . . . | ४९ |
| १२५. | किरकोळ दुरुस्त्या पार पाडण्याचे बंधन . . . . . . . . . . . . | ५० |
| १२६. | किरकोळ दुरुस्त्या पार पाडण्याच्या बंधनाचा भार . . . . . . . . . | ५० |
| १२७. | हक्क व बंधने अमलात आणण्याचा अधिकार . . . . . . . . . | ५० |
| १२८. | दुरुस्त्या करण्यात झालेल्या कसुरीबद्दल कळविणे हे तलाठ्याचे कर्तव्य असणे . . . | ५१ |
| १२९. | प्रत्येक गावासाठी पाणी समिती घटित करणे व तिचा अधिकार . . . . . . | ५१ |
| १३०. | दुसऱ्या वर्गाचे पाटबंधाऱ्याचे कोणतेही विद्यमान बांधकाम निरधिसुचित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार | ५२ |


## भाग चौदा

### निरसन व व्यावृत्ती


| | | |
|---|---|---|
| १३१. | निरसन व व्यावृत्ती . . . . . . . . . . . . | ५२ |

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८[१]

[महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६]

[५ ऑगस्ट १९७६]

[या अधिनियमास दिनांक २६ जुलै १९७६ रोजी राष्ट्रपती यांची संमती मिळाली आणि तो **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग चार, असाधारण, दिनांक ५ ऑगस्ट १९७६ मध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :-

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२. * [१९ सप्टेंबर १९८१]

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३. * [११ जानेवारी १९८४]

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४. * [१३ जुलै १९८९]

**महाराष्ट्र राज्यातील पाटबंधाऱ्यांशी संबंधित कायद्यांचे एकीकरण व त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** कालव्यांच्या जलप्रदाय क्षेत्रामधील जमिनींवर पाणीपट्टी बसवण्याची तरतूद करणे आणि त्याच्याशी संबंधित अशा बाबींची तरतूद करणे यासाठी, महाराष्ट्र राज्यातील पाटबंधारेविषयक कायद्याचे एकीकरण करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** आता, भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## भाग एक

## प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमिल, अशा [२]दिनांकास अंमलात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(१) " दुमाला " याचा अर्थ, राज्य शासनाच्या, खंड किंवा जमीन महसूल देण्याच्या अधिकाराचा संबंध असेल तेथवर, कोणत्याही व्यक्तीच्या, पूर्णतः किंवा अंशतः मालकीचे करून हस्तांतरित केलेले असा आहे आणि " दुमाला जमीन " व " बिनदुमाला जमीन " या शब्द-प्रयोगाचा अर्थ तदनुसार लावण्यात येईल.

(२) राज्य शासन किंवा कंपनी किंवा जिल्हा परिषद यांजकडून बांधण्यात आलेल्या, सुस्थितीत ठेवण्यात आलेल्या, नियंत्रित करण्यात किंवा व्यवस्था ठेवण्यात आलेल्या एखाद्या कालव्याच्या संबंधात, " समुचित प्राधिकरण " याचा अर्थ, अनुक्रमे ते राज्य शासन, ती कंपनी किंवा ती जिल्हा परिषद, असा आहे ;

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन, यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७६, भाग पाच, पृ. ११५-१२३ (इं.) पहा.

[२] १ जानेवारी, १९७७ रोजी अंमलात आला. शासकीय अधिसूचना, पाटबंधारे विभाग, क्रमांक एमआयए. १९७६, एमआयजी-१, दिनांक १ जानेवारी १९७७ पहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

(३) " कालवा " यामध्ये, पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

(क) पाण्याचा पुरवठा किंवा साठा करण्यासाठी समुचित प्राधिकरणाने बांधलेले, सुस्थितीत ठेवलेले किंवा त्याचे नियंत्रण असलेले सर्व कालवे, जलमार्ग, जलवाहिन्या, नलिकाकूप, घरगुती पाणी पुरवठ्याची बांधकामे आणि जलाशय ;

(ख) असे कालवे, प्रणाल, जलवाहिन्या, नलिकाकूप, घरगुती पाणीपुरवठ्याची बांधकामे आणि जलाशय यांच्याशी संबंधित असलेली सर्व बांधकामे, बंधारे, संरचना आणि पुरवठा व निस्सार प्रणाल (एस्केप चॅनेल्स) आणि असे कालवे, प्रणाल, जलवाहिन्या, नलिकाकूप, घरगुती पाणी पुरवठ्याची बांधकामे आणि जलाशय बांधणे किंवा सुस्थितीत ठेवणे सुकर होण्याच्या प्रयोजनासाठी बांधलेले सर्व रस्ते ;

(ग) या अधिनियमात यापुढे अनुक्रमे व्याख्या किंवा स्पष्टीकरण केलेले, शेतातील सर्व पाट, जलप्रवाह, जलनिस्सारण बांधकामे आणि पूर बंधारे ;

(घ) नदी (यात तिच्या उपनद्यांचा समावेश होतो), ओढा, सरोवर, पाण्याचा नैसर्गिक साठा किंवा जलनिस्सारणाचा नैसर्गिक मार्ग यांच्या ज्या कोणत्याही भागास, राज्य शासन, कलम ११ च्या तरतुदी लागू करील असा किंवा ज्याचे पाणी कोणत्याही विद्यमान कालव्याच्या प्रयोजनांसाठी या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उपयोगात आणले असेल किंवा वापरले असेल असा भाग ;

(ङ) यात यापूर्वी व्याख्या केल्याप्रमाणे, कोणत्याही कालव्याच्या काठावर असेल अशी समुचित प्राधिकरणाच्या मालकीची किंवा त्याने धारण केलेली किंवा त्याच्याकडे सोपविण्यात आलेली व अशा कालव्याच्या प्रयोजनासाठी, समुचित प्राधिकरणाच्या आदेशान्वये, जी कामी लावण्यात आली असेल अशी सर्व जमीन ;

(च) समुचित प्राधिकरणाने बांधलेली, सुस्थितीत ठेवलेली किंवा नियंत्रण केलेली सर्व उपसा सिंचनाची कामे ;

(४) " कालवा अधिकारी " याचा अर्थ, लेखी आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी राज्य शासनाकडून यथोचितरीत्या नेमण्यात आलेला कोणताही अधिकारी, असा आहे ; आणि त्यात, कंपनीने बांधलेल्या, सुस्थितीत ठेवलेल्या, नियंत्रण किंवा व्यवस्था ठेवलेल्या कालव्याच्या संबंधात, कंपनी अधिकाऱ्याचा आणि जिल्हा परिषदेच्या कालव्यासंबंधात, परिषद अधिकाऱ्याचा समावेश होतो ; आणि " या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेला कालवा अधिकारी " या किंवा तत्सम कोणत्याही शब्दप्रयोगाचा अर्थ, समुचित प्राधिकरणाकडून लेखी आदेशाद्वारे या अधिनियमाच्या, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेला कालवा अधिकारी असा होतो ; आणि त्यात अशा कालवा अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाखाली कार्य करणाऱ्या व्यक्तीचासुद्धा समावेश होतो ;

(५) " कालव्यापासून मिळणारे उत्पन्न " यात एखाद्या कालव्याच्या पाण्याचा वापर, वापराचा हक्क किंवा अपव्ययाचा हक्क यांसाठी समुचित प्राधिकरणाला देय असलेल्या सर्व रकमांचा समावेश होतो ;

(६) " जिल्हाधिकारी " यात, या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी राज्य शासनाकडून नेमण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(७) " कंपनी " याचा अर्थ, राज्याच्या मालकीची किंवा राज्याच्या नियंत्रणाखालील इतर गोष्टींबरोबरच जलसिंचनाच्या प्रयोजनासाठी योजनांचे प्रचालन, अन्वेषण, स्थापना, कार्यान्वयन, मांडणी, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा राज्यातील जलसिंचन क्षमता व कृषि उत्पादन यात वाढ करण्यासाठी कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पाच्या संबंधात, स्थापन केलेली कंपनी, असा आहे आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी ही कंपनी राज्य शासनाचा एजंट म्हणून काम करील ;

(८) " कंपनी अधिकारी " याचा अर्थ, लेखी आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी, कंपनीने रीतसर नेमलेला कंपनीचा कोणताही अधिकारी, असा आहे ;

(९) " जलनिस्सारणाचे बांधकाम " यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(क) सांडपाणी किंवा जास्तीचे पाणी वाहून जाण्यासाठी नैसर्गिक किंवा कृत्रिम प्रणाल आणि अशा प्रणालांशी संबद्ध किंवा त्यांना सहाय्यकारी असलेली सर्व बांधकामे ;

(ख) कालवे, धरणे, बांध, बंधारे, जलद्वारे जलभिंत यांपासून निघालेले निस्सार प्रणाल आणि त्यांच्याशी संबद्ध असलेली इतर बांधकामे ; आणि

(ग) कोणत्याही क्षेत्रातील जलनिस्सारणाच्या प्रयोजनासाठी समुचित प्राधिकरणाकडून करण्यात किंवा सुधारण्यात आलेले सिंचनाच्या किंवा उपयोगक्षम करण्याच्या पद्धतीशी संबंधित कोणतेही काम, यात कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील मलप्रवाह विल्हेवाट योजनेतील निःसृत पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून हाती घेण्यात आलेल्या बांधकामाचा समावेश होतो. परंतु त्यात कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीतील कोणत्याही क्षेत्रातील मलप्रवाहाची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या बांधकामांचा समावेश होत नाही ;

(१०) " शेतातील पाट " याचा अर्थ, निर्गम मार्गाच्या पलीकडे, जेथून तो आपल्या मार्गाने वाहतो अशा बिंदूपासून निघणारा व धारकांनी किंवा भोगवटादारांनी बांधलेला अथवा त्यांच्या वतीने समुचित प्राधिकरणाने बांधलेला आणि उपरोक्त बिंदूपासून पुढील क्षेत्रात अशा धारकांनी किंवा भोगवटादारांनी सुस्थितीत ठेवलेला पाट, असा आहे ;

(११) " पूर बंधारा " याचा अर्थ, पुरापासून जमिनीचे संरक्षण करण्याकरिता जलसिंचनाच्या किंवा उपयोगक्षम करण्याच्या कोणत्याही पद्धतीसंबंधी समुचित प्राधिकरणाने बांधलेला किंवा सुस्थितीत ठेवलेला किंवा अशा कोणत्याही पद्धतीसंबंधी समुचित प्राधिकरणाने सुस्थितीत ठेवण्याविषयी घोषित केलेला कोणताही बंधारा असा आहे आणि यामध्ये सर्व जलभिंत, प्रतिबंधक बांध, धरणे आणि अशा बंधाऱ्याशी संबद्ध असलेली अन्य संरक्षक कामे यांचा समावेश होतो ;

(१२) जमिनीच्या संबंधात, " धारक " याचा अर्थ, मालक किंवा कूळ म्हणून जमीन कायदेशीररीत्या जिच्या प्रत्यक्ष कब्जात आहे अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यात शासकीय पट्टेदाराचा समावेश होतो ;

(१३) " सिंचन करार " याला, कलम ६१ द्वारे नेमून दिलेला अर्थ असेल ;

(१४) " कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्राखालील जमीन " याला, कलम ३ द्वारे नेमून दिलेला अर्थ असेल ;

(१५) " भोगवटादार " याचा अर्थ, बिनदुमाला जमिनी प्रत्यक्ष कब्जात असणारे धारक किंवा शासकीय पट्टेदार याव्यतिरिक्त असेल असे कूळ, असा आहे, परंतु असे की, प्रत्यक्ष कब्जा असणारा धारक कूळ असेल त्याबाबतीत, जमीनधारक किंवा, यथास्थिति, वरिष्ठ जमीनमालक हा भोगवटादार असल्याचे मानण्यात येईल ;

(१६) जमिनीच्या संबंधात " ताबाधारक " याचा अर्थ, त्यावेळी अशी जमीन कसण्याचा हक्क धारण करणारी, किंवा तसा हक्क सांगणारी व्यक्ती, असा आहे ;

(१७) " निर्गममार्ग " याचा अर्थ, ज्यातून शेतातील पाटात किंवा प्रत्यक्षपणे कोणत्याही जमिनीला पाणी देण्यात येते अशा कालव्यात समुचित प्राधिकरणाने बांधलेले आणि सुमारे ४० हेक्टर जमिनीच्या भागास दर सेकंदास ३० लिटरपेक्षा अधिक नाही इतके पाणी देण्याची क्षमता असणारे द्वार, असा आहे ;

(१८) " मालक " यामध्ये, विनिर्दिष्ट केलेल्या वस्तूच्या मालकीत संयुक्त हितसंबंध असलेल्या प्रत्येक व्यक्तीचा समावेश होतो ; आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे हक्क व बंधन मालकाशी संलग्न असतील ते सर्व हक्क व बंधन, मालकीत असा संयुक्त हितसंबंध असलेल्या प्रत्येक व्यक्तीशी संयुक्तपणे व पृथकपणे संलग्न असतील ;

(१९) " परिषद अधिकारी " याचा अर्थ, जिल्हा परिषदेने, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, या अधिनियमाच्या त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा सर्व कोणत्याही प्रयोजनांसाठी, लेखी आदेशाद्वारे, रीतसर नेमलेला जिल्हा परिषदेचा कोणताही अधिकारी, असा आहे ;

(२०) " विहित " याचा अर्थ, राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(२१) " दुसऱ्या वर्गाची पाटबंधारेविषयक बांधकामे " याचा अर्थ, मुंबई पाटबंधारे अधिनियम, १८७९ अन्वये, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी दुसऱ्या वर्गाची पाटबंधारेविषयक बांधकामे म्हणून घोषित करण्यात आलेले कालवे, प्रणाल, ओढे, नद्या, विहिरी, नलिकाकूप, आर्टेशियन विहिरी, जलवाहिन्या, कृत्रिम किंवा नैसर्गिक जलाशय किंवा बंधारे किंवा त्याचा कोणताही भाग, असा आहे ; १८७९ चा मुंबई ७.

(२२) " वरिष्ठ धारक " याचा अर्थ, (" कनिष्ठ धारक " म्हणून संबोधल्या जाणाऱ्या) इतर जमीन धारकांकडून खंड किंवा जमीन महसूल स्वीकारण्याचा हक्क असलेला जमीनधारक असा आहे–मग तो असा खंड किंवा जमीन महसूल किंवा त्याचा कोणताही भाग यासंबंधात राज्य शासनाला जबाबदार असो किंवा नसो :

परंतु, भूमि अभिलेखामध्ये धारक म्हणून ज्याचे नाव अधिकृतपणे नोंदले असेल त्या, दुमाला जमिनीच्या धारकाकडून विवक्षित विनिर्दिष्ट निकडीच्या परिस्थितीत जमीन परत घेण्याच्या हक्कास अधीन राहून, जमीन खंडमुक्त किंवा महसुलमुक्त अशी देण्यात आली असेल त्या बाबतीत असा धारक, प्रदान ग्रहित्याच्या संदर्भात, त्याने अशा रीतीने दिलेल्या जमिनीचा वरिष्ठ धारक असल्याचे मानण्यात येईल आणि प्रदानग्राही हा, प्रदानकर्त्याच्या संदर्भात अशा जमिनीचा कनिष्ठ धारक असल्याचे मानण्यात येईल ;

(२३) " पाणीपुरवठा " याच्या व्याकरणिक रूपभेदासह, त्या शब्दप्रयोगात " कोणत्याही कालव्यातून उपलब्ध करून दिलेले पाणी, " या शब्दप्रयोगाचा, त्याच्या व्याकरणिक रूपभेदांसह समावेश होतो ;

(२४) " पाणीपट्टी " याचा अर्थ, जलसिंचनासाठी किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी कालव्यातून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या किंवा सोयीबद्दल या अधिनियमाखाली ठरवलेल्या दराने विहित रीतीने करावयाचे प्रदान, असा आहे ;

(२५) " ओलिताची जमीन " याला कलम ४ द्वारे नेमून दिलेला अर्थ असेल ;

१९६२ चा महा. ५. (२६) " जिल्हा परिषद " याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये घटित करण्यात आलेली जिल्हा परिषद, असा आहे ;

(२७) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मध्ये त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आल्याप्रमाणे अर्थ असतील ; (१९६६ चा महा. ४१.)

**कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्राखालील जमिनी.**

३. (१) कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्राखालील जमिनी याचा अर्थ, पाण्याचा उपसा केल्याशिवाय किंवा पंपाने ते काढल्याशिवाय गुरुत्वाकर्षणामुळे वाहणाऱ्या जलप्रवाहाद्वारे कालव्यातून सिंचित होणाऱ्या किंवा होऊ शकणाऱ्या (किंवा उपसा सिंचित प्रकरणी, पाण्याचा उपसा केल्यानंतर गुरुत्वाकर्षणामुळे वाहणाऱ्या जलप्रवाहाद्वारे, जलसिंचन होणाऱ्या किंवा होऊ शकणाऱ्या) आणि कार्यकारी अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कालवा अधिकारी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या कालव्याच्या संबंधात त्या तशा असल्याचे घोषित करील अशा जमिनी, असा आहे. अशा जमिनीमध्ये कलम ५५ च्या अर्थान्तर्गत सिंचित होणाऱ्या किंवा होत असल्याचे मानल्या जाणाऱ्या जमिनीचा समावेश करता येईल. कालवा अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा रीतीने त्या जमिनी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करता येतील किंवा त्यांचा तपशील देता येईल.

(२) अशी अधिसूचना कालवा अधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा इतर रीतीने देखील अशा जमिनीच्या क्षेत्रात किंवा त्यांच्या जवळपासच्या क्षेत्रात प्रसिद्ध करता येईल. कालवा अधिकारी पोट-कलम (१) अन्वये घोषित केलेल्या कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील जमिनीच्या सर्व धारकांवर व ताबाधारकांवर व्यक्तिगत नोटिसाही बजावील.

(३) कार्यकारी अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कालवा अधिकाऱ्यास, अधीक्षक अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या अशा कालवा अधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीने, कोणतीही जमीन, —जर ती कालवा अधिकाऱ्याच्या मते केवळ अत्याधिक असलेल्या पाण्याचा वापर करूनच किंवा कालवा अधिकाऱ्यास जे वगळणे इष्ट आहे असे वाटत असेल अशा क्षेत्रातून जाणाऱ्या शेतातील पाटाद्वारेच केवळ सिंचित करता येत असेल तर, —" जलप्रदाय क्षेत्राखाली नसलेली जमीन " म्हणून घोषित करता येईल ;

(४) जी जमीन कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्राखाली आली नसती अशी जमीन, पाणी जाण्यासाठी नैसर्गिक जलनिस्सारण प्रणालावर आढेपाटा ओलांडणी बांधून किंवा आढेपाट काढून अशा, कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्राखाली येऊ शकेल ;

(५) पोट-कलम (१) खालील कोणत्याही अधिसूचनेमुळे किंवा तिच्या एखाद्या भागामुळे नुकसान पोहोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस अशी अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, मुख्य अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या, समुचित प्राधिकरणाकडून नियुक्त करण्यात येईल अशा अधिकाऱ्यासमोर अपील दाखल करता येईल. अपील अधिकारी अपिलात त्यास योग्य वाटेल असा प्रत्येक आदेश देईल आणि आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या मर्यादेपर्यंत आणि त्या दिनांकापासून त्या अधिसूचनेत, फेरबदल होतील किंवा होणार नाहीत :

परंतु, अशी कोणतीही अधिसूचना किंवा तिचा भाग यामध्ये फेरबदल किंवा सुधारणा केल्यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या जमिनीला बाधा पोचत असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीला तिची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा फेरबदल किंवा सुधारणा करण्याचे आदेश देता येणार नाही.

ओलिताची जमीन. ४. (क) जेव्हा या कलमाच्या प्रयोजनासाठी, राज्य शासन, गावाच्या अभिलेखातील कोणत्याही वर्णनाखाली वर्गीकृत करण्यात आलेल्या जमिनीत किंवा या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे " ओलिताची " असा अर्थ असल्याचे घोषित करील अशा ; किंवा

(ख) समुचित प्राधिकरणाकडून यथोचित रीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्या- कडून ओलिताची असल्याचे घोषित करण्यात येईल अशा, जमिनीस ओलीताची जमीन असे म्हटले जाईल.

## पाटबंधारे क्षेत्रे

राज्याच्या पाटबंधारे क्षेत्राची विभागणी. ५. या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, समुचित प्राधिकरणास, आपल्या अधिकारितेतील क्षेत्राची, प्रदेश, मंडले, विभाग, उप-विभाग आणि अनुभाग यात, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने, विभागणी करता येईल आणि त्यांच्या सीमांमध्ये वेळोवेळी फेरफार करता येईल.

# भाग दोन

## कालवा अधिकारी, त्याचा कार्यभार व अधिकार

कालवा अधिकारी. ६. (१) राज्य शासनाकडून नेमण्यात आलेल्या, पुढील पदनामे असलेल्या किंवा राज्य शासन, वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे ठरवील अशी इतर पदनामे असलेल्या कालवा अधिकाऱ्याचे पुढील वर्ग असतील,—

(१) मुख्य अभियंते,

(२) अपर मुख्य अभियंते,

(३) अधीक्षक अभियंते,

(४) कार्यकारी अभियंते,

(५) उप-विभागीय अधिकारी, म्हणजेच उप-विभागाचा कार्यभार धारण करणारे पुढील अधिकारी :—

(क) सहायक अभियंता, वर्ग-एक,

(ख) सहायक अभियंता, वर्ग-दोन,

(ग) उप-अभियंता,

(घ) उप-विभागीय अभियंता,

(ङ) उप-विभागीय अधिकारी,

(६) अनुभाग अधिकारी.

(२) या अधिनियमाच्या भाग तेराच्या प्रयोजनासाठी कालवा अधिकारी हा तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला महसूल अधिकारी असेल.

(३) कंपनीने किंवा जिल्हा परिषदेने नेमलेल्या कालवा अधिकाऱ्यांची, तिला योग्य वाटतील अशी, पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेली पदनामे असतील आणि तसे करताना, राज्य शासनाने नेमलेल्या कालवा अधिकाऱ्यांच्या दर्जाशी समकक्ष असा त्यांचा दर्जा त्यांच्या नेमणुकीच्या आदेशात दर्शविण्यात येईल आणि या भागाच्या तरतुदींचा तदनुसार अर्थ लावण्यात येईल.

७. मुख्य नियंत्रण प्राधिकाऱ्याच्या प्रदेशातील किंवा प्रदेशांमधील कालव्यांचे बांधकाम, परिरक्षण व व्यवस्थापन, यांच्याशी संबंधित आणि त्यास अनुषंगिक किंवा पूरक अशा बाबीसंबंधीतील प्राधिकार हा, मुख्य अभियंता आणि राज्य शासन यांचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांस अधीन राहून, राज्य शासनाच्या कालव्यांच्या संबंधात अपर मुख्य अभियंत्याकडे किंवा याबाबतीत विनिर्दिष्ट केलेले इतर कोणतेही पदनाम असल्यास, ते धारण करणाऱ्या अधिकाऱ्याकडे आणि कंपनीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या कालव्यांच्या संबंधात तिच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तिने नेमलेल्या कालवा अधिकाऱ्याकडे निहित होतील. पाटबंधाऱ्यांच्या बाबीं संबंधातील मुख्य नियंत्रक प्राधिकार.

८. (१) समुचित प्राधिकरणास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे भावी किंवा पूर्वलक्षी प्रभावासह, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मुख्य अभियंत्यास, सर्वसाधारणपणे पाटबंधाऱ्यांचा प्रभारी, अपर मुख्य अभियंत्यास प्रदेशाचा किंवा प्रदेशांचा प्रभारी, अधीक्षक अभियंत्यास मंडलाचा प्रभारी, कार्यकारी अभियंत्यास विभागाचा प्रभारी, उप-विभागीय अधिकाऱ्यास उप-विभागाचा प्रभारी व अनुभाग अधिकाऱ्यास अनुभागाचा प्रभारी म्हणून नियुक्त करता येईल. कालवा अधिकाऱ्यांची नेमणूक.

(२) समुचित प्राधिकरणास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, भावी किंवा पूर्वलक्षी प्रभावासह कोणत्याही अनुभागात, उप-विभागात, मंडलात किंवा प्रदेशात अतिरिक्त कालवा अधिकारी म्हणून व्यक्तींची नेमणूक करता येईल आणि त्यांच्याकडे अधिसूचनेत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुक्रमे अनुभाग अधिकारी, उप-विभागीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, किंवा अधीक्षक अभियंता यांना असलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार निहित करता येतील.

९. (१) सर्व कालवा अधिकारी हे समुचित प्राधिकरणाला दुय्यम असतील, आणि (मुख्य अभियंत्याखेरीज) सर्व कालवा अधिकारी हे मुख्य अभियंत्याला दुय्यम असतील. कालवा अधिकारी दुय्यम असणे.

(२) एखाद्या प्रदेशातील सर्व कालवा अधिकारी हे, अपर मुख्य अभियंत्याला दुय्यम असतील.

(३) एखाद्या मंडलातील सर्व कालवा अधिकारी हे, अधीक्षक अभियंत्याला दुय्यम असतील.

(४) एखाद्या विभागातील सर्व कालवा अधिकारी हे, कार्यकारी अभियंत्याला दुय्यम असतील.

(५) एखाद्या उप-विभागातील सर्व कालवा अधिकारी हे उप-विभागीय अधिकाऱ्याला दुय्यम असतील.

(६) अनुभाग अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे सर्व अधिकारी हे, अनुभाग अधिकाऱ्याला दुय्यम असतील.

१०. (१) या अधिनियमान्वये कालवा अधिकाऱ्याने कोणतेही कर्तव्य पार पाडावयाचे असेल किंवा एखादा अधिकार वापरावयाचा असेल आणि त्या कालवा अधिकाऱ्याचा वर्ग विनिर्दिष्ट केलेला नसेल तेव्हा अशा कर्तव्याचे पालन किंवा अशा अधिकाराचा वापर याचे विनियमन करण्यासंबंधीच्या या अधिनियमाखालील नियमांद्वारे, ज्या कालवा अधिकाऱ्याने त्याचे पालन किंवा वापर करावयाचा असेल त्याचा वर्ग विनिर्दिष्ट करता येईल. कालवा अधिकाऱ्यांमध्ये कामे वाटून देण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये कालवा अधिकाऱ्याने पालन करावयाच्या कोणत्याही कर्तव्याचे पालन किंवा वापरावयाच्या कोणत्याही अधिकाराचा वापर करणाऱ्या कालवा अधिकाऱ्याचा वर्ग सामान्यतः विहित करणारे नियमही या अधिनियमान्वये करता येतील.

(३) या अधिनियमान्वये कोणत्याही कर्तव्याचे पालन करणाऱ्या किंवा अधिकाराचा वापर करणाऱ्या कालवा अधिकाऱ्याचा वर्ग पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये विहित केलेला नसेल तेव्हा अशा कर्तव्याचे पालन किंवा अशा अधिकाऱ्याचा वापर उप-विभागीय अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

## भाग तीन

### कालवे बांधणे व ते सुस्थितीत ठेवणे

### कालव्याच्या प्रयोजनासाठी पाण्याचे उपयोजन

कालव्याच्या प्रयोजनासाठी किंवा पाण्याचे नियमन, पुरवठा किंवा साठा यासाठी पाणीपुरवठ्याचे उपयोजन करताना अधिसूचना काढणे.

**११.** (१) नैसर्गिक मार्गाने वाहणाऱ्या कोणत्याही नदीचे (तिच्या उपनद्यांसह) किंवा ओढ्याचे किंवा कोणत्याही सरोवराचे किंवा स्थिर पाण्याच्या इतर कोणत्याही नैसर्गिक साठ्याचे पाणी अथवा प्रणालातून वाहणारे पाणी किंवा त्याचा भाग, जर असे पाणी किंवा त्याचा भाग समुचित प्राधिकरणाकडून किंवा राज्य शासनाने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, बांधण्यात आलेल्या कोणत्याही कालव्यातून मिळत असेल--मग ते पाणी पाझरल्यामुळे, पुन्हा वळवल्यामुळे किंवा सोडल्यामुळे मिळवलेले असो किंवा अन्य मार्गाने मिळवलेले असो-- तर ते पाणी कोणत्याही अस्तित्वात असलेल्या किंवा प्रकल्पित कालव्याच्या प्रयोजनांसाठी किंवा पाण्याचे विनियमन, पुरवठा किंवा साठा करण्यासाठी समुचित प्राधिकरणाने उपयोजित करणे किंवा वापरणे समुचित प्राधिकरणास इष्ट वाटेल तेव्हा, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, उक्त पाणी उक्त अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन महिन्यांपूर्वीचा नसेल अशा, तीत नमूद करावयाच्या दिवसानंतर तशा रीतीने उपयोजित केले जाईल किंवा वापरले जाईल आणि त्यानंतर जिल्हाधिकारी कलम ८० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नोटीस देण्याची व्यवस्था करील.

(२) उक्त पाण्याचे उपयोजन किंवा त्याचा वापर किंवा कोणत्याही समुचित प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखालील किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही कालव्याच्या पाण्याचे उपयोजन किंवा त्याचा वापर हा या अधिनियमाच्या तरतुदीनुसार विनियमित केला जाईल.

(३) पोट-कलम (१) आणि (२) द्वारे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त (राज्य शासनाखेरीज) कोणतीही व्यक्ती, राज्य शासनाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय नैसर्गिक मार्गाने वाहणारी कोणतीही नदी (तिच्या उपनद्यांसह) किंवा ओढा किंवा यातील कोणतेही सरोवर किंवा स्थिर पाण्याचा इतर कोणताही नैसर्गिक साठा यातील पाण्याचे किंवा प्रणालातून वाहणाऱ्या पाण्याचे तिच्याकडून बांधण्यात यावयाच्या कोणत्याही प्रकल्पित कालव्याकरिता उपयोजन किंवा वापर करणार नाही आणि राज्य शासनाने, प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल अशा अटी व शर्तींना अधीन राहून अशी परवानगी देणे कायदेशीर असेल.

### जमीन, इत्यादींवर प्रवेश करण्याचा अधिकार

पाण्याचे अशा रीतीने उपयोजन करण्याच्या प्रयोजनासाठी कालवा अधिकाऱ्यांचे अधिकार.

**१२.** कलम ११ खालील अधिसूचनेत नमूद केलेल्या दिवसानंतर कोणत्याही वेळी याबाबत योग्यरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास उक्त पाण्याचे असे उपयोजन करण्यासाठी किंवा असा वापर करण्यासाठी कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल, कोणताही अडथळा दूर करता येईल, कोणताही जलमार्ग बंद करता येईल व त्यासाठी आवश्यक असेल अशी अन्य कोणतीही गोष्ट करता येईल ; आणि अशा प्रयोजनासाठी, त्यास योग्य वाटतील अशा आपल्या हाताखालील व्यक्ती आणि अन्य व्यक्ती व पोलीस अधिकारीही स्वतःबरोबर नेता येतील, किंवा प्रतिनियुक्त करता येतील किंवा नेमता येतील.

चौकशीसाठी प्रवेश करणे.

**१३.** पाण्याचे विनियमन, पुरवठा किंवा साठा याच्या प्रयोजनासाठी प्रकल्पित कालव्याच्या बाबतीत किंवा विद्यमान कालवा सुस्थितीत ठेवण्याच्या बाबतीत किंवा कोणत्याही कालव्याच्या पाण्याचा वापर किंवा उपयोजन याबाबतीत चौकशी किंवा तपासणी करणे आवश्यक असेल तेव्हा याबाबत योग्यरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास,--

(क) त्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा जमिनीवर प्रवेश करता येईल.

(ख) भू-मापनाचे किंवा तिच्या पातळ्या घेण्याचे काम हाती घेता येईल.

(ग) खणता येईल किंवा मातीखालील खडकाचे विंधण करता येईल.

(घ) जेथे अन्यथा अशी चौकशी पूर्ण करणे शक्य नाही तेथे कोणतेही उभे पीक, कुंपण किंवा जंगल यांचा कोणताही भाग कापून टाकता येईल आणि साफ करता येईल.

(ङ) त्या भागातील जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी गरज लागण्याचा संभव आहे अशा अर्थाची अधिसूचना, भूमि संपादन अधिनियम, १८९४, याच्या कलम ४ च्या तरतुदीन्वये राज्य शासनाने काढली असती तर, अशा जमिनीबाबत त्याने ज्या अधिकारांचा वापर केला असता आणि ज्या गोष्टी केल्या असत्या, त्या सर्व अधिकारांचा वापर करता येईल आणि त्या सर्व गोष्टी करता येतील, आणि

१८९४ चा १.

(च) जलमापके बसविता येतील व ती सुस्थितीत ठेवता येतील आणि अशी चौकशी व तपासणी करण्याकरिता आवश्यक असतील अशा अन्य सर्व गोष्टी करता येतील.

पाणीपुरवठ्याची तपासणी व विनियमन करण्याचे अधिकार.

**१४.** (१) याबाबत योग्य ते अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास ज्याबाबतीत कोणतीही पाणीपट्टी आकारणीयोग्य असेल अशा कोणत्याही जमिनीवर, इमारतीत किंवा शेतातील पाटावर, पुरवलेल्या पाण्याचा वापर तपासण्याच्या किंवा त्याचे विनियमन करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा त्या पाण्याने सिंचन होणाऱ्या किंवा पाणीपट्टी आकारणीयोग्य असणाऱ्या जमिनींची मोजणी करण्याच्या प्रयोजनासाठी, आणि असे पाणी ज्या कालव्यातून पुरविण्यात येत असेल त्या कालव्याचे योग्य विनियमन व व्यवस्थापन करण्याकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी करण्याच्या प्रयोजनासाठी, प्रवेश करता येईल.

(२) कोणत्याही जमिनीस कालव्याद्वारे शेताशेतातून करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या प्रवाहात अडथळा करण्यात आला असेल त्याबाबतीत, पाणीपुरवठ्याचे विनियमन करण्याच्या दृष्टीने कालवा अधिकारी असा अडथळा दूर करवून घेईल आणि या प्रयोजनासाठी तो, आवश्यक असल्यास, पाणीपुरवठ्यातील असा अडथळा दूर करवून घेण्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक असतील असे उपाय योजील किंवा योजण्याची व्यवस्था करील किंवा असे बल वापरील किंवा वापरण्याची व्यवस्था करील.

दुरुस्त्यांसाठी व अपघातांना प्रतिबंध करण्यासाठी प्रवेश करण्याचा अधिकार.

**१५.** एखाद्या कालव्याच्या बाबतीत कोणताही अपघात होण्याची शक्यता असेल, किंवा अपघात होत असेल अशा वेळी, याबाबत योग्यरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास, अशा कालव्यालगतच्या कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल ; आणि झाडे व अन्य सामान घेऊन अशा अपघातास प्रतिबंध करण्याच्या किंवा झालेल्या कोणत्याही नुकसानीची दुरुस्ती करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशी सर्व कामे पार पाडता येतील.

पुरांचे नियमन करण्यासाठी दारांची उघडझाप करण्याचा कालवा अधिकाऱ्यांचा अधिकार.

**१६.** पुरामुळे कोणत्याही धरणाचे नुकसान होत असेल किंवा कोणत्याही धरणाचे नुकसान होण्याची शक्यता असेल तर, याबाबत योग्यरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास, धरणाच्या सुरक्षिततेच्या हेतूने, धरणावरील दारे किंवा दारे असलेला उत्प्लव बांध यांची उघडझाप करून पुराचे नियमन करता येईल.

इमारत इत्यादींच्या ताबाधारकास नोटीस देणे.

**१७.** जेव्हा कालवा अधिकारी, कलम १३, १४ किंवा १५ च्या तरतुदींन्वये कालव्यातील पाणीपुरवठा होत नसलेल्या आणि पूरबंधाऱ्यालगत नसलेल्या कोणत्याही इमारतीत किंवा राहत्या घरास जोडून असलेल्या, बंदिस्त आवारात किंवा बागेत प्रवेश करण्याचे योजील त्या बाबतीत, तो प्रवेश करण्यापूर्वी, अशा इमारतीच्या, आवाराच्या किंवा बागेच्या ताबाधारकास, प्रकरणाच्या निकडीप्रमाणे शक्य असेल अशी वाजवी पूर्वसूचना देईल.

## कालवा ओलांडणी

कालवा ओलांडण्याच्या साधनांची सोय करणे व जलनिस्सारणातील अडथळा टाळणे.

**१८.** लगतच्या जमिनीवरील रहिवाश्यांच्या वाजवी सोईसाठी समुचित प्राधिकरणास आवश्यक वाटेल अशा ठिकाणी कालवा ओलांडण्याच्या साधनांची सोय करण्यात येईल ; आणि कोणत्याही कालव्यामुळे लगतच्या जमिनीच्या जलनिस्सारणास होणाऱ्या अडथळ्यास प्रतिबंध करण्यासाठी योग्य असे पूल, जमिनीखालील नाले बांधण्यात येतील किंवा अन्य बांधकामे करण्यात येतील. गावाच्या नकाशावर ठिपक्यांच्या दुहेरी रेषांनी दाखवलेल्या गावाच्या प्रमाणित सडकांसह, कालवा पार करणाऱ्या सर्व सडकांवर शक्य असेल तेथवर सडक पूल बांधण्याची सोय करण्यात येईल. कालवा पार करण्याच्या अशा साधनांच्या सोयीबद्दलच्या आणि पूल, जमिनीखालील नाले आणि इतर बांधकामे करण्याबद्दलच्या प्रश्नाबाबत विवाद निर्माण झाल्यास ते प्रकरण राज्य शासनाकडे निर्दिष्ट केले जाईल आणि राज्य शासनाचा त्या प्रश्नावरील निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि कोणत्याही दिवाणी न्यायालयात तो निर्णय प्रश्नास्पद करता येणार नाही.

## जलनिस्सारणास होणारे अडथळे दूर करणे

समुचित प्राधिकरणास विवक्षित सीमांच्या आत नद्या, इत्यादींचे अडथळे निर्माण होण्यास प्रतिषेध करता येईल.

**१९.** कोणतीही नदी, ओढा किंवा जलनिस्सारणाचा नैसर्गिक मार्ग यांचा अडथळा झाल्यामुळे सार्वजनिक आरोग्य किंवा सार्वजनिक सोय, किंवा कोणताही कालवा किंवा ज्या जमिनीस कालव्यातून पाणी उपलब्ध होत असेल अशी जमीन यास नुकसान पोचले आहे किंवा पोचण्याची शक्यता आहे असे समुचित प्राधिकरणास आढळून आल्यास, समुचित प्राधिकरणास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत निश्चित करावयाच्या सीमांच्या आत असा कोणताही अडथळा होण्यास प्रतिषेध करता येईल किंवा अशा सीमांच्या आतील असा अडथळा दूर करण्याविषयी किंवा त्यात अन्य फेरबदल करण्याविषयी आदेश देता येईल. अशी सीमांच्या आत जास्त खप असणाऱ्या वृत्तपत्रांतून देखील अधिसूचनेतील आशयास प्रसिद्धी दिली जाईल.

त्यानंतर उक्त नदीचा, ओढ्याचा किंवा जलनिस्सारणाच्या नैसर्गिक मार्गाचा जितका भाग अशा सीमांच्या आत समाविष्ट असेल तितका भाग कलम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जलनिस्सारणाचे बांधकाम असल्याचे समजण्यात येईल.

अडथळा निर्माण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कालवा अधिकारी आदेश देऊ शकेल.

**२०.** याबाबत योग्यरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास, कलम १९ खालील अधिसूचना अशा रीतीने प्रसिद्ध केल्यानंतर, असा कोणताही अडथळा निर्माण करणाऱ्या किंवा त्या अडथळ्यावर नियंत्रण असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस असा अडथळा अशा आदेशात ठरवून द्यावयाच्या मुदतीच्या आत दूर करण्याविषयी किंवा त्यात फेरबदल करण्याविषयी आदेश देता येईल.

कालवा अधिकारी अडथळा दूर करून घेऊ शकेल.

**२१.** (१) अशा रीतीने ठरवून दिलेल्या मुदतीच्या आत अशा व्यक्तीने आदेशाचे अनुपालन केले नाही तर, कालवा अधिकारी असा अडथळा दूर करवून घेईल किंवा त्यात फेरबदल करवून घेईल आणि ज्या व्यक्तीस आदेश देण्यात आला असेल त्या व्यक्तीने असा अडथळा दूर करण्याबद्दलचा किंवा त्यात फेरबदल करण्याबद्दलचा खर्च देण्यास तिला सांगितले असता तो दिला नाही तर असा खर्च जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल.

(२) कालवा अधिकाऱ्यास, निकडीच्या परिस्थितीत, कारणे लेखी नमूद केल्यानंतर कलम १९ खालील अधिसूचनेच्या प्रसिद्धीपूर्वी, अडथळा दूर करता येईल आणि अशारीतीने अडथळा दूर करण्यासाठी आलेला खर्च त्याच रीतीने वसुलीयोग्य असेल. निकडीची परिस्थिती आहे किंवा नाही याबाबतचा कालवा अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल आणि असा निर्णय कोणत्याही दिवाणी न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.

### जलनिस्सारणाची बांधकामे

**२२.** सार्वजनिक आरोग्यासाठी किंवा जमीन लागवड योग्य करण्यासाठी किंवा कोणत्याही जमिनीच्या योग्य मशागतीच्या किंवा जलसिंचनाच्या सुधारणेसाठी कोणतेही जलनिस्सारणाचे बांधकाम आवश्यक आहे किंवा पुरापासून किंवा अन्य जलसंचयापासून किंवा नदीमुळे होणारी धूप यांपासून कोणत्याही जमिनीचे संरक्षण करणे आवश्यक आहे (किंवा कोणत्याही मलप्रवाह योजनेतील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी मलप्रवाह विल्हेवाट योजना आवश्यक आहे) असे जेव्हा समुचित प्राधिकरणास आढळून येईल तेव्हा, समुचित प्राधिकरणास अशा कामाकरता योजना तयार करून घेण्याची आणि तिची अंमलबजावणी करून घेण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतीत समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस, त्या संबंधात कलमे १३, १४ व १५ द्वारे कालवा अधिकाऱ्यास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करता येईल आणि कलम १७ व कलम ७७ द्वारे कालवा अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आलेल्या दायित्वास अशी व्यक्ती जबाबदार असेल.

जलनिस्सारणाची बांधकामे आवश्यक असतील तेव्हा समुचित प्राधिकरणास योजनेची अंमलबजावणी करण्याचा आदेश देता येईल.

## भाग चार

## शेतातील पाट

### शेतातील पाट बांधणे

**२३.** शेतातील पाट (जलप्रवाह वगळता), जमिनीचा धारक किंवा ताबाधारक यांजकडून स्वतःच्या खर्चाने परंतु कालवा अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बांधले जातील. जलप्रवाह समुचित प्राधिकरणाकडून बांधण्यात येईल, परंतु त्याची व्यवस्था जमिनीचे असे धारक व ताबाधारक यांच्याकडून पाहिली जाईल आणि या अधिनियमाच्या तरतुदी, त्यांचा शेतातील पाटाच्या व्यवस्थेशी संबंध असेल तेथवर, अशा जलप्रवाहास, योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

शेतातील पाट बांधणे.

**स्पष्टीकरण.**––(१) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता जलप्रवाह याचा अर्थ, निर्गम मार्ग आणि शेतातील पाट यांमधील प्रणालाचा रिकामा पट्टा, असा आहे.

(२) जलप्रवाहाचा भाग असलेल्या कोणत्याही प्रणालाचा रिकामा पट्टा म्हणजे काय यासंबंधी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, तो प्रश्न याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यांकडे निर्दिष्ट केला जाईल आणि त्या प्रश्नावरील त्याचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल.

**२४.** ज्या व्यक्तीची शेतात नवीन पाट बांधण्याची इच्छा असेल, परंतु त्यासाठी आवश्यक असलेली जमीन धारण करणाऱ्याशी, खाजगी व्यवस्था करून असा पाट बांधण्यास ती असमर्थ आहे किंवा तयार नाही अशा कोणत्याही व्यक्तीला, असे अर्ज स्वीकारण्यासाठी यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्याकडे पुढील गोष्टी नमूद करून लेखी अर्ज करता येईल :––

शेतात नवीन पाट बांधण्यासाठी कालवा अधिकाऱ्याकडे अर्ज करणे.

(१) जमीन संपादन करण्यासाठी व असा शेतातील पाट बांधण्यासाठी आवश्यक असलेला सर्व खर्च करण्याची त्या व्यक्तीची तयारी आहे ;

(२) असा शेतातील पाट बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी तिच्या वतीने व तिच्या खर्चाने उक्त कालवा अधिकाऱ्याने कराव्यात अशी तिची इच्छा आहे.

शेतातील पाट बांधण्याची कार्यपद्धती.

२५. (१) कालवा अधिकाऱ्यास असा शेतातील पाट बांधणे इष्ट आहे असे वाटले तर, तो त्यास आवश्यक वाटेल असा खर्चाचा कोणताही भाग ठेव म्हणून ठेवण्यास अर्जदारास सांगू शकेल.

(२) अशी ठेव ठेवण्यात आल्यावर, कालवा अधिकारी शेतातील उक्त पाटाची सुयोग्य आखणी करण्याच्या दृष्टीने चौकशी करण्याची व्यवस्था करील आणि तो बांधण्यासाठी जी जमीन त्याच्या मते ताब्यात घेणे आवश्यक असेल ती जमीन चिन्हांकित करील. त्यानंतर ज्या ज्या गावातून असा पाट नेण्याचे योजले असेल अशा प्रत्येक गावात, अशा गावातील जमिनींपैकी अमुक इतकी जमीन अशारीतीने चिन्हांकित करण्यात आली आहे अशी अधिसूचना तो ताबडतोब प्रसिद्ध करील. अशा अधिसूचनेत, असे नमूद करण्यात येईल की, ती अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कालवा अधिकाऱ्याकडे येणाऱ्या सूचना व हरकती यांचा, आवश्यक असल्यास संबंधित पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर, यथोचित विचार करण्यात येईल.

(३) कालवा अधिकारी अशी जमीन ज्या जिल्ह्यात असेल अशा प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे अशा अधिसूचनेची एक प्रत, त्या जमिनीच्या ठिकाणी प्रसिद्ध करण्यासाठी पाठवील.

(४) शेतातील अशा पाटाच्या मालकीत हिस्सेदार होण्याची जिची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस तिने अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिवसापासून तीस दिवसांच्या आत कालवा अधिकाऱ्याकडे त्यासंबंधी अर्ज करावा असे उक्त अधिसूचनेद्वारे सांगण्यात येईल.

(५) असा कोणताही अर्जदार हजर झाला आणि त्याचा अर्ज स्वीकारण्यात आला तर तो शेतातील असा पाट बांधण्याच्या व त्यासाठी जमीन संपादन करण्याच्या खर्चापैकी स्वतःचा हिस्सा देण्यास जबाबदार असेल आणि असा शेतातील पाट बांधण्यात येईल तेव्हा तो अर्जदार त्या पाटाचा मालक होईल.

शेतातील पाट बांधल्यानंतरची कार्यपद्धती.

२६. या अधिनियमाच्या भाग पाच अन्वये संपादन केलेल्या जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर कालवा अधिकारी आवश्यक असलेला शेतातील पाट बांधील आणि तो बांधून पूर्ण झाल्यानंतर, त्याबाबत आणि जमीन संपादनाचा व शेतातील पाट बांधण्याचा खर्च म्हणून मालकाने देणे असलेल्या कोणत्याही रकमेबाबत त्यास नोटीस देईल अशी नोटीस दिल्यानंतर, अशी रक्कम मालकाकडून कालवा अधिकाऱ्यास देय होईल. झालेल्या खर्चाची पूर्ण रक्कम मिळाल्यानंतर कालवा अधिकारी अशा मालकास त्या शेतातील पाटाचा ताबा देईल.

## शेतातील पाटांच्या मालकांचे हक्क व त्यांच्यावरील आबंधने

शेतातील पाटाच्या मालकावरील आबंधन.

२७. (१) शेतातील पाटाचा प्रत्येक मालक,—

(क) शेतातील असा पाट आणि त्या पाटाला छेदून जाणारे जलनिस्सारणाचे मार्ग बांधण्याच्या वेळी, त्या पाटापलीकडे जाण्यासाठी आवश्यक असलेली आणि शेजारच्या जमिननींच्या ताबाधारकांसाठी ये-जा करण्याच्या योग्य सोयी उपलब्ध करण्याकरिता आवश्यक असलेली सर्व विद्यमान बांधकामे सुस्थितीत ठेवण्यास ;

(ख) पाणी वाहण्यासाठी असा शेतातील पाट योग्य अशा दुरुस्त स्थितीत ठेवण्यास ;

(ग) कलम २९ च्या तरतुदीन्वये तरतूद करण्यात येईल अशा शर्तीवर, इतरांना त्याचा उपयोग करू देण्यास किंवा अन्य व्यक्तींना त्याचे संयुक्त मालक म्हणून सीकारण्यास बांधील असेल.

(२) शेतातील पाटाच्या प्रत्येक मालकास आणि शेतातील पाटाचा उपयोग करण्यासाठी यात यापुढे अंतर्भूत असलेल्या तरतुदीअन्वये यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या प्रत्येक व्यक्तीस यथास्थिति कलम ५९, कलम ६०, कलम ६७, किंवा कलम ७२ खाली वेळोवेळी तरतूद करण्यात येईल अशा दरांनी व अशा अटींवर त्या पाटातून पाणीपुरवठा मिळविण्याचा हक्क असेल :

परंतु, पाटाच्या कोणत्याही मालकास आणि संबंधित पक्षांमध्ये झालेल्या कोणत्याही कराराच्या अटींना किंवा कलम २९ अन्वये लादण्यात आलेल्या कोणत्याही शर्तींना अधीन राहून, वर उल्लेख करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही वेळी नोटिसा स्वीकारण्यास यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडे याबाबत केव्हाही तीन महिन्यांची आगाऊ लेखी नोटीस देऊन अशा शेतातील पाटातील आपला हितसंबंध सोडून देता येईल.

**२८.** शेतातील पाटाचा मालक नसलेल्या ज्या व्यक्तीची अशा पाटामधून पाणीपुरवठा मिळविण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीला त्यामधून पाणी घेण्याच्या परवानगीसाठी मालकाबरोबर खाजगी व्यवस्था करता येईल, किंवा अशा पाटाचा उपयोग करण्याच्या प्राधिकारासाठी किंवा त्या पाटाचा तो संयुक्त मालक असल्याचे घोषित करण्याविषयी, त्यासंबंधीचा अर्ज स्वीकारण्यासाठी यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडे तसा अर्ज करता येईल.

अन्य व्यक्तीने मालकाबरोबर व्यवस्था करणे.

**२९.** असा कोणताही अर्ज मिळाल्यानंतर, कालवा अधिकारी, असा प्राधिकार का देण्यात येऊ नये किंवा अशाप्रकारे घोषित का करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखविण्याविषयी मालकावर नोटीस बजाविल आणि कोणतीही हरकत घेण्यात आली नाही तर, किंवा कोणतीही हरकत घेण्यात आली असेल आणि ती अपुरी किंवा विधिअग्राह्य असल्याचे आढळून आले असेल तर, लगत वरच्या वरिष्ठ कालवा अधिकाऱ्याच्या मान्यतेच्या अधिनतेने, त्यास न्याय्य वाटेल अशी भरपाई किंवा भाडे देण्याच्या अटींवर किंवा अन्यथा अर्जदारास एकतर पाट वापरण्यास प्राधिकृत करील किंवा तो त्या पाटाचा संयुक्त मालक असल्याचे घोषित करील.

कालवा अधिकाऱ्यास चौकशीनंतर पुरवठ्याचा प्राधिकार देता येईल किंवा अर्जदार संयुक्त मालक असल्याचे घोषित करता येईल.

**३०.** (१) शेतातील पाटाकरिता संपादित केलेल्या कोणत्याही जमिनीचा, त्यासंबंधात अशी परवानगी देण्यासाठी यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीशिवाय अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोग करण्यात येणार नाही.

(२) फेरफार करण्याबाबत परवानगी देण्यासाठी विशेषरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय कोणत्याही शेतातील पाटामध्ये फेरफार करण्यात येणार नाही.

पाटाकरिता संपादित केलेल्या जमिनींचा अन्य प्रयोजनासाठी उपयोग करण्यास मनाई आणि शेतातील पाटामध्ये फेरफार करण्यास मनाई.

**३१.** कलम २७, पोट-कलम (१), खंड (क) किंवा (ख) अन्वये शेतातील पाटाच्या कोणत्याही मालकावर जी कोणतीही जबाबदारी टाकण्यात आली असेल ती जबाबदारी पार पाडण्यात तो कसूर करील तर, याबाबत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास, मालकास नोटीस देऊन, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येणाऱ्या, पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीच्या आत आवश्यक ती कामे पार पाडण्यास किंवा दुरुस्ती करण्यास भाग पाडता येईल आणि त्याने तसे करण्यात कसूर केल्यास, त्याच्या वतीने ते काम व ती दुरुस्ती करता येईल आणि यात यापुढे कलम ३३ मध्ये तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त, असे काम किंवा दुरुस्ती करण्यासाठी झालेला सर्व खर्च हा, अशा मालकाकडून समुचित प्राधिकरणाला, देय असेल.

मालक शेतातील पाटाचे काम पार पाडण्यात किंवा पाट दुरुस्त करण्यात कसूर करील तर कालवा अधिकाऱ्यास ती कामे पार पाडता येतील.

शेतातील पाट सुस्थितीत ठेवण्यात कसूर केल्यास पाणीपुरवठ्याची मंजुरी रद्द करणे.

**३२.** शेतातील पाटाच्या मालकाने पाटाची दुरुस्ती करण्यात सातत्याने कसूर केली आहे याबद्दल याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्याची खात्री झाली असेल आणि त्यानुसार कालवा अधिकाऱ्याला कलम ३१ अन्वये पाटाची दुरुस्ती करावी लागली असेल तर, कालवा अधिकाऱ्यास, लगत वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने लेखी आदेश देऊन त्या पाटाच्या मालकास दिलेली पाणीपुरवठ्याची मंजुरी रद्द करता येईल :

परंतु, शेतातील पाटाच्या मालकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

शेतातील पाटाचा उपयोग करणाऱ्या व्यक्तीने दुरुस्तीच्या खर्चाचा हिस्सा देणे.

**३३.** शेतातील ज्या पाटासंबंधी कालवा अधिकाऱ्याने कलम ३१ अन्वये कोणतीही दुरुस्ती केली असेल त्यापाटाचा उपयोग करणारी मालकाव्यतिरिक्त प्रत्येक व्यक्ती, अशा पाटाचा उपयोग करण्यासाठी अशा व्यक्तीस प्राधिकृत करण्यात आले असेल व त्यावेळी संबंधित पक्षांमध्ये तद्‌विरुद्ध कोणताही करार झालेला नसेल किंवा कलम २९ अन्वये तद्‌विरुद्ध कोणतीही शर्त लादण्यात आली नसेल तर, अशा दुरुस्त्यांसाठी झालेला खर्च, उक्त कालवा अधिकारी ठरवील त्याप्रमाणात समुचित प्राधिकरणास देण्यास जबाबदार असेल.

## शेतातील पाट सक्तीने बांधण्यासाठी योजना

शेतातील पाट सक्तीने बांधण्यासाठी योजना.

**३४.** (१) कोणत्याही क्षेत्रात सिंचनासाठी पाणी उपलब्ध असून देखील त्यापासून सिंचित होण्यास योग्य असलेल्या जमिनींना पाटबंधाऱ्यांद्वारे पाणी मिळत नाही किंवा कोणत्याही कारणावरून अशारीतीने सिंचित होण्यास त्यांना प्रतिबंध होत आहे असे समुचित प्राधिकरणाने याबाबतीत विशेषरीत्या प्राधिकृत केलेल्या कालवा अधिकाऱ्याचे (ज्याच्या यात यापुढे " प्राधिकृत कालवा अधिकारी " असा निर्देश करण्यात आला आहे) मत असेल तर आणि तसेच, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे त्याचे मत असेल तर, त्यास अशा क्षेत्रात जास्तीत जास्त फायदेशीर ठरेल अशाप्रकारे पाटबंधाऱ्यांद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी शेतातील पाट बांधण्याविषयी तरतूद करणाऱ्या पाटबंधारे योजनेचा मसुदा तयार करता येईल :

परंतु, जमीनधारकांपैकी किंवा ताबाधारकांपैकी निदान ५१ टक्के जमीनधारकांनी किंवा ताबाधारकांनी किंवा जमिनीपैकी निदान ५१ टक्के जमिनींच्या धारकांनी किंवा ताबाधारकांनी अशी योजना तयार करण्यास लेखी संमती दिली नसेल तर अशी कोणतीही योजना तयार करण्यात येणार नाही.

(२) योजनेच्या मसुद्यात पुढील तपशील अंतर्भूत असेल,—

(एक) ज्या क्षेत्रास अशी योजना लागू असेल ते क्षेत्र ;

(दोन) योजलेले शेतातील पाट आणि त्यांची सुयोग्य आखणी ;

(तीन) शेतातील पाट बांधण्यासाठी आणि अनुलग्न कामांसाठी ज्या क्षेत्राची आवश्यकता भासण्याचा संभव असेल ते अंदाजे क्षेत्र पाट बांधण्यासाठी जी जमीन ताब्यात घेणे आवश्यक असेल ती जमीन आणि खंड (एक) मध्ये नमूद केलेले क्षेत्र ;

(चार) शेतातील पाटाचा ज्या जमिनीला फायदा होणार असेल अशा जमिनींपैकी प्रत्येक जमिनीचा भूमापन क्रमांक व क्षेत्रफळ ; आणि अशा जमिनीच्या धारकांची किंवा ताबाधारकांची नावे ;

(पाच) ज्या कालव्यातून शेतातील पाटात पाणी नेण्यात येणार असेल तो कालवा ;

(सहा) बाब (चार) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रातील प्रत्येक जमीनधारकास किंवा ताबाधारकास ज्या कालावधीच्या आत कालव्यातून आपल्या जमिनीपर्यंत पाणी नेण्यासाठी संयुक्तपणे किंवा पृथकपणे पाट बांधता येईल तो कालावधी ;

(सात) शेतातील पाट बांधण्याचा अंदाजे खर्च ;

(आठ) शेतातील पाट बांधण्यासंबंधी प्रत्येक जमीनधारकाच्या किंवा ताबाधारकाच्या दायित्वाची मर्यादा ;

(नऊ) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

(३) प्राधिकृत कालवा अधिकारी अशा योजनेचा मसुदा राजपत्रात प्रसिद्ध करील आणि ज्या गावातून असा शेतातील पाट नेण्याचे योजले असेल अशा प्रत्येक गावात देखील असा मसुदा विहित केलेल्या रीतीने एका नोटिशीसह प्रसिद्ध करील आणि या नोटिशीमध्ये तो जमिनीच्या धारकांना किंवा ताबाधारकांना आणि अशा योजनेमुळे परिणाम होणाऱ्या सर्व व्यक्तींना त्यांच्या कोणत्याही सूचना किंवा हरकती अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत त्याच्याकडे लेखी सादर करण्यास सांगेल.

(४) नोटिशीत विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर प्राधिकृत कालवा अधिकारी पोट-कलम (३) अन्वये कोणत्याही हरकती व सूचना आलेल्या असल्यास, त्या विचारात घेऊन,—

(क) योजनेचा मसुदा फेरबदलासह किंवा त्याशिवाय मंजूर करील ;

(ख) मंजूर केलेली योजना (जिला " अंतिम योजना " असे म्हणण्यात येईल) राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि विहित करण्यात येईल अशा अन्य रीतीने प्रसिद्ध करील ; आणि

(ग) अशारीतीने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेची एक प्रत समुचित प्राधिकरणाकडे पाठवील.

**३५.** अंतिम योजना प्रसिद्ध करण्यात आल्यावर तीत नमूद करण्यात आलेल्या सर्व जमिनीच्या धारकांना व ताबाधारकांना ती बंधनकारक असेल, आणि त्या योजनेखालील शेतातील पाट विहित केलेल्या रीतीने बांधणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

*अंतिम योजनेखाली शेतातील पाट बांधणे धारकांवर बंधनकारक असणे.*

**३६.** कलम ३४ अन्वये शेतातील पाट बांधण्याच्या संबंधात कोणतीही चौकशी किंवा तपासणी करणे आवश्यक असेल तेव्हा, कलम १३ च्या तरतुदी शेतातील पाटांच्या संबंधातील अशा चौकशीच्या किंवा तपासणीच्या बाबतीत लागू होतील.

*कलम १३ च्या तरतुदी लागू असणे.*

**३७.** (१) प्राधिकृत कालवा अधिकारी लेखी नोटिशीद्वारे प्रत्येक धारकास व ताबाधारकास अंतिम योजनेन्वये तरतूद केल्याप्रमाणे शेतातील पाट बांधण्यास भाग पाडील.

*शेतातील पाट बांधण्यासंबंधी जमीनधारकास व ताबाधारकास नोटीस.*

(२) पोट-कलम (१) अन्वये द्यावयाची नोटीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशारीतीने देण्यात येईल.

**३८.** जमिनीचा कोणताही धारक किंवा ताबाधारक पूर्वोक्त नोटिशीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे अंतिम योजनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत शेतातील पाट बांधण्यात कसूर करील तर, प्राधिकृत कालवा अधिकारी त्या जमिनीच्या यथास्थिति, धारकाच्या किंवा ताबाधारकांच्या किंवा, दोघांच्या खर्चाने असा पाट बांधील.

*कालवा अधिकाऱ्यास शेतातील पाट बांधण्यास प्राधिकृत करण्याचा अधिकार.*

शेतातील पाट बांधून पूर्ण झाल्याचे परिणाम.

**३९.** (१) अंतिम योजनेत तरतूद केल्याप्रमाणे शेतातील पाटाचे बांधकाम यथोचितरीत्या पूर्ण होईल तेव्हा,—

(क) प्राधिकृत कालवा अधिकारी विहित नमुन्यात तशा अर्थाचे एक प्रमाणपत्र देईल, आणि

(ख) समुचित प्राधिकरण किंवा समुचित प्राधिकरणाने असा अधिकार प्रदान केला असल्यास प्राधिकृत कालवा अधिकारी, लेखी आदेशाद्वारे, शेतातील पाटाने व्यापलेली जमीन, पाटाचा लाभ मिळालेल्या सर्व जमीन धारकांकडे किंवा ताबाधारकांकडे हस्तांतरित करील ; आणि त्यानंतर, अशा रीतीने हस्तांतरित केलेली जमीन त्या पाटासह अशा धारकांकडे किंवा ताबाधारकांकडे निहित होईल, आणि कलमे २७ ते ३३ (दोन्ही धरून) मधील तरतुदी त्या ज्याप्रमाणे शेतातील पाटाच्या मालकांच्या बाबतीत लागू होतात त्याचप्रमाणे अशा धारकांना किंवा ताबाधारकांना लागू होतील.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, जमिनीची किंमत आणि अंतिम योजनेअन्वये पाट बांधण्याबाबत कोणत्याही जमीन धारकाने किंवा ताबाधारकाने द्यावयाचा खर्च त्यांच्याकडून वसूल करण्यासंबंधीच्या, समुचित प्राधिकरणाच्या अधिकारास बाधा येणार नाही.

शेतातील पाट बांधण्याचा खर्च, इत्यादी देण्याची पद्धती.

**४०.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून अंतिम योजनेअन्वये द्यावयाची कोणत्याही जमिनीची किंमत आणि पाट बांधण्याचा खर्च, असा प्रत्येक धारक, समुचित प्राधिकरण वेळोवेळी निश्चित करील अशा कालावधीत व अशा दराने ठोक रकमेत किंवा सरळ व्याजासह पाचपेक्षा अधिक होणार नाहीत इतक्या हप्त्यांत देईल.

(२) जेव्हा कोणत्याही जमीन धारकाने किंवा ताबाधारकाने स्वतःच्या खर्चाने शेतातील पाट बांधला असेल किंवा पाट बांधण्यासाठी आपल्या जमिनीचा कोणताही भाग उपलब्ध करून दिला असेल तेव्हा, प्राधिकृत कालवा अधिकारी त्या बांधकामाचे मूल्य किंवा यथास्थिति, अशा रीतीने उपलब्ध करून दिलेल्या जमिनीचे मूल्य ठरवील, आणि अशा रीतीने ठरविलेले मूल्य धारकाने किंवा ताबाधारकाने पोट-कलम (१) अन्वये द्यावयाच्या खर्चातून वजा करील.

सार्वजनिक हितासाठी योजना तयार करण्याकरिता निदेश देण्याचा समुचित प्राधिकरणाचा अधिकार.

**४१.** कलम ३४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, समुचित प्राधिकरणाच्या मते अशी योजना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास, समुचित प्राधिकरणास, निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या जास्तीत जास्त फायद्याच्या दृष्टीने पाटबंधाऱ्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी शेतातील पाटाच्या बांधकामाची तरतूद करणारी योजना तयार करण्याचा निदेश, कालवा अधिकाऱ्याला देता येईल, आणि त्यानंतर कलमे ३४ ते ४० (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी, त्या कलम ३४ अन्वये तयार केलेल्या योजनेच्या संबंधात जशा लागू होतात त्याप्रमाणे लागू होतील.

## शेतातील पाटासंबंधीच्या विवादांबाबत समझोता

शेतातील पाटांमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे परस्परांतील हक्क व दायित्वे यासंबंधीच्या विवादांबाबत समझोता.

**४२.** (१) दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये शेतातील पाटाचा उपयोग करणे तो बांधणे किंवा सुस्थितीत ठेवणे यांबाबत त्यांचे परस्परातील हक्क, किंवा दायित्वे यासंबंधी, किंवा पाटाच्या संयुक्त मालकांमध्ये असा पाट बांधण्याच्या किंवा तो सुस्थितीत ठेवण्याच्या खर्चातील त्यांच्या हिश्शासंबंधी किंवा अशा खर्चाकरिता त्यांनी पृथकपणे अंशदान केलेल्या रकमांसंबंधी किंवा कोणत्याही मालकाने स्वतःच्या हिश्श्याचे अंशदान देण्यात केलेल्या कसुरीसंबंधी विवाद उत्पन्न होईल तेव्हा अशा विवादाच्या बाबतीत असलेल्या कोणत्याही संबंधित व्यक्तीला, असा अर्ज स्वीकारण्यास यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडे विवादग्रस्त बाब नमूद करणारा लेखी अर्ज करता येईल.

(२) त्यानंतर कालवा अधिकारी, तो उक्त प्रकरणाची चौकशी ज्या दिनांकास सुरू करणार आहे तो दिनांक नमूद केलेली नोटीस अन्य हितसंबंधित व्यक्तींना देईल.

(३) जर सर्व हितसंबंधित व्यक्तींनी कालवा अधिकाऱ्यास लवाद म्हणून असल्यास लेखी संमती दिली तर, कालवा अधिकारी, त्यास योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

(४) अशी संमती न मिळाल्यास, कालवा अधिकारी ती बाब लगत वरच्या वरिष्ठ कालवा अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करेल. तो वरिष्ठ अधिकारी त्याबाबतीत चौकशी करील आणि त्यास योग्य वाटेल असा आदेश त्यावर देईल.

(५) विवादातील कोणत्याही पक्षाच्या हितसंबंधावर प्रतिकूल परिणाम करणारा कोणताही आदेश, अशा पक्षाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय देण्यात येणार नाही.

१९४२ चा मुंबई २८.

**४३.** मुंबई जमीन सुधारणा योजना अधिनियम, १९४२ यात अन्यप्रकारे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त त्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार बांधलेल्या शेतातील पाटांना या भागातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

सन १९४२ चा, मुंबई अधिनियम क्रमांक २८ या अन्वये बांधलेल्या शेतातील पाटांना या भागाच्या तरतुदी लागू नसणे.

## भाग पाच

### भूमी संपादन

कालवे आणि शेतातील पाट यांसाठी जमीन संपादन करणे.

**४४.** (१) कार्यकारी अभियंत्यापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या कालवा अधिकाऱ्याने केलेल्या अर्जावरून जर कोणत्याही वेळी, समुचित प्राधिकाऱ्याची अशी खात्री झाली की, नवीन कालव्याच्या किंवा कलम २४ अन्वये शेतातील नवीन पाटाच्या बांधकामासाठी किंवा विद्यमान कालवा सुस्थितीत ठेवण्यासाठी, त्यात सुधारणा करण्यासाठी किंवा तो वाढविण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन किंवा कोणत्याही जमिनीतील कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क किंवा हितसंबंध सक्तीने संपादन करील किंवा तो नष्ट करील तर, समुचित प्राधिकरणास, कराराद्वारे ती जमीन, तो हक्क किंवा हितसंबंध संपादन करता येईल किंवा राज्य शासनास, भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये ती जमीन संपादन करता येईल किंवा जिल्हा परिषदेस किंवा कंपनीस, अशी जमीन त्या अधिनियमान्वये संपादन करण्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल.

१८९४ चा १.

(२) जिल्हा परिषदेकडून किंवा कंपनीकडून असा अर्ज मिळाल्यानंतर, जर राज्य शासनाची अशी खात्री झाली की, अर्जात विनिर्दिष्ट केलेली जमीन, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये जमीन संपादन करण्याचे ठरविले तर, राज्य शासनास उक्त जमीन, हक्क किंवा हितसंबंध, याच्या संबंधात भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम ६ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, तशा आशयाची घोषणा राजपत्रात प्रसिद्ध करता येईल. अशा रीतीने प्रसिद्ध केलेली घोषणा, उक्त अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त कलमान्वये रीतसर केलेली घोषणा असल्याचे मानण्यात येईल.

१८९४ चा १.

(३) उक्त कलम ६ अन्वये घोषणा प्रसिद्ध केल्यावर, जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जमिनीच्या संपादनासाठी आदेश घेतील ; आणि त्या अधिनियमाच्या तरतुदी, भरपाईची रक्कम निश्चित करण्यास भरपाईच्या संविभाजनास आणि उक्त जमीन किंवा तीवरील हक्क किंवा हितसंबंध याच्या संपादनाशी संबंधित अशा इतर बाबींस लागू असतील. राज्य शासनास उक्त तरतुदी अशा जमिनीच्या संपादनाला किंवा असे हक्क किंवा हितसंबंध नष्ट करण्याला लागू असतील तेथवर, त्यांच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींसाठी नियम करता येतील.

(४) या अधिनियमात किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ यात एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (२) खालील घोषणा प्रसिद्ध झाल्यानंतर किंवा कलम २५, पोट-कलम (२) खालील अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर राज्य शासनास, पंधरा दिवसांहून कमी नाही एवढ्या कालावधीत (खाजगी वाटाघाटीद्वारे असेल, त्या व्यतिरिक्त) असा निदेश देता येईल की, जिच्या संबंधात अधिसूचना काढण्यात आली आहे अशा कोणत्याही जमिनीचा ताबा, याबाबतीत शासनाकडून यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात येईल, अशा कालवा अधिकाऱ्याद्वारे घेण्यात येईल आणि त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीवरील हक्क आणि हितसंबंध हे, निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून नष्ट होतील आणि असा ताबा घेण्यात आल्यावर, उक्त जमीन सर्व भारांपासून मुक्त, संपूर्णतया राज्य शासनाकडे निहित होईल : १८९४ चा १.

परंतु, या पोट-कलमाखाली कोणत्याही जमिनीचा ताबा घेण्यापूर्वी किंवा ताबा घेताना, जिल्हाधिकारी, हितसंबंध असलेल्या व्यक्तींस, अशा जमिनीवर उभी पिके, झाडे व संरचना असल्यास त्याबद्दल आणि अशा रीतीने जमिनीवरील त्याचा ताबा अचानक गेल्याने व भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम २४ मध्ये वर्जित न केलेल्या अशा गोष्टीमुळे त्याची जी कोणतीही हानी झाली असेल त्याबद्दल भरपाई देऊ करील, आणि अशी देऊ केलेली रक्कम स्वीकारण्यात न आल्यास अशी पिके, झाडे व संरचना यांचे मूल्य आणि अशा इतर हानीची रक्कम, उक्त अधिनियमाच्या तरतुदीन्वये जमिनीसाठी भरपाई देताना मंजूर करण्यात येईल. १८९४ चा १.

(५) या कलमाखाली कोणत्याही जमिनींच्या, हक्काच्या किंवा हितसंबंधाच्या संपादनाच्या प्रयोजनार्थ, भूमि संपादन अधिनियम, १८९४, हा, जमिनीचे बाजार मूल्य हे, या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये घोषणा ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिनांकास किंवा, यथास्थिति, कलम २५, पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिनांकास जमिनीचे जे बाजारमूल्य असेल त्याप्रमाणेच असेल, या फेरबदलास अधीन राहून लागू होईल. १८९४ चा १.

## भाग सहा

## पाणीपुरवठा

## प्रकरण एक

### पाणीपुरवठ्यासंबंधीच्या सर्वसाधारण तरतुदी

प्रकरण दोन ते पाचखालील पाणीपुरवठ्यास हे प्रकरण लागू करणे.

**४५.** या भागाची प्रकरणे दोन, तीन, चार आणि पाच खाली कालव्यातून पुरवण्यात येणाऱ्या पाण्याच्या बाबतीत या प्रकरणाच्यातरतुदी लागू होतील.

कालव्याच्या पाणीपुरवठ्याची पद्धत ; किमान पाणीपट्टी आकारण्याचा अधिकार.

**४६.** (१)(क) या भागाच्या प्रकरण दोन मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सिंचनाच्या किंवा सिंचनेतर प्रयोजनासाठी अर्ज केल्यावर ;

(ख) या भागाच्या प्रकरण तीनमध्ये तरतूद केल्याप्रमाणे घनफलात्मक आधारावर ;

(ग) या भागाच्या प्रकरण चारमध्ये तरतूद केल्याप्रमाणे जलसिंचनविषयक करारान्वये ; किंवा

(घ) या भागाच्या प्रकरण पाचच्या तरतुदीनुसार, असलेल्या योजनेखाली—

कालव्यातून पाणीपुरवठा करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क), (ख), (ग) किंवा (घ) अन्वये पाणीपुरवठा करण्याबद्दल, या भागाचे प्रकरण दोन, तीन, चार किंवा पाच यामध्ये तरतूद केलेल्या दरानुसार पाणीपट्टी देण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील जमिनीचे (जलप्रदाय क्षेत्रातील विहिरीद्वारे जलसिंचन होणाऱ्या जमिनी नसतील अशा), जे धारक, किंवा ताबाधारक (राज्य शासनाच्या आदेशाद्वारे असे हंगाम म्हणून ठरविण्यात आलेल्या) खरीप आणि रब्बी हंगामांमध्ये अशा कालव्यांमधून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या सुविधेचा लाभ घेत नसतील अशा सर्वांवर त्या हंगामांमध्ये लागू असलेल्या व अंमलात असलेल्या हंगामी पाणीपट्टीच्या ५० टक्क्यांइतकी पाणीपट्टी बसविण्यात येईल :

परंतु, मागणी केल्यानंतर, पाणी उपलब्ध करून देण्यात आले नाही तर अशी पाणीपट्टी बसविण्यात येणार नाही.

**४७.** (१) जमिनीमध्ये अधिक चांगली लागवड करण्यासाठी आणि पिकांच्या उत्पादनासाठी आणि कोणत्याही कालव्याच्या जलसंपत्तीचे यथोचित जतन व्हावे व तिचा वापर योग्य रीतीने व्हावा यासाठी, कालव्याच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या, जलप्रदाय क्षेत्रातील (अशा जलप्रदाय क्षेत्रातील विहिरींद्वारे जलसिंचन होणाऱ्या जमिनी नसतील अशा) जमिनीमध्ये ज्या पिकांची पेरणी, लावणी किंवा उत्पादन करावयाचे त्या पिकांचा प्रकार आणि ज्या मुदतीत अशा जमिनीमध्ये अशा पिकांची पेरणी, लावणी करावयाची किंवा उत्पादन काढावयाचे ती मुदत, या गोष्टींचे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नियमन करणे इष्ट आहे, याबद्दल समुचित प्राधिकाऱ्याची खात्री होईल त्याबाबतीत, समुचित प्राधिकाऱ्यास जमिनीचे गुणधर्म, हवामान, पर्जन्यमान आणि उपलब्ध पाणी या गोष्टी विचारात घेऊन,लेखी आदेशाद्वारे, तशा आशयाची घोषणा करता येईल. अशा आदेशास समुचित प्राधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा रीतीने, व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात येईल.

*कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील जमिनींमध्ये विनिर्दिष्ट मुदतीत पेरणी करणे, लावणी करणे किंवा पिकांचे उत्पादन काढणे या गोष्टींचे नियमन करण्याचा समुचित प्राधिकाऱ्याचा अधिकार.*

(२) अशी घोषणा केल्यानंतर, कालवा अधिकारी, समुचित प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने, तो ठरवील अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या नोटिशीद्वारे तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालव्याच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या जलप्रदाय क्षेत्रातील जमिनीमध्ये पेरावयाच्या, लावणी करावयाच्या किंवा उत्पादन काढावयाच्या पिकांचा प्रकार आणि ज्या मुदतीत किंवा मुदतीमध्ये अशा पिकांची पेरणी व लावणी करण्यात किंवा उत्पादन काढण्यात येईल ती मुदत, विनिर्दिष्ट करता येईल. कालवा अधिकारी त्यानंतर, कलम ५० व या कलमाच्या पोट-कलम (३) यांच्या तरतुदींना अधीन राहून, आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीत किंवा मुदतीमध्ये पेरणीसाठी, लावणीसाठी किंवा पिकांच्या उत्पादनासाठी कालव्यातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे विनियमन करील.

(३) राज्य शासनास, संबंधित कंपनीशी आणि जिल्हा परिषदेशी विचारविनिमय करून, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ती पिके व ज्या मुदतीत किंवा मुदतीमध्ये अशा पिकांची पेरणी व लावणी करता येईल किंवा उत्पादन काढता येईल ती मुदत किंवा त्या मुदती निश्चित करण्यासाठी आणि त्या प्रयोजनार्थ पाणीपुरवठ्याचे विनियमन करण्यासाठी नियम करता येतील. अशा नियमांत जलसिंचनाची मर्यादा निश्चित करण्यासाठी व कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील व जमिनीमध्ये निरनिराळ्या पिकांची पेरणी व लावणी करणे किंवा उत्पादन काढणे यांसाठी आणि अशी मर्यादा ठरविण्याकरता, ज्या गोष्टी विचारात घेण्यात येतील त्या गोष्टींसाठी, अशा योजनेस प्रसिद्धी

देण्यासाठी आणि हरकती व सूचना मागविण्यासाठी, तसेच ज्यांच्यावर योजनेचा परिणाम होणार असेल अशा व्यक्तींची सभा बोलावण्यासाठी तरतूद आणि या कलमांच्या तरतुदी अमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व आनुषंगिक किंवा पूरक बाबींसाठी तरतूद करता येईल.

(४) या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये, नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्यावर, कोणत्याही व्यक्तीने, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालव्याच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या जलप्रदाय क्षेत्रातील कोणत्याही जमिनीत, आणि तीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीत (अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेले पीक किंवा पिके यांव्यतिरिक्त) कोणतेही पीक पेरता येणार नाही किंवा त्याची लावणी करता येणार नाही किंवा त्याचे उत्पादन काढता येणार नाही किंवा त्याची पेरणी, लावणी करू देता येणार नाही किंवा उत्पादन काढू देता येणार नाही.

(५) या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या नोटिशीमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशी नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, समुचित प्राधिकरण नेमील अशा अधीक्षक अभियंत्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याकडे (किंवा तुल्य दर्जाचा म्हणून घोषित करण्यात आलेल्या कंपनीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याकडे) अपील करता येईल. अपील अधिकाऱ्यास, संबंधित पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, आदेश देता येईल ; आणि त्यानंतर ती नोटीस फेरबदलाशिवाय किंवा त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या मर्यादेपर्यंत फेरबदल केलेल्या स्वरूपात अमलात राहील.

पिकांच्या क्षेत्रावर कमाल मर्यादा निश्चित करण्याचा अधिकार.

**४८.** समुचित प्राधिकरणास, लेखी आदेशाद्वारे, कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील जमिनीवर, अशा कालव्यापासून मिळणाऱ्या पाण्यावर काढता येतील अशा पिकांचे क्षेत्र आणि अशा कालव्याच्या, जलप्रदाय क्षेत्रात असणाऱ्या विहिरीपासून मिळणाऱ्या पाण्यावर काढता येतील अशा, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या नगदी पिकांचे क्षेत्र यांची कमाल मर्यादा निश्चित करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये " नगदी पिके " याचा अर्थ, ऊस, ओलिताखालील कापूस, ओलिताखालील भुईमुग, विड्याची पाने, निंबुवर्गीय फळे, केळी, द्राक्षे, चिक्कू, हळद, सुपारी, तंबाखू (ओलिताखालील), आणि राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी इतर पिके असा आहे.

## पुरवठ्यासंबंधी तरतुदी

पाणीपुरवठा बंद करण्याचा अधिकार.

**४९.** कोणत्याही शेतातील पाटास होणारा पाणीपुरवठा किंवा अशा पुरवठ्याचा हक्क असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा पाणीपुरवठा पुढील गोष्टींव्यतिरिक्त अन्य बाबतीत बंद करण्यात येणार नाही :—

(क) सक्षम प्राधिकरणाने याबाबतीत रीतसर अधिकार दिलेल्या कालवा अधिकाऱ्याने आदेश दिलेले कोणतेही काम पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ असा पाणीपुरवठा जेव्हा व जोपर्यंत बंद करणे आवश्यक असेल त्याबाबतीत ;

(ख) ज्याद्वारे पाणीपुरवठा होत असेल असा कोणताही शेतातील पाट जेव्हा व जोपर्यंत, त्यामधून पाणी वाया जाणार नाही अशा रीतीने दुरूस्त स्थितीत ठेवण्यात येत नसेल त्याबाबतीत ;

(ग) पाणीपुरवठ्याचा हक्क असणाऱ्या इतर व्यक्तींच्या कायदेशीर मागण्यांनुसार त्यांना क्रमाक्रमाने पाणीपुरवठा करणे जेव्हा व जोपर्यंत आवश्यक असेल त्याबाबतीत ;

(घ) पाणी वाया जाण्यास किंवा, त्याच्या गैरवापरास प्रतिबंध करण्यासाठी पाणीपुरवठा जेव्हा व जोपर्यंत बंद करणे आवश्यक असेल त्याबाबतीत ;

(ङ) या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येणाऱ्या व ज्यांची योग्य नोटीस देण्यात येईल अशा कालावधीत ;

(च) कालवा अधिकारी साधनात बदल करीपर्यंत, जेव्हा व जोपर्यंत असा पुरवठा बंद करणे आवश्यक असेल त्याबाबतीत ;

(छ) कालव्याच्या पाण्याचा साठा करण्याच्या प्रयोजनार्थ असा पुरवठा जेव्हा व जोपर्यंत बंद करणे किंवा त्याचे नियमन करणे आवश्यक असेल त्याबाबतीत ;

(ज) कलम ४७, पोट-कलम (२) खालील नोटिशीच्या तरतुदींचे उल्लंघन करून जेव्हा व जोपर्यंत पेरणी, लावणी किंवा पिकांचे उत्पादन काढण्यासाठी कालव्याच्या पाण्याचा वापर करण्यात येत असेल त्याबाबतीत ;

(झ) समुचित प्राधिकरणाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही कारणामुळे जेव्हा व जोपर्यंत पाणीपुरवठा बंद करणे आवश्यक होईल त्याबाबतीत ;

(ञ) पाणीपट्टीची थकबाकी देण्याबद्दल फर्मावणारी नोटीस एखाद्या व्यक्तीवर रीतसर बजावण्यात आल्यानंतरदेखील अशा व्यक्ती अशी थकबाकी देत नसेल त्याबाबतीत ;

**५०.** कालव्याच्या पाण्याचा पुरवठा केवळ एका किंवा अधिक पिकांच्या सिंचनासाठीच करण्यात आला असेल तेव्हा, केवळ असे पीक किंवा अशी पिके तयार होईपर्यंतच अशा पाण्याचा वापर चालू ठेवण्याची व अशा पिकास किंवा अशा पिकांनाच पाण्याचा पुरवठा करण्याची परवानगी असल्याचे समजण्यात येईल.

पाणीपुरवठ्याचा कालावधी.

**५१.** (१) कोणत्याही जमिनीस, इमारतीस किंवा अन्य स्थावर मालमत्तेस कालव्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याबद्दलचा प्रत्येक करार हा, अशी जमीन, इमारत किंवा अन्य स्थावर मालमत्ता यांबरोबरच हस्तांतरणीय असेल, आणि अशी जमीन, इमारत किंवा अन्य स्थावर मालमत्ता यांचे हस्तांतरण होईल तेव्हा, तो असा हस्तांतरित झाला आहे असे गृहीत धरण्यात येईल :

पाणीपुरवठ्याचा करार हा, ज्या मालमत्तेच्या बाबतीत पुरवठा करण्यात येत असेल अशा मालमत्तेबरोबरच हस्तांतरणीय असेल, इत्यादी.

परंतु, एखाद्या पट्टेदारास जमीन पट्ट्याने देण्यात आल्यानंतर, अशा पट्ट्याने दिलेल्या कोणत्याही जमिनीस कालव्यातून पाणीपुरवठा करण्याचा पट्टेदाराच्या नावाने करण्यात आलेला करार हा, अशा जमिनीचे हस्तांतरण करण्यात आल्यावर तिच्याबरोबर हस्तांतरणीय नसेल व तो रद्द होईल ; व त्यानंतर समुचित प्राधिकरणास, प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे कोणत्याही जमिनीस किंवा, जमिनींना अशा कालव्याच्या पाण्याचा पूर्ण किंवा अंशतः पुरवठा मंजूर करता येईल.

(२) कोणत्याही कालव्याशी संबंध असलेल्या कोणत्याही कामाचा किंवा जमिनीचा उपयोग करण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, आणि पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही कराराच्या बाबतीत असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही कालव्याच्या पाण्याचा वापर करण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीला अशी परवानगी देण्यास यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय असा उपयोग करण्याचा आपला अधिकार विकता येणार नाही किंवा पोट भाड्याने देता येणार नाही किंवा अन्यथा हस्तांतरित करता येणार नाही.

[१][(३) (क) या अधिनियमात किंवा कोणतीही जमीन, इमारत किंवा अन्य स्थावर मालमत्ता यांना कालव्याचे पाणी पुरवण्याबाबतच्या कोणत्याही करारात किंवा त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा पाण्याचा उपसा करण्याकरिता कोणतेही यंत्र, यंत्रक किंवा साधनसामग्री किंवा कोणत्याही प्रकारचे अन्य उपकरण चालवण्यासाठी विजेचा पुरवठा करण्यासंबंधातील कोणत्याही करारात काहीही अंतर्भूत असले तरी, समुचित प्राधिकरणाने, त्याची कारणे लेखी नमूद करून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असेल तितक्या मर्यादेपर्यंत पाणीपुरवठा बंद करणे, किंवा अशा पाणीपुरवठ्याचे क्षेत्र कमी करणे विधिसंमत असेल, आणि त्या प्रयोजनासाठी त्यासंबंधात यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्याने पाण्याचा उपसा करण्याकरता वापरले जाणारे किंवा वापरले जाण्याची शक्यता असलेले कोणतेही यंत्र, यंत्रक, साधनसामग्री किंवा उपकरण संच काढून टाकणे किंवा काढून टाकण्याची व्यवस्था करणे आणि स्वतःहून वीज पुरवठा बंद करणे किंवा कमी करणे किंवा आदेशाद्वारे, लायसनधारकास किंवा अन्य प्राधिकरणास निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल तितक्या मर्यादेपर्यंत ग्राहकाचा वीज पुरवठा बंद किंवा कमी करण्याचा निदेश देणे विधिसंमत असेल. या पोट-कलमान्वये कालवा अधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही निदेशाचे तात्काळ पालन करणे लायसनधारकावर किंवा अन्य प्राधिकरणावर बंधनकारक असेल.

(ख) समुचित प्राधिकरण आणि कालवा अधिकारी, प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीत त्यांना योग्य वाटेल अशा रीतीने, यथास्थिति, अशा प्रकारे पाण्याचा किंवा विजेचा पुरवठा बंद किंवा कमी करण्यास प्रसिद्धी देईल.]

**प्रासंगिक पट्टी**

अनधिकृत-रीतीने पाण्याचा वापर करणारी व्यक्ती ओळखता येत नसेल त्यावेळचे दायित्व.

५२. शेतातील पाटातून पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचा वापर अनधिकृत रीतीने करण्यात येत असेल तर, आणि ज्या व्यक्तीच्या कृत्यामुळे किंवा हयगयीमुळे असा वापर करण्यात आला असेल ती व्यक्ती ओळखता येत नसेल तर,—

(क) ज्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या जमिनीवरून असे पाणी वाहिले असेल आणि अशा जमिनीस त्यापासून फायदा झाला असेल तर, अशी व्यक्ती किंवा अशा सर्व व्यक्ती, किंवा

(ख) त्यापासून कोणत्याही जमिनीस फायदा झाला नसेल तर, अशा पाटातून पुरवण्यात येणाऱ्या पाण्याच्या बाबतीत आकारणी केली जाण्यास योग्य असलेली व्यक्ती किंवा असलेल्या सर्व व्यक्ती, त्याबाबतीत केलेल्या नियमांन्वये असा वापर करण्याबद्दल जे आकार निश्चित करण्यात येतील असे आकार देण्यास पात्र असेल किंवा, यथास्थिती संयुक्तपणे पात्र असतील.

पाणी वाहून वाया जात असेल अशा वेळचे दायित्व.

५३. (१) कालव्यातून पुरवण्यात येणारे पाणी वाहून वाया जात असेल आणि ज्या व्यक्तीच्या कृत्यामुळे किंवा हयगयीमुळे अशा रीतीने पाणी वाहून वाया जाऊ दिले गेले असेल, अशी व्यक्ती चौकशीनंतर सापडत नसेल तर, अशा कालव्यातून पुरविण्यात येणाऱ्या पाण्याच्या बाबतीत जी व्यक्ती किंवा ज्या सर्व व्यक्ती आकारणीयोग्य असतील अशी व्यक्ती किंवा अशा सर्व व्यक्ती, त्या बाबतीत कलम ११४ खाली केलेल्या नियमान्वये, अशा रीतीने वाया गेलेल्या पाण्याच्या बाबतीत जे आकार निश्चित करण्यात येतील असे आकार देण्यास पात्र असेल किंवा, यथास्थिति संयुक्तपणे पात्र असतील.

(२) या व निकटपूर्ववर्ती कलमान्वये उद्‌भवणाऱ्या सर्व प्रश्नांचा निर्णय कलम १०४ च्या तरतुदींना अधीन राहून, याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडून केला जाईल.

[१] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, याच्या कलम २ द्वारे मूळ पोट-कलम ३ ऐवजी ३ (क)(ख) दाखल करण्यात आले.

**५४.** पाण्याचा अनधिकृत वापर केल्याबद्दलचे किंवा ते वाया जाऊ दिल्याबद्दलचे सर्व आकार, असा वापर केल्यामुळे किंवा वाया जाऊ दिल्यामुळे झालेल्या कोणत्याही शास्तीसह, शिवाय आणखी पाणीपट्टी म्हणून वसूल करता येतील. शास्तीसह आकार वसुली-योग्य असणे.

## पाझरणे व गळती याबद्दल पट्टी

**५५.** (क) जलसिंचनासाठी कालव्याच्या पाण्याचा प्रत्यक्ष पुरवठा केला असता जितका फायदा झाला असता तितका फायदा जिला एखाद्या कालव्यातून पाणी पाझरल्यामुळे किंवा पाण्याची गळती झाल्यामुळे मिळत असेल किंवा पृष्ठभागावरील वाहत्या पाण्यामुळे प्राप्त होत असेल अशा लागवडीखालील कोणत्याही जमिनीवर, किंवा पाझरणाऱ्या पाण्याचा फायदा मिळणारी जमीन पाणीपट्टीस पात्र असणे.

(ख) जिला [१][कालव्याच्या कोणत्याही बाजूला कालव्याच्या निकटतम हद्दीपासून ३५ मीटर अंतराच्या आंत असलेल्या विहिरीच्या सहाय्याने] जलसिंचन होत असेल अशा लागवडीखालील कोणत्याही जमिनीवर खंड (क) खाली येणाऱ्या लागवडीखालील जमिनीच्या बाबतीत पिकासाठी किंवा ज्यामध्ये कालव्यात पाणी सोडण्यात येते अशा हंगामासाठी याच प्रकारचा प्रत्यक्ष पाणीपुरवठा करण्याकरिता सामान्यतः जी पाणीपट्टी आकारण्यात आली असती, त्या पाणीपट्टीहून अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल आणि खंड (ख) खाली येणाऱ्या लागवडीखालील जमिनीच्या बाबतीत समुचित प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, अशा पट्टीच्या निम्म्याहून अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, या कलमान्वये आकारणी करण्यात आलेली जमीन ही कालव्यापासून जलसिंचन होणारी जमीन असल्याचे मानण्यात येईल.

**५६.** (१) ज्यास एखाद्या कालव्यातून पाझरलेले पाणी मिळत असेल असा कोणताही नैसर्गिक ओढा किंवा कृत्रिम नाली यातून जलसिंचनाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर अशा प्रयोजनासाठी कालव्यामधून पाणीपुरवठा केला असता तर सामान्यतः जी पाणीपट्टी आकारण्यात आली असती त्या पाणीपट्टीपेक्षा अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल ; आणि [२][कालव्याच्या कोणत्याही बाजूस कालव्याच्या निकटतम हद्दीपासून ३५ मीटर अंतराच्या आत असलेल्या विहिरीतून] अशा प्रयोजनांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यावर, समुचित प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, अशा पट्टीच्या निम्म्याहून अधिक नसेल इतकी पाणीपट्टी आकारण्यात येईल. पाझरलेले पाणी सिंचनेतर प्रयोजनांसाठी वापरण्याबद्दल पाणीपट्टी बसविणे.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी कोणत्याही गावाच्या रहिवाशांनी केवळ घरगुती प्रयोजनांसाठी वापर केलेल्या अशा प्रवाहातील, नालीतील किंवा विहिरीतील पाण्यास लागू होणार नाहीत.

# प्रकरण दोन

## अर्ज केल्यावर पाणीपुरवठा करणे

**५७.** (१) कोणत्याही कालव्यामधून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे विनियमन त्याबाबतीत केलेल्या नियमांनुसार करण्यात येईल. अशा नियमांमध्ये, विहित दिनांकापूर्वी पाणीपुरवठ्याकरिता अर्ज मागविण्याची व पाण्याची उपलब्धता, जिच्यासाठी पाणीपुरवठा करण्यात यावयाचा असेल अशा जमिनीचे एकूण क्षेत्रफळ, अर्जदारांचा पाणीपट्टी देण्यातील नियमितपणा कालव्याच्या पाणीपुरवठ्याचे विनियमन.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२, याच्या कलम २ अन्वये " कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रात किंवा कालव्याचा कोणत्याही बाजूस ३५ मीटर अंतराच्या आत खोदण्यात आलेल्या विहिरीतील पाण्यामुळे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये " कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रात खोदलेल्या विहिरीतील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

जमिनींमध्ये काढण्यात यावयाची पिके व विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही संबंधित बाबी असल्यास त्या बाबी विचारात घेऊन, असा पुरवठा मंजूर करण्याची तरतूद करता येईल.

(२) मंजूर पुरवठा हा, एकतर या प्रकरणात तरतूद केल्याप्रमाणे क्षेत्रफळाच्या आधारावर किंवा या भागाच्या प्रकरण तीनमध्ये तरतूद केल्याप्रमाणे परिमाणमापी आधारावर करता येईल.

पाणीपुरवठ्यासाठी अर्ज करणे.

५८. (१) एखाद्या कालव्यातून पाणीपुरवठा मिळविण्यास इच्छुक असणारी प्रत्येक व्यक्ती असे अर्ज स्वीकारण्यास यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडे याबाबतीत राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात तशा अर्थाचा लेखी अर्ज सादर करील. कालवा अधिकारी, असे अर्ज करण्यामध्ये स्वारस्य असलेल्या अशा सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता त्यास योग्य वाटेल अशा रीतीने यथोचितरीत्या अधिसूचित करील अशा दिनांकापूर्वी असे अर्ज सादर करण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये वार्षिक किंवा हंगामी तत्त्वावर पाणीपुरवठा मिळण्यासाठी केलेला अर्ज मिळाल्यानंतर कालवा अधिकारी त्याची ताबडतोब पोच देईल. अर्ज विहित नमुन्यानुसार नसेल तर कालवा अधिकारी तो अर्जदाराकडे परत करू शकेल आणि अर्जदारास तो विहित नमुन्यात, यथोचितरीत्या पूर्ण करून पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या दिनांकापूर्वी पुन्हा सादर करण्याचा निदेश देऊ शकेल. पूर्वोक्त दिनांकापूर्वी यथोचितरीत्या पूर्ण करून सादर केलेल्या अर्जाची देखील रीतसर पोच देण्यात येईल.

(३) कालवा अधिकारी असा प्रत्येक अर्ज पूर्वोक्तप्रमाणे अधिसूचित केलेल्या अंतिम दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत निकालात काढील आणि कालवा अधिकाऱ्याचा निर्णय कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर आणि कालवा अधिकारी निर्देश देईल अशा अन्य एका किंवा अनेक जागा अधिसूचित करण्यात येईल आणि अशा रीतीने अधिसूचित केलेला निर्णय हा, अशा निर्णयाची सर्व अर्जदारांना दिलेली नोटीस असल्याचे मानण्यात येईल.

(४) पूर्वोक्तप्रमाणे कालवा अधिकारी त्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर आपला निर्णय अधिसूचित करण्यात कसूर करील तर अर्जदारास, इतर अर्जदारांना ज्या शर्तीवर कालव्यामधून पाणीपुरवठा मंजूर केला असेल त्याच शर्तींना अधीन राहून, अर्जामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालव्यामधून पाणी घेण्यास परवानगी देण्यात आलेली आहे असे मानण्यात येईल.

(५) वार्षिक किंवा हंगामी तत्त्वाव्यतिरिक्त अन्य प्रकारे पाणीपुरवठा होण्यासाठी केलेला अर्ज मिळाल्यानंतर कालवा अधिकारी विहित करण्यात येईल अशा रीतीने अर्जावर कार्यवाही करील.

(६) जलसिंचनाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनांसाठी वापरण्यात यावयाच्या पाणीपुरवठ्यासाठी अर्ज करण्यात येईल त्याबाबतीत, कालवा अधिकाऱ्यास, समुचित प्राधिकरणाच्या मंजुरीने समुचित प्राधिकरणाद्वारे प्रत्येक प्रकरणी त्यास अधिकार प्रदान करण्यात येईल त्याप्रमाणे पाणीपुरवठ्याची मर्यादा, त्यावरील नियंत्रण व पाणीपुरवठ्याची मोजणी यासंबंधीच्या विशेष शर्ती व निर्बंध यांस अधीन राहून, अशा प्रयोजनासाठी पाणी घेण्यास परवानगी देता येईल.

## पुरवठा पट्टी

कालव्यातील पाण्याचा पुरवठा केल्याबद्दल पट्टी निर्धारित करणे.

५९. (१) या प्रकरणांन्वये जलसिंचनाच्या किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी पुरविण्यात येणाऱ्या कालव्याच्या पाण्याबद्दल समुचित प्राधिकरणाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल अशी पट्टी बसविण्यात येईल :

परंतु, कंपनीकडून किंवा जिल्हा परिषदेकडून बसविण्यात आलेली पाणीपट्टी ही राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने निर्धारित करण्यात येईल.

(२) ती पट्टी ज्या व्यक्तीच्या अर्जावरून पुरवठा मंजूर करण्यात आला असेल अशा व्यक्तीकडून, किंवा अशा रीतीने पुरविण्यात आलेल्या पाण्याचा वापर जी व्यक्ती करत असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून देय असेल.

## प्रकरण तीन

### धनपरिमाण आधारावर पाणीपुरवठा

६०. (१) ज्या कालव्यामधून पुरवठा केल्या जाणाऱ्या पाण्याच्या मोजणीसाठी साधनाची तरतूद केलेली आहे अशा कालव्यामधून प्रकरण दोन अन्वये ज्यांना पाणीपुरवठा मंजूर करण्यात आला आहे अशा जमिनींपैकी एकावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतक्या जमिनींचे धारक किंवा ताबाधारक किंवा धारक किंवा ताबाधारक यांच्यापैकी एकावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतके धारक किंवा ताबाधारक, धनपरिमाण आधारावर पाणीपट्टी देऊन पाणी घेण्यास व या प्रकरणाच्या तरतुदीनुसार त्या कालव्याच्या पाण्याच्या वाटपासाठी अशा सर्व धारकांची किंवा, ताबाधारकांची पाणी समिती बनविण्यास याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास आपली लेखी संमती देतील, त्याबाबतीत अशी संमती ज्यांना त्या कालव्यामधून पाणीपुरवठा करण्यात येईल अशा सर्व धारकांवर किंवा ताबाधारकांवर बंधनकारक असेल.

धनपरिमाण आधारावर पाणीपुरवठा करणे आणि पाणी समिती स्थापन करणे.

(२) त्यानंतर, कालवा अधिकारी, धनपरिमाणी आधारावर पाणीपट्टी देऊन अशा कालव्यामधून पाणी घेण्यास अशा जमिनीच्या धारकांना व ताबाधारकांना लेखी आदेशाद्वारे फर्मावील व अशा धारकांना व ताबाधारकांना आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत, पाणी समिती बनविण्याचा निदेश देईल.

(३) धारक व ताबाधारक यांनी पाणी समिती बनविण्यात कसूर केली तर, कालवा अधिकारी, अशा धारकांशी व ताबाधारकांशी विचारविनिमय करून पाणी समिती बनवील.

(४) पाणी समितीमध्ये, पाच व्यक्तींचा समावेश असेल, ज्यापैकी एक शाखा अधिकारी किंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती असेल व उरलेल्या चार व्यक्ती पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या जमिनींच्या धारकांकडून व ताबाधारकांकडून त्यांच्यामधून वेळोवेळी नियुक्त केल्या जातील. शाखा अधिकारी किंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती समितीला तांत्रिक किंवा अन्य स्वरुपाचे मार्गदर्शन किंवा सहाय्य करील आणि तिला सर्व धारकांना व ताबाधारकांना पाण्याचे योग्यप्रकारे संविभाजन व वितरण सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने तिच्या विचारविमर्शात मार्गदर्शन करील.

(५) पाणी समिती वेळोवेळी, बैठक घेऊ शकेल व आपले कामकाज चालविण्यासाठी तिला योग्य वाटेल अशी कार्यपद्धती अनुसरु शकेल.

(६) जलसिंचनाच्या प्रयोजनांसाठी धारक व ताबाधारक यांना पुरवण्यात येणाऱ्या कालव्याच्या पाण्याबद्दल समुचित प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल अशी पाणीपट्टी बसविण्यात येईल :

परंतु, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने असेल त्याव्यतिरिक्त, कोणतीही जिल्हा परिषद किंवा कंपनी अशी कोणतीही पाणीपट्टी निर्धारित करणार नाही.

(७) पाणी समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) मोजणीच्या साधनाच्या ठिकाणी पाण्याचे परिमाण मोजणे व ते घेणे आणि त्याचे तिच्या सदस्यांमध्ये योग्य संविभाजन व वाटप सुनिश्चिती करणे ;

(दोन) पाण्याच्या वाटपासंबंधातील तक्रारी स्वीकारणे व त्यासंबंधात चौकशी करणे व ते सुव्यवस्थित करण्यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करणे ;

(तीन) पाण्याच्या अनधिकृत वापरास किंवा अपव्ययास प्रतिबंध करण्यासाठी सर्व प्रयत्न करणे ;

(चार) कालवा अधिकाऱ्यास, त्याची कर्तव्ये पार पाडण्यामध्ये व पाण्याच्या अनधिकृत वापराचा तपास लावण्यामध्ये सहाय्य करणे ;

(पाच) या अधिनियमाच्या तरतुदीनुसार केवळ मंजूर पिके व क्षेत्रे हीच सिंचनाखाली आणली जात असल्याचे सुनिश्चित करणे.

(८) पाणी समितीच्या कोणत्याही आदेशामुळे किंवा निर्णयामुळे एखादा धारक किंवा ताबाधारक व्यथित झाला तर, अशा धारकाला किंवा ताबाधारकाला असा आदेश किंवा निर्णय मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कार्यकारी अभियंत्याकडे अपील सादर करता येईल. अशा अपिलामधील कार्यकारी अभियंत्याचा निर्णय अंतिम व निर्णायक राहील आणि कोणत्याही न्यायालयामध्ये तो निर्णय प्रश्नास्पद करता येणार नाही.

## प्रकरण चार

## सिंचन करारानुसार पाणीपुरवठा

सिंचन करार करण्याचा अधिकार.

**६१.** भाग सहाचे प्रकरण एक याच्या तरतुदींना अधीन राहून, करारांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वर्षांच्या कालावधीसाठी सिंचनासाठी पाणीपुरवठा करण्याकरिता समुचित प्राधिकरण व धारक आणि ताबाधारक, यांच्यामध्ये, या प्रकरणाच्या तरतुदींनुसार करार करता येतील. अशा करारांना " सिंचन करार " असे संबोधण्यात येईल.

सिंचन कराराची व्याप्ती.

**६२.** सिंचन करार हा,—

(क) ज्यांना " करारांतर्गत पिके " असे संबोधण्यात येते अशा एका किंवा अधिक विनिर्दिष्ट पिकांच्या सिंचनासाठी असेल ;

(ख) एखाद्या गावातील किंवा कोणत्याही अन्य विनिर्दिष्ट क्षेत्रातील कालव्याच्या सिंचन लाभ क्षेत्राखालील करारांतर्गत पिकांची लागवड करण्यात येणाऱ्या सर्व जमिनींच्या धारकांशी व ताबाधारकांशी करण्यात येईल ;

आणि

(ग) या प्रकरणाच्या तरतुदीनुसार यथोचितरीत्या करण्यात आला असेल तेव्हा तो कराराच्या अटीनुसार पुढील जमिनीच्या धारकांवर व ताबाधारकांवर बंधनकारक असेल—

(एक) ज्या वेळेपासून करार अंमलात आला असेल त्या वेळेपासून गावातील किंवा इतर कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात कराराखालील पिकांची लागवड करण्यात येणाऱ्या कालव्यांच्या सिंचनयोग्य क्षेत्रातील (ओलिताखालील जमिनी धरून) सर्व जमिनी :

परंतु, मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एक करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदीं अन्वये कोणत्याही जमिनीच्या बा एकत्रीकरणाची योजना कायम करण्यात आली असेल त्याबाबतीत, सिंचन करार हा, ज्या वर्षा धारक व ताबाधारक, कोणतेही असल्यास, त्यांच्याकडे धारण जमिनीचा ताबा देण्यात आले असेल अशा वर्षापासून— १९४७ चा मुंबई ६३.

(क) लागवडीखाली असण्याचे बंद झालेल्या जमिनींच्या बदल्यात नव्याने मिळालेल्या सर्व लागवडयोग्य जमिनीचे धारक व ताबाधारक कोणतेही असल्यास त्यांच्यावर बंधनकारक असेल;

(ख) लागवडीखाली असण्याचे बंद झालेल्या सर्व जमिनीचे धारक व ताबाधारक, कोणतेही असल्यास, त्यांच्यावर बंधनकारक असण्याचे बंद होईल ;

(दोन) कराराच्या कालावधीत कोणत्याही वेळी कराराखाली पिकांची लागवड करण्यात आली असेल अशा जमिनींसह उप-खंड (एक) मध्ये वर्णन केलेल्या सर्व जमिनी.

**स्पष्टीकरण.**—धारकांच्या व ताबाधारकांच्या ज्या जमिनींच्या, संबंधात करार बंधनकारक असेल अशा जमिनीस "कराराखालील जमीन" असे संबोधण्यात येईल.

६३. गावातील किंवा कोणत्याही अन्य विनिर्दिष्ट क्षेत्रातील कालव्याच्या सिंचन योग्य क्षेत्रातील कराराखालील पिकांची लागवड करण्यात येणाऱ्या सर्व जमिनींच्या, दोन-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या जमिनींच्या धारकांनी व ताबाधारकांनी किंवा धारक व ताबाधारक यांच्यापैकी पंच्याण्णव टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या धारकांनी व ताबाधारकांनी या प्रकरणाच्या तरतुदीनुसार प्रस्तावित सिंचन करारास आपली संमती दिली असेल त्याबाबतीत, प्रस्तावित करार हा, या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कालवा अधिकाऱ्याकडून स्वीकारण्यात आला असल्यास, अशा गावातील किंवा इतर कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रातील कालव्याच्या सिंचनयोग्य क्षेत्रातील कराराखालील पिकांची लागवड करणाऱ्या सर्व जमिनींच्या धारकांवर व ताबाधारकांवर बंधनकारक असलेला सिंचन करार असल्याचे मानण्यात येईल. करार केव्हा करता येईल.

६४. (१) कोणत्याही जमिनीचा धारक नसणाऱ्या ताबाधारकाचा हक्क, अशा जमिनीस लागू असलेल्या सिंचन कराराच्या दिनांकानंतरचे पुढील कृषि वर्ष संपल्यावर किंवा तत्पूर्वी संपत असेल अशा प्रकारचा असेल त्याबाबतीत, अशा जमिनीच्या संबंधात, धारकाने अशा करारास दिलेली संमती अशा ताबाधारकावर बंधनकारक असेल. धारकाव्यतिरिक्त इतर ताबाधारकाच्या ताब्यात जमीन असेल त्याबाबतीत करारास संमती आवश्यक असणे.

(२) कोणत्याही जमिनीचा धारक नसणाऱ्या ताबाधारकाचा हक्क, अशा जमिनीस लागू असलेल्या सिंचन कराराच्या दिनांकानंतरचे पुढील कृषि वर्ष संपल्यानंतर चालू राहील अशा प्रकारचा असेल त्याबाबतीत, धारकाच्या संमतीच्या विधिग्राह्यतेसाठी अशा ताबाधारकांची संमती आवश्यक असेल.

६५. (१) कालवा अधिकाऱ्याने, गावात सिंचन करार करण्याचे त्याने प्रस्तावित केले आहे अशा अर्थाची नोटीस गावात किंवा विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही संबंधित क्षेत्रात प्रसिद्ध केल्याशिवाय, कलम ६३ च्या तरतुदी लागू होणार नाहीत. करार करण्यापूर्वी नोटीस प्रसिद्ध करणे.

(२) अशी नोटीस गावातील किंवा, यथास्थिती, अशा विनिर्दिष्ट क्षेत्रातील एखाद्या ठळक जागी लेखी प्रसिद्ध करण्यात येईल व करारास अंतिम स्वरूप देण्यापूर्वी कमीत कमी चौदा दिवस आधी दवंडी पिटवून जाहीर करण्यात येईल.

उपसा करून सिंचित होणाऱ्या जमिनीचा समावेश करणे.

६६. एखाद्या कालव्याच्या सिंचन योग्य क्षेत्राखाली नसेल परंतु, कालवा किंवा शेतातील पाट यामधील पाण्याचा उपसा करण्यासाठी बनवलेल्या कोणत्याही यांत्रिक साधनाद्वारे कालव्यातून किंवा पाटातून जी सिंचित करणे शक्य आहे अशा जमिनीच्या धारकास अशा जमिनीचा सिंचन करारात समावेश करण्यासाठी कालवा अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल व त्याचा अर्ज मंजूर करण्यात आला तर, त्यास अशा कराराच्या ज्या अटी लागू होत असतील त्यानुसार पाणीपुरवठा मिळण्याचा हक्क असेल.

पाणी-पुरवठ्यासाठी आकार.

६७. सिंचन कराराखालील पाणीपुरवठ्यासाठी समुचित प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल अशा पाणीपट्टीनुसार आकार बसविण्यात येतील :

परंतु, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने असेल त्याशिवाय, अशी कोणतीही पाणीपट्टी कोणत्याही जिल्हा परिषदेकडून किंवा कंपनीकडून निश्चित करण्यात येणार नाही.

सिंचन करारामुळे पडणारे दायित्व.

६८. पाणीपट्टी देण्याच्या दायित्वात साधारणतः लागू असणाऱ्या कोणत्याही आनुषंगिक गोष्टीबरोबरच, सर्व सिंचन करार हे पुढील अंगभूत गोष्टीस अधीन असतील :—

(क) त्या अन्वये देय असलेला कालवा महसूल—

(एक) जर ते प्रकरण कलम ६२, खंड (क) (एक) खाली येत असेल तर, कराराखालील सर्व जमिनीवर-मग ती पेरलेली असो किंवा नसो- व सिंचित केलेली असो किंवा नसो-प्रत्येक वर्षी, व

(दोन) जर ते प्रकरण कलम ६२, खंड (क) (दोन) खाली येत असेल तर, कराराखालील सर्व जमिनींवर, तीमध्ये कोणत्याही वर्षी कराराखालील पिकापैकी, कोणतीही पिके पेरलेली असतील तर– मग ती सिंचित असो किंवा नसो– त्या वर्षी, देय असेल.

(ख) कोणत्याही जमिनीवरील कोणत्याही वर्षासाठी देय असलेला कालवा महसूल हा, ताबाधारकाकडून किंवा त्याने तो देण्यात कसूर केल्यास, अशा जमिनीच्या धारकाकडून वसूल करण्यात येईल.

(ग) उपलब्ध पाण्याचे प्रमाण कमी पडेल तेव्हा किंवा पाणी पूर्ण प्रमाणात सोडण्यात आले तर कालव्यास हानी पोहोचण्याचा संभव असेल तेव्हा कोणत्याही वेळी याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेला कोणताही कालवा अधिकारी ठरवील त्या रीतीने, पाणीपुरवठ्याचे विनियमन करता येईल.

(घ) सिंचनासाठी होणाऱ्या पाणीपुरवठ्यात खंड पडून किंवा तूट पडून किंवा असा पुरवठा जादा होऊन उद्‌भवणाऱ्या कोणत्याही नुकसानीबद्दलच्या भरपाईची कोणतीही मागणी समुचित प्राधिकरणाविरुद्ध करता येणार नाही :

परंतु, पिके आली नसतील किंवा कालव्याच्या प्रमुख बांधकामातील किंवा विवरण व्यवस्थेतील दोषांमुळे पाणीपुरवठा झाला नसेल त्याबाबतीत, पाणीपुरवठ्यासाठी सिंचन करारान्वये आकारण्यात येणाऱ्या पट्टीपासून माफी देण्याची तरतूद करण्यासाठी या अधिनियमाखाली नियम करता येईल ; आणि

(ङ) पाणथळ जमीन ज्या गावात किंवा कोणत्याही इतर विनिर्दिष्ट क्षेत्रात असेल त्या गावाच्या किंवा विनिर्दिष्ट क्षेत्राच्या संबंधात केलेल्या सिंचन करारातील कालव्यांच्या सिंचनयोग्य क्षेत्राखालील अशी जमीन धारण करणाऱ्यास, सिंचन कराराखालील पाणीपुरवठ्यासाठी आकारणी करण्यात येणाऱ्या पट्टीतून या अधिनियमाखाली केलेल्या नियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशी वजात कोणतीही असल्यास ती मिळण्याचा हक्क असेल.

६९. (१) समुचित प्राधिकरण व सिंचन करार रद्द करण्याच्या वेळेस असलेले, कराराखालील जमिनीच्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतक्या जमिनीचे धारक व ताबाधारक, किंवा त्यांच्या पंचाण्णव टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतके धारक व ताबाधारक यांच्या परस्पर संमतीने सिंचन करार रद्द करता येईल. परस्पर संमतीने करार रद्द

(२) कलम ६४ आणि ६५ च्या तरतुदी, या करार रद्द करण्यास दिलेली संमती, असा करार करण्यासाठी दिलेली संमती असल्याप्रमाणे सिंचन करार रद्द करण्यास लागू होतील.

७०. (१) त्या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यांच्या मते धारकांनी व ताबाधारकांनी सिंचन करारानुसार आपल्या शेतातील पाट सुस्थितीत ठेवण्यात कसूर केली असेल तर, कलम ३१ च्या तरतुदी, त्या कलमाखालील शेतातील पाटाच्या संबंधात जशा लागू होतात, त्याचप्रमाणे लागू होतील. धारक व ताबाधारक यांनी आपल्या शेतातील पाट सुस्थितीत ठेवण्यात दोन किंवा अधिक प्रसंगी कसूर केली तर, या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेला कालवा अधिकारी, नोटीस देऊन समुचित प्राधिकरणांच्या पूर्वमान्यतेने कोणत्याही वेळी सिंचन करार रद्द करू शकेल. शेतातील पाट सुस्थितीत ठेवण्यात कसूर केल्याबद्दल करार रद्द होणे.

(२) कालवा अधिकाऱ्याचा या कलमाखाली आदेश हा लेखी असेल आणि तो संबंधित गावातील किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रातील कोणत्याही ठळक ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल ; आणि दवंडी पिटवून तो जाहीर करण्यात येईल आणि त्यानंतर सिंचन करार अंमलात असण्याचे बंद होईल.

७१. समुचित प्राधिकरणाच्या पूर्वमंजुरीने या बाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास, कोणत्याही वेळी, कोणताही सिंचन करार रद्द करता येईल आणि अशा प्रकरणी त्या कराराखाली कोणत्याही जमिनीच्या संबंधातील हानीबद्दलची भरपाई ही अशा जमिनीच्या संबंधात कराराच्या उर्वरित मुदतीसाठी जो देय झाला असता अशा कालवा महसुलाच्या रकमेइतकी असेल. अशा भरपाईचे वितरण व प्रदान कलम ११४ खाली केलेल्या नियमानुसार करण्यात येईल. करार रद्द करण्याचा सर्वसाधारण अधिकार.

## प्रकरण पाच

## योजनेखालील पाणीपुरवठा

७२. (१) समुचित प्राधिकरणाच्या मते कालव्यामुळे २०० हेक्टरपेक्षा (५०० एकरापेक्षा) अधिक नसेल इतके क्षेत्र सिंचित होण्याची शक्यता असेल त्याबाबतीत, अशा कालव्यातून सार्वजनिक हितार्थ अधिक काटकसरीने पाणीपुरवठ्याची तरतूद करण्याच्या दृष्टीने समुचित प्राधिकरणास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा कालव्यातून अशा जमिनींना पाणीपुरवठा करण्यासाठी एक प्रारुप योजना तयार करता येईल. या प्रारुप योजनेत कालव्याची व्यवस्था व त्यातील पाण्याचे वाटप कलम ७४ अन्वये नेमलेल्या पाणी समितीच्या हवाली करण्यासंबंधीची तरतूद करण्यात येईल. योजनेखालील पाणीपुरवठा.

(२) प्रारुप योजनेत पुढील तपशील समाविष्ट असेल :—

(क) ज्या क्षेत्रास योजना लागू होते ते क्षेत्र ;

(ख) अशा क्षेत्रात अंतर्भूत असलेल्या जमिनीचे भूमापन क्रमांक आणि त्यांच्या धारकांची ताबाधारकांची नावे ;

(ग) अशा जमिनींना ज्या कालावधीत पाणी पुरवण्यात येईल तो किंवा ते कालावधी ;

(घ) त्यावर काढावयाची परवानगी देण्यात येईल असे पीक किंवा अशी पिके ;

(ङ) योजनेत अंतर्भूत असलेल्या प्रत्येक जमिनीला त्या पाणीपट्टीने पाणी पुरवण्यात येईल ती पट्टी :

परंतु, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने असेल त्याशिवाय अशी कोणतीही पाणीपट्टी, कोणत्याही जिल्हा परिषदेकडून किंवा कंपनीकडून निर्धारित करण्यात येणार नाही ;

(च) समुचित प्राधिकरणाने कालव्याच्या व्यवस्थापनाबद्दल पाणी समितीस द्यावयाची रक्कम ;

(छ) योजनेचा मसुदा राजपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी ; आणि

(ज) अशा योजनेवरील आक्षेप किंवा सूचना सादर करण्यासाठी, पोट-कलम (३) खालील वैयक्तिक नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांपेक्षा कमी नसलेला कालावधी ठरविणे.

(३) अशी अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर कालवा अधिकारी अशा अधिसूचनेचा परिणाम होण्याची शक्यता असलेल्या धारकावर आणि ताबाधारकावर शक्य तेवढ्या लवकर वैयक्तिक नोटीस बजावील.

(४) पूर्वोक्तप्रमाणे निश्चित केलेल्या कालावधीत आलेल्या असतील असे आक्षेप व सूचना, कोणत्याही असल्यास त्यांवर विचार केल्यानंतर, समुचित प्राधिकरणास, योग्य चौकशी केल्यानंतर, कोणत्याही फेरबदलासह किंवा फेरबदलाशिवाय प्रारुप योजना मंजूर करता येईल किंवा ती नाकारता येईल.

(५) पोट-कलम (४) अन्वये मंजूर केलेली योजना राजपत्रात आणि योजनेत समाविष्ट केलेल्या जमिनी जेथे आहेत त्या गावात व त्या तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या मुख्यालयात प्रसिद्ध करण्यात येईल आणि अशा रीतीने प्रसिद्ध झाल्यानंतर ती अंतिम असेल.

योजना अंमलात येणे ; योजनेत फेरबदल करण्याचा अधिकार.

७३. (१) समुचित प्राधिकरण राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास योजना अंमलात येईल आणि ती जणू काही या अधिनियमात अधिनियमित करण्यात आली असल्याप्रमाणे अंमलात राहील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी योजनेत कलम ७२ च्या तरतुदीनुसार तयार करण्यात, प्रसिद्ध करण्यात व मंजूर करण्यात आलेल्या नंतरच्या एखाद्या योजनेद्वारे कोणत्याही वेळी फेरबदल केला जाऊ शकेल आणि या भागाच्या तरतुदी अशा फेरबदल केलेल्या योजनेच्या संबंधात लागू होतील.

योजना अंमलात आणण्यासाठी पाणी समिती नेमणे व तिचे अधिकार.

७४. (१) कलम ७३ अन्वये योजना अंमलात आल्यानंतर समुचित प्राधिकरण, त्या प्रयोजनासाठी समुचित प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या कालवा अधिकाऱ्यांच्या अधीक्षणास, निदेशास व नियंत्रणास अधीन राहून योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी एक पाणी समिती नियुक्त करील.

(२) पाणी समितीमध्ये पाच व्यक्तींचा अंतर्भाव असेल, त्यापैकी एक शाखा अधिकारी किंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती असेल आणि उरलेल्या चार व्यक्ती योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीच्या धारकामधून किंवा ताबाधारकामधून समुचित प्राधिकरणाकडून किंवा त्याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून नियुक्त करण्यात येतील.

समितीचे सदस्य, त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी पदधारण करतील. समुचित प्राधिकरणाने समितीच्या सर्व किंवा कोणत्याही सदस्यांची नेमणूक, कोणतेही कारण न दर्शवता कोणत्याही वेळी लेखी आदेशाद्वारे संपुष्टात आणणे कायदेशीर असेल.

पाणी समितीस वेळोवेळी बैठकी घेता येतील आणि तिला तिचे कामकाज चालविण्यासाठी तिला योग्य वाटेल अशी कार्यपद्धती अनुसरता येईल. शाखा अधिकारी क्रिंवा त्याची नामनिर्देशित व्यक्ती समितीला तांत्रिक किंवा अन्य प्रकारचे सर्व सहाय्य देईल आणि सर्व धारक व ताबाधारक यांना पाण्याचे योग्य संविभाजन आणि वाटप सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने तिच्या चर्चा विमर्शात मार्गदर्शन करील.

(३) पाणी समिती---

(क) कालव्याची व्यवस्था पाहिल आणि योजनेत अंतर्भूत केलेल्या जमिनींना पाण्याचे योग्य वाटप होण्याची सुनिश्चित करील ;

(ख) योजनेच्या तरतुदीनुसार, कोणत्याही कालावधीत किंवा कालावधीमध्ये काढावयाची पिके निश्चित करील ;

(ग) कालव्याचे दैनंदिन परिरक्षण व दुरुस्त्या करील ;

(घ) कालव्याची निर्गम मार्गाच्या बाहेरील जलसिंचन यंत्रणा पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने योग्य स्थितीत ठेवेल ;

(ङ) कालवा अधिकाऱ्याला पुढील बाबतीत सहाय्य करेल :---

(एक) कालव्यावर आणि त्याच्याशी संबद्ध असणाऱ्या जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमणाचा तपास लावणे व त्यास प्रतिबंध करणे,

(दोन) कालव्याला पोचणाऱ्या हानीस प्रतिबंध करणे,

(तीन) कालव्याला पोचलेल्या कोणत्याही हानीची दुरुस्ती करणे.

(च) तिला पाण्याचा अनधिकृत वापर करणे किंवा क्रम आलेला नसताना पाणी वापरणे किंवा योजनेच्या तरतुदीविरुद्ध असलेली पिके घेणे याबद्दल शास्ती लादण्याचा अधिकार असेल ;

(छ) तिला देण्यात आलेल्या रकमेचे विहित करण्यात येईल अशा पद्धतीने लेखे ठेवील.

(४) शास्ती ही दोनशे रुपयांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या दंडाची असू शकेल, आणि ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोगी असेल.

(५) पाणी समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, पाणी समितीचा निर्णय मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, कालवा अधिकाऱ्याकडे किंवा समुचित प्राधिकरणाने या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(६) समुचित प्राधिकरणास, आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत पाणी समितीच्या किंवा त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या आदेशासंबंधीच्या कोणत्याही चौकशीचा किंवा कामकाजाचा अभिलेख, दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या किंवा आदेशाच्या वैधतेसंबंधी किंवा औचित्यासंबंधी किंवा कार्यवाहीच्या नियमिततेसंबंधी स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, मागवता येईल व तपासता येईल आणि त्याला, पाणी समितीचा किंवा कोणत्याही अशा अधिकाऱ्याचा आदेश कायम करणारा, विलोपित करणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा तो फिरविणारा आदेश काढता येईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीवर परिणाम करणारा कोणताही आदेश, अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय काढण्यात येणार नाही.

## भाग सात

## भरपाई देणे

### भरपाईची मागणी केव्हा करता येईल

निश्चित करता येण्याजोगा भरीव नुकसानीच्या प्रकरणात भरपाई देणे.

७५. (१) या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर केल्यामुळे झालेल्या, अशा अधिकारांचा वापर करण्यापूर्वी निश्चित करता येणे शक्य आहे अशा आणि इतर सर्व बाबतीत, नुकसान होईल तेव्हा, निश्चित करण्यात आलेल्या व अंदाज करण्यात आलेल्या अशा कोणत्याही भरीव नुकसानीच्या बाबतीत भरपाई देता येईल :

परंतु,—

(क) हवामान बिघडल्यामुळे, किंवा

(ख) नौपरिवहन किंवा इमारती लाकूड वाहून नेण्याचे किंवा गुरांना पाणी पाजण्याचे साधन बंद झाल्यामुळे, किंवा

(ग) कलम ८० अन्वये नोटीस काढण्यात आल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षांत कोणत्याही पाणीपुरवठ्याचा कोणताही वापर करण्यात आला नसेल तर, कलम ११ द्वारे देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर केल्यामुळे पाणीपुरवठा बंद किंवा कमी झाल्यामुळे, किंवा

(घ) (एक) समुचित प्राधिकरणाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही कारणामुळे ;

(दोन) कालव्यात कोणत्याही दुरुस्त्या, फेरबदल किंवा जादा बांधकाम केल्यामुळे ; किंवा

(तीन) कालव्यातील पाण्याचा ओघ योग्य ठेवण्याकरिता किंवा जलसिंचनाचा विद्यमान प्रवाह कायम राखण्यासाठी किंवा कलम ४९, खंड (छ) अन्वये पाणीपुरवठा राखून ठेवण्यासाठी याबाबत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास आवश्यक वाटल्या असतील अशा कोणत्याही उपाययोजनेमुळे ;

कालव्यात पाणी नसल्यामुळे किंवा ते बंद किंवा कमी झाल्यामुळे ; होणाऱ्या कोणत्याही नुकसानीबद्दल कोणतीही नुकसानभरपाई देण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणामुळे हा पाणीपुरवठा बंद किंवा कमी झाल्यामुळे जिचे नुकसान झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, तिने द्यावयाच्या पाणीपट्टीमध्ये समुचित प्राधिकरण प्राधिकृत करील अशी माफी मिळण्याचा हक्क असेल.

मागण्यांवरील मुदत मर्यादा.

७६. ज्या नुकसानीबद्दल तक्रार करण्यात आली असेल असे नुकसान होणे सुरू झाल्यापासून बारा महिने पूर्ण झाल्यानंतर, अशा कालावधीत मागणी न करण्यास मागणीदारास पुरेसे कारण होते याविषयी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाल्याशिवाय, या अधिनियमांन्वये भरपाईची कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

### संक्षिप्त निर्णय

जमीन, इत्यादींवर प्रवेश केल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई.

७७. (१) कलम १२, कलम १३, कलम १४ किंवा कलम १५ किंवा कलम २२ किंवा कलम ३६ अन्वये कोणत्याही जमिनीवर किंवा इमारतीत प्रवेश करण्याच्या प्रत्येक प्रकरणात, कालवा अधिकारी किंवा प्रवेश करणारी व्यक्ती, प्रवेशामुळे किंवा कोणतेही काम पार पाडताना कोणत्याही पीकाचे, झाडाचे, इमारतीचे किंवा अन्य मालमत्तेचे कोणतेही नुकसान झाले असल्यास, त्याची व्याप्ती निश्चित करील आणि तिची नोंद घेईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेला प्रवेश केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, याबाबत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेला कालवा अधिकारी, नुकसान झालेल्या मालमत्तेच्या धारकास किंवा मालकास भरपाई देऊ करील.

(३) अशी देऊ केलेली भरपाई स्वीकारण्यात आली नाही तर, कालवा अधिकारी भरपाई रकमेविषयी चौकशी करण्याच्या व ती ठरविण्याच्या प्रयोजनासाठी ते प्रकरण ताबडतोब जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील.

पाणीपुरवठ्यात खंड पडल्याबद्दल भरपाई.

**७८.** कालव्याने जलसिंचन होणाऱ्या कोणत्याही जमिनीच्या पाणीपुरवठ्यात, कलम ७५, पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या खंड (घ) मध्ये वर्णन केलेल्या रीतीव्यतिरिक्त अन्य रीतीने खंड पडेल तर, अशी जमीन धारण करणाऱ्यास असा खंड पडल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही हानीबद्दल भरपाईसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे विनंती-अर्ज करता येईल, आणि जिल्हाधिकारी, कालवा अधिकाऱ्याशी विचारविनिमय केल्यानंतर विनंती-अर्जदारास अशा हानीबद्दल वाजवी भरपाई देईल.

मागील दोन कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये दिलेला भरपाईच्या रकमेबाबतचा निर्णय निर्णायक असणे.

**७९.** मागील दोन कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये दिलेला, भरपाई म्हणून द्यावयाच्या रकमेबाबतचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय कलम ११४ अन्वये केलेल्या नियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशा अपीलाची तरतूद करण्यात आली असेल त्याबाबतीत अपील प्राधिकाऱ्याचा निर्णय सुद्धा निर्णायक असेल.

## रीतसर अभिनिर्णय

विवक्षित प्रकरणांत भरपाईच्या मागण्यांबाबत नोटीस.

**८०.** कलम ११ अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, जिल्हाधिकारी, सोयीस्कर ठिकाणी जाहीर नोटीस देण्याची व्यवस्था करील या, नोटीशीत, समुचित प्राधिकरणाचा त्या कलमात निर्देश केलेल्या पाण्याचे उपयोजन किंवा वापर करण्याचा विचार असून भरपाईच्या मागण्या त्याच्याकडे करता येतील असे नमूद करण्यात येईल.

कलमे ७५ व ७६ यांची एक प्रत अशा प्रत्येक नोटीशीसोबत जोडण्यात येईल.

मागण्या जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करणे.

**८१.** कलम ७७ आणि कलम ७८ मध्ये तरतूद केलेल्या स्वरूपाच्या मागण्यांव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये भरपाईसाठी केलेल्या सर्व मागण्या ज्या जिल्ह्यात अशा मागण्या उद्‌भवल्या असतील त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे करण्यात येतील.

भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या तरतुदींनुसार जिल्हाधिकाऱ्याने काम करणे.

**८२.** जिल्हाधिकारी अशा प्रत्येक मागणीची चौकशी करील आणि त्याच्या मते मागणीदारास देय असलेल्या भरपाईची रक्कम, कोणतीही असल्यास, ती रक्कम निर्धारित करील ; आणि भूमि संपादन अधिनियम, १८९४, याची कलमे ११, १२, १२क, १३, १४, १५, १५क, १८ ते ३१, ४५ आणि ५२ ही अशा चौकशीस लागू होतील.

भरपाई निश्चित करताना बाजार मूल्यातील घट विचारात घेणे.

**८३.** (१) निकटपूर्ववर्ती कलमांन्वये भरपाईची रक्कम निर्धारित करताना, ज्या मालमत्तेबाबत भरपाई मागण्यात आली असेल, त्या मालमत्तेच्या बाजारमूल्यात भरपाई देण्याच्यावेळी झालेली घट विचारात घेण्यात येईल.

(२) असे बाजारमूल्य निश्चित करता येण्याजोगे नसेल त्याबाबतीत, या अधिनियमांन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर केल्यामुळे अशा मालमत्तेच्या वार्षिक निव्वळ नफ्यात जितक्या रकमेने घट झाली असेल त्या रकमेच्या बारा पट दराने रकमेची गणना करण्यात येईल.

भरपाई केव्हा देय होईल.

८४. कलम ८२ अन्वये दिलेल्या भरपाई दाखल देय असलेल्या सर्व रकमा अशा भरपाईची मागणी केल्यापासून तीन महिन्यांनंतर देय होतील. आणि तीन महिन्यांनंतर चुकत्या न केलेल्या अशा कोणत्याही रकमेवर, अशी रक्कम घेण्यात मागणीदाराने हयगय केल्यामुळे किंवा नकार दिल्यामुळे उक्त रक्कम दिली गेली नसेल त्याव्यतिरिक्त, वेळोवेळी निश्चित होईल अशा दराने सरळ व्याज देण्यात येईल.

## जमीन महसूल व खंड कमी करणे

पाणीपुरवठ्यात खंड पडल्यामुळे मागणी केलेला महसूल कमी करणे.

८५. राज्य शासनाला महसूल देणाऱ्या कोणत्याही जमिनीच्या संबंधात पाणीपुरवठा बंद किंवा कमी झाल्यामुळे कलम ८२ अन्वये भरपाई देण्यात आली असेल आणि अशा जमिनीदाखल देय असलेल्या महसुलाची रक्कम त्याच्याशी संबंध असलेल्या फायद्यांच्या संदर्भात निश्चित करण्यात आली असेल तर, उक्त जमिनीच्या धारकास, जिल्हाधिकारी निर्धारित करील त्या मर्यादेपर्यंत, देय असलेली महसुलाची रक्कम कमी करून मिळण्याचा हक्क असेल.

पाणीपुरवठ्यात खंड पडल्यामुळे कनिष्ठ धारकाचा खंड कमी करणे आणि पाणीपुरवठा पूर्ववत चालू झाल्यावर अशा खंडात वाढ होणे.

८६. (१) ज्या जमिनीच्या बाबतीत अशी भरपाई देण्यात आली असेल अशा कोणत्यही जमिनीच्या प्रत्येक कनिष्ठ धारकास, उक्त भरपाईचा कोणताही भाग त्यास मिळाला नसेल तर, तिच्या वरिष्ठ धारकास त्याच्याकडून पूर्वी देय असलेला खंड त्या धारण जमिनीच्या कमी झालेल्या मुल्याच्या प्रमाणात कमी करून मिळण्याचा हक्क असेल.

(२) परंतु, ज्या पाणीपुरवठ्यामुळे धारण जमिनीचे मूल्य वाढत असेल असा पाणीपुरवठा, कनिष्ठ धारकाच्या खर्चाव्यतिरिक्त अन्य रीतीने, उक्त जमिनीस पूर्ववत चालू झाला असेल तर, वरिष्ठ धारकास अशा वाढलेल्या मूल्याच्या प्रमाणात खंड वाढवण्याचा हक्क असेल :

परंतु, वरिष्ठ धारकास या कलमाच्या तरतुदींव्यतिरिक्त स्वतंत्रपणे पूर्वीचा खंड वाढवण्याचा हक्क असेल त्याव्यतिरिक्त हा वाढवलेला खंड कमी होण्यापूर्वी कनिष्ठ धारक जो खंड देत असेल त्या खंडापेक्षा कोणत्याही बाबतीत अधिक असणार नाही.

या भागाच्या तरतुदी कलम ४४ अन्वये केलेल्या संपादनास लागू नसणे.

८७. या भागातील भरपाई संबंधीच्या तरतुदी, कलम ४४ च्या तरतुदी अन्वये मागणी केलेल्या किंवा दिलेल्या भरपाईस लागू होणार नाही.

## भाग आठ

## पाणीपट्टीची वसुली

पाणीपट्टीच्या रकमा देणे व त्यांची वसुली.

८८. (१) या अधिनियमान्वये बसवण्यायोग्य असलेली किंवा आकारण्यात आलेली प्रत्येक पाणीपट्टी ही, समुचित प्राधिकरणाकडून आदेशान्वये वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल अशा दिनांकास अशा अधिकाऱ्यास देय असेल, जर पाणीपट्टी नियत दिनांकाला किंवा त्यापूर्वी देण्यात आली नाही तर, विहित करण्यात येईल अशा रकमेच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही इतका जादा आकार देण्यात येईल.

(२) कोणतीही अशी पाणीपट्टी किंवा तिचा हप्ता ज्या दिनांकास तो देय होत असेल त्या दिनांकास देण्यात आला नाही तर, तो कालव्याच्या सिंचनयोग्य क्षेत्रातील जमीन असणाऱ्या किंवा ज्या जमिनीच्या वापरासाठी कालव्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला असेल किंवा कोणत्याही कालव्यातून पाणी पाझरल्यामुळे किंवा त्याच्या गळतीमुळे ज्या जमिनीस फायदा होत असेल अशी

जमीन असणाऱ्या जमिनीबद्दल देय असलेली जमीन महसुलीची थकबाकी असल्याचे मानले जाईल आणि अशी थकबाकी म्हणून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १७६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीपैकी उक्त जमीन जप्त करण्यासह कोणत्याही पद्धतीने वसुलीयोग्य असेल.

१९६६ चा महा. ४१.

(३) क्षेत्रातील पाटाच्या मालकास अशा पाटाचा उपयोग करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने घ्यावयाचा कोणताही खंड, कलम २९ अन्वये काम करण्यास यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेला कालवा अधिकारी निदेश देईल अशा हप्त्यांनी व अशा दिनांकास देता येईल आणि खंड देण्यास दायी असलेल्या व्यक्तीकडून प्रत्यक्ष वसूल केलेल्या खंडापेक्षा अधिक असेल असा कोणताही खंड कोणत्याहीवेळी त्याच्या मालकास देय असणार नाही.

(४) (क) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये राज्य शासनाला किंवा कालवा अधिकाऱ्याला देय असलेली कोणतीही अशी रक्कम–मग ती राज्य शासनाच्या वतीने असो किंवा या अधिनियमाच्या भाग ४ अन्वये अन्य कोणत्याही व्यक्तीच्या वतीने असो– मागणी केली असता देण्यात आली नाही तर, आणि

(ख) शेतातील पाटाच्या मालकाला देय असलेला कोणताही खंड किंवा त्याचा हप्ता, देय होईल तेव्हा तो देण्यात आला नाही तर, मालकाच्या वतीने,—

१९६६ चा महा. ४१.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतुदीस अनुसरून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल.

कंपनी, जिल्हा परिषद, इत्यादींना देय असलेली पाणीपट्टी, इत्यादींची वसुली.

८९. (१) कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार कंपनीला किंवा जिल्हा परिषदेला किंवा कंपनीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या वतीने कालवा अधिकाऱ्याला देय असलेली पाणीपट्टीची रक्कम किंवा तिचा हप्ता किंवा इतर कोणतीही विशिष्ट देय रक्कम, ती देय होईल त्या दिनांकास किंवा ती देय झाल्यावर तिची मागणी केल्यानंतर, कंपनीला किंवा जिल्हा परिषदेला किंवा अशा कालवा अधिकाऱ्याला देण्यात आली नाही तर, अशी रक्कम किंवा विशिष्ट रक्कम या कलमाच्या पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार वसूल करता येईल.

(२) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कंपनीस, जिल्हा परिषदेस किंवा कंपनीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या वतीने कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास देय असेल अशी कोणतीही रक्कम किंवा तिचा कोणताही हप्ता, तो देय होईल त्या दिनांकास देण्यात आला नाही तर,—

(क) आणि मागणी विवादग्रस्त नसेल किंवा विवादातील रक्कम १०० रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा, या कलमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास, देय असेल किंवा यथास्थिति कंपनीकडून, जिल्हा परिषदेकडून किंवा कालवा अधिकाऱ्याकडून मागणी करण्यात आली असेल ती रक्कम, प्रमाणपत्रात नमूद करून स्वतःच्या सहीनिशी ते प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविता येईल आणि त्यानंतर, जिल्हाधिकारी देय असलेली किंवा मागणी करण्यात आलेली रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करील.

(ख) आणि मागणी विवादग्रस्त असेल आणि विवादातील रक्कम १०० रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा, ती बाब, त्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने गठित केलेल्या एका व्यक्तीचा समावेश असलेल्या न्यायाधिकरणाकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल. आणि न्यायाधिकरण त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि ज्या व्यक्तींकडून ती रक्कम देय असल्याचे अभिकथित

असेल त्या व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्या प्रश्नाबाबत निर्णय देईल. न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल, आणि त्यानंतर, जिल्हाधिकारी, देय म्हणून निर्धारित करण्यात आलेली रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करील.

(३) या अधिनियमाच्या तरतुदीस आणि राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेस अधीन राहून न्यायाधिकरणाच्या अध्यक्षास, न्यायाधिकरणाने खर्च देवविणे, कोणतीही आदेशिका फी बसवणे, न्यायालय शुल्क मुद्रांकांच्या स्वरूपात तिची वसुली करण्याच्या तरतुदीस, न्यायाधिकरणापुढे उपस्थित होण्याचा त्याचा अधिकार, बैठकीची किंवा बैठकींच्या जागा, कामकाज चालू असताना न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून बसणाऱ्या व्यक्तीमध्ये बदल झालेला असला तरीही त्या समोरील कोणतेही कामकाज न्यायाधिकरणाने निकालात काढणे, यासह न्यायाधिकरणाची पद्धती व कार्यपद्धती यांचे विनियमन करण्यासाठी आणि या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा परिणामकारक वापर व्हावा व त्याला आपली कर्तव्ये पार पाडता यावी यासाठी विनियम करता येतील.

(४) या कलमान्वये केलेले विनियम राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

## भाग नऊ

### निकडीच्या परिस्थितीमध्ये कालव्यांसाठी कामगार मिळविणे

तातडीने आवश्यक असलेल्या कामांसाठी किंवा दुरुस्त्यांसाठी कामगार मिळविण्याची कार्यपद्धती.

९०. (१) (क) कोणतेही काम किंवा दुरुस्ती ताबडतोब केली नाही तर ज्यामुळे अचानक व विस्तृत प्रमाणावर सार्वजनिक हानी होईल अशा प्रकारचे कोणत्याही कालव्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल ;

(ख) जलसिंचनाचा विद्यमान प्रवाह कायम राखण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही कालवा साफ करण्याचे किंवा अन्य काम ताबडतोब केले नाही तर, मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक नुकसान होईल ; आणि

(ग) असे नुकसान किंवा हानी यास प्रतिबंध करण्यासाठी अशी दुरुस्ती, सफाई किंवा काम करण्याकरिता जितका अवधी मिळू शकत असेल त्या अवधीत ते योग्य रीतीने करण्यासाठी आवश्यक असणारे कामगार सर्वसाधारण रीतीने मिळू शकत नाहीत ;

असे या कलमान्वये काम करण्यासाठी यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास दिसून येईल तेव्हा,

उक्त कालवा अधिकाऱ्यास स्वतःच्या सहीच्या आदेशान्वये, अशी दुरुस्ती, सफाई किंवा काम करण्यासाठी या कलमाच्या तरतुदी अंमलात आणण्यात येतील असा निदेश देता येईल ; आणि त्यानंतर, अशी दुरुस्ती, सफाई किंवा काम जेथे करावयाचे असेल त्या ठिकाणच्या जवळपास जमीन धारण करणाऱ्या किंवा राहणाऱ्या आणि त्यात यापुढे उल्लेख केलेल्या यादीत जिचे नाव असेल अशा प्रत्येक धडधाकट व्यक्तीने अशा अधिकाऱ्याकडून किंवा त्याने, त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून फर्माविण्यात येईल तर, अशा अधिकाऱ्यांकडून किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून निदेश देण्यात येईल त्याप्रमाणे तेथे काम करून दुरुस्ती किंवा सफाई करण्यास सहाय्य करणे बंधनकारक असेल.

(२) अशा रीतीने काम करणाऱ्या सर्व व्यक्तींस, अशाच प्रकारच्या कामाबद्दल आसपासच्या क्षेत्रात त्यावेळी देण्यात येत असेल अशा सर्वोच्च दरापेक्षा कमी नसेल अशा दरानी मंजुरी मिळण्याचा हक्क असेल.

९१. याबाबतीत कलम ११४ अन्वये वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधीन राहून, जिल्हाधिकारी उपरोक्त प्रमाणे, सहाय्य करण्यास भाग पाडले जाण्यास योग्य अशा व्यक्तींची एक यादी तयार करील आणि त्यास, वेळोवेळी, अशा यादीत किंवा तिच्या कोणत्याही भागात भर घालता येईल किंवा फेरफार करता येईल. कामगारांची यादी.

९२. कलम ९० अन्वये दिलेले सर्व आदेश जिल्हाधिकारी आणि समुचित प्राधिकरण यांना ताबडतोब कळविण्यात येतील. कालवा अधिकाऱ्याने माहिती पाठविणे.

## भाग दहा

### शास्ती

९३. (१) जी कोणतीही व्यक्ती, स्वेच्छेने आणि योग्य प्राधिकरणाशिवाय— कालवा, इत्यादींचे नुकसान केल्याबद्दल शास्ती.

(क) कोणत्याही कालव्यास नुकसान पोहचवील, त्यात फेरफार करील, तो मोठा करील किंवा त्यात अडथळा निर्माण करील ;

(ख) कोणत्याही कालव्यातील पाणीपुरवठ्यात किंवा कालव्यातून, त्यामधून, त्यावरून किंवा त्याखालून वाहणाऱ्या पाण्याच्या ओघात हस्तक्षेप करील किंवा वाढ करील किंवा तो कमी करील, किंवा कोणत्याही साधनांनी कोणत्याही कालव्यातील पाण्याची पातळी वाढवील किंवा कमी करील ;

(ग) कोणत्याही कालव्याच्या पाण्याचा सर्वसाधारणपणे ज्या प्रयोजनासाठी वापर करण्यात येत असेल त्या प्रयोजनांसाठी त्याची योग्यता कमी होईल अशा रीतीने, ते प्रदुषित किंवा खराब करील ;

(घ) लोकसेवकाच्या प्राधिकारान्वये बसविलेली कोणतीही सिमा किंवा पातळी चिन्ह किंवा जलप्रमापी नष्ट करील, विरुप करील किंवा काढून टाकील ;

(ङ) कोणत्याही कालव्यातील पाण्याच्या प्रवाहाचे नियंत्रण, नियमन किंवा मापन करण्याच्या कोणत्याही उपकरणाचा किंवा त्याच्या भागाचा नाश करील, त्यात अनधिकृत फिरवाफिरव करील किंवा ते काढून टाकील ;

(च) कलम ११४ अन्वये केलेल्या नियमांचे उल्लंघन करून, एखादा कालव्याची कोणतीही कामे, काठ किंवा पाट यामधून किंवा त्यावरून गुरेढोरे किंवा वाहने न नेण्याबद्दल तिला निदेश दिला असतानासुद्धा ती नेईल किंवा नेली जाण्यास कारणीभूत होईल ;

(छ) कोणत्याही कालव्यावर किंवा पूर बंधाऱ्यावर गुरेढोरे चारील किंवा त्यांना जाणूनबुजून आणि हेतुपुरस्सर चरण्यास मोकळीक देईल, किंवा अशा कोणत्याही कालव्यावर किंवा बंधाऱ्यावर गुरेढोरे बांधील, बांधवील किंवा बांधण्यास जाणूनबुजून आणि हेतुपुरस्सर परवानगी देईल, किंवा अशा कोणत्याही कालव्यावर किंवा बंधाऱ्यावर वाढणारे कोणतेही गवत किंवा अन्य वनस्पती उपटून काढील किंवा अशा कालव्याच्या किंवा बंधाऱ्याच्या रक्षणाकरिता असलेले कोणतेही झाड, झुडुप, गवत किंवा झुडपी कुंपण काढून टाकील, कापील किंवा अन्य कोणत्याही प्रकारे त्यास नुकसान पोहचवील किंवा काढून टाकले जाण्यास, कापले जाण्यास किंवा अन्य कोणत्याही प्रकारे नुकसान पोहचविले जाण्यास कारणीभूत होईल ;

(ज) कलम ९० अन्वये, कोणतीही दुरुस्ती, सफाई किंवा काम करण्यास सहाय्य करणे किंवा सहाय्य करण्याचे चालू ठेवणे कायदेशीररीत्या बंधनकारक असेल तेव्हा तसे करण्यास वाजवी कारणाशिवाय हयगय करील ;

(झ) कालव्याच्या काठावर किंवा त्याच्या पाटात मल-मूत्र विसर्जन करील ;

(ञ) कालवा अधिकाऱ्याने, ज्या क्षेत्रात कालव्यापासून जलसिंचन करण्याचा प्राधिकार दिला असेल त्या क्षेत्राच्या सीमांचे नुकसान करील, त्यात फेरबदल करील किंवा त्या पुसून टाकील ;

(ट) पाणीपुरवठ्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात खणून काढलेले तात्पुरते पाट मंजुरीची मुदत संपल्यानंतर बंद करण्यात कसूर करील ;

(ठ) कालवा अधिकाऱ्याने सांगितले असेल तेव्हा, त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी त्याला मदत करण्यात कसूर करील ;

(ड) या नियमाचा भंग केल्याबद्दल शास्ती लादता येते असा निदेश अशा नियमात राज्य शासन देईल अशा, कलम ११४ खाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाचा भंग करील ;

(२) कलम १९ च्या तरतुदींना बाधा न पोहचवता जी कोणी, कोणत्याही कालव्यामधून होणाऱ्या, एका शेतातून दुसऱ्या शेतात करण्यात येणाऱ्या जलसिंचनास अडथळा आणील ;

(३) जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील ;

(४) जी कोणतीही व्यक्ती, अनधिकृतरीतीने कालव्यातील पाण्याचा वापर करील ; किंवा

(५) शेतातील पाट सुस्थितीत ठेवण्यास जबाबदार असणारी किंवा अशा पाटाचा वापर करणारी जी कोणतीही व्यक्ती त्यातील पाणी वाया जाऊ न देण्याची योग्य खबरदारी घेण्यास हयगय करील, किंवा त्यातील पाण्याच्या प्राधिकृत वाटपात व्यत्यय आणील किंवा अशा पाण्याचा अनधिकृतरीतीने वापर करील किंवा कलम २९ अन्वये अशा प्राण्यांचा उपयोग करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या किंवा त्या पाटाचा संयुक्त मालक म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही, व्यक्तीस, अशा पाटाचा कायदेशीरपणे वापर करण्यास प्रतिबंध करील, किंवा व्यत्यय आणील ; तिला अशी कृती भारतीय दंड संहितेच्या अर्थानुसार अपकृती करण्याच्या अपराधात गणली जात नसेल तर, सिद्धापराध ठरविण्यात आल्यावर, अशा प्रत्येक अपराधाबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा होईल किंवा या दोनही शिक्षा होतील आणि असा अपराध करण्याचे चालू ठेवले असेल त्याबाबतीत, अशा पहिल्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आल्यानंतर त्या मुदतीत असा अपराध करण्याचे चालू ठेवले असेल त्या मुदतीतील प्रत्येक दिवसास पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

१८६० चा ४५.

कालवा इत्यादींच्या स्थैर्यास धोका पोचवण्याबद्दल शास्ती.

**९४.** जी कोणतीही व्यक्ती योग्य प्राधिकरणाशिवाय—

(१) कोणत्याही कालव्याच्या बांधकामास भोक पाडील किंवा ते मधून तोडील किंवा त्यास भोक पाडण्याचा किंवा ते मधून तोडण्याचा किंवा अन्यथा त्याचे नुकसान करण्याचा, त्याचा नाश करण्याचा किंवा त्याच्या मजबुतीस धोका उत्पन्न करण्याचा प्रयत्न करील ;

(२) कोणत्याही कालव्यातील कोणतेही जलद्वार उघडील, बंद करील किंवा त्यात अडथळा निर्माण करील, किंवा ते उघडण्याचा, बंद करण्याचा किंवा त्यात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करील ;

(३) ज्या नदीच्या किंवा कालव्याच्या काठावर पूरबंधारा असेल अशा नदीचा किंवा कालव्याचा प्रवाह वळवण्याच्या किंवा अडवण्याच्या प्रयोजनासाठी कोणताही बांध बांधील किंवा अडथळा निर्माण करील किंवा असा कोणताही बांध किंवा अडथळा काढून टाकणे कायदेशीरपणे फर्मावण्यात आले असता तसे करण्यास नकार देईल किंवा हयगय करील ;

१८६० चा ४५. तिला अशी कृती भारतीय दंड सहितेच्या अर्थानुसार अपकृती करण्याच्या अपराधात गणली जात नसेल तर सिद्धापराध ठरविण्यात आल्यावर, अशा प्रत्येक अपराधाबद्दल, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ; आणि असा अपराध करण्याचे चालू ठेवले असेल त्याबाबतीत, अशा पहिल्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आल्यानंतर, ज्या मुदतीत असा अपराध करण्याचे चालू ठेवले असेल त्या मुदतीतील प्रत्येक दिवसास पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**९५.** कोणत्याही व्यक्तीस, लगतपूर्ववर्ती दोन कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये सिद्धापराध ठरविण्यात येईल तेव्हा, सिद्धापराध ठरविणाऱ्या दंडाधिकाऱ्यास, ज्या अडथळ्याबद्दल किंवा नुकसानीबद्दल त्या व्यक्तीस सिद्धापराध ठरविण्यात आले असेल, असा अडथळा त्या आदेशात ठरवून दिलेल्या मुदतीच्या आत ती दूर करेल किंवा अशा नुकसानीची त्या मुदतीच्या आत दुरुस्ती करेल, असा आदेश देता येईल. अशी व्यक्ती, अशा रीतीने ठरविलेल्या मुदतीत अशा आदेशाचे पालन करण्यास हयगय करील किंवा पालन करण्याचे नाकारील तर, याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास, असा अडथळा करता येईल किंवा अशा नुकसानीची दुरुस्ती करता येईल आणि अडथळा दूर करण्याचा किंवा नुकसानीच्या दुरुस्तीचा उक्त अधिकाऱ्याने प्रमाणित केलेला, खर्च जिल्हाधिकाऱ्याद्वारे, अशा व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य असेल.

*अडथळा दूर करणे व नुकसानीची दुरुस्ती करणे.*

**९६.** कोणत्याही कालव्याचा प्रभारी असलेल्या किंवा त्या कालव्यावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस जी कोणतीही व्यक्ती तिच्या दृष्टीने—

*कालव्यावर नेमलेल्या व्यक्तींना, अपराध्यास अभिरक्षेत घेता येईल.*

(१) कोणत्याही कालव्यास हेतुपुरस्सर नुकसान पोहचवील, अडथळा करील किंवा तो दूषित करील ; किंवा

(२) कोणत्याही कालव्यास धोका निर्माण व्हावा, त्याचे नुकसान व्हावे, तो धोकादायक व्हावा किंवा त्याची उपयुक्तता कमी व्हावी म्हणून कोणत्याही कालव्यातून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात किंवा त्यातील किंवा कोणत्याही नदीतील किंवा जलप्रवाहातील पाण्याच्या प्रवाहात योग्य प्राधिकाऱ्याशिवाय हस्तक्षेप करील ;

अशा व्यक्तीस, कालव्याच्या जमिनीतून किंवा इमारतीतून काढून टाकता येईल किंवा वारंटशिवाय अभिरक्षेत घेता येईल आणि कायद्यानुसार कार्यवाही करण्यासाठी तिला ताबडतोब दंडाधिकाऱ्यासमोर किंवा सर्वात जवळच्या पोलीस ठाण्यावर नेता येईल.

**९७.** (१) या भागाच्या पूर्वगामी तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही कालव्यामधील पाणी अनधिकृतरीत्या वापरण्यात येत आहे असे याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याचे मत होईल त्याबाबतीत त्या कालवा अधिकाऱ्यास, अशा वापरास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, कोणत्याही व्यक्तीस असा निदेश दिल्यानंतर ताबडतोब अशा कालव्याचे पाणी अनधिकृतरीत्या वापरण्यापासून परावृत्त होण्याचा निदेश देता

*ज्याच्या सहाय्याने कालव्याचे पाणी अनधिकृतरीत्या वापरण्यात येते अशा यंत्राच्या व उपकरण संचाच्या बाबतीतील कार्यपद्धती.*

येईल. [1][निदेशाचे अनुपालन करण्यास तिने कसूर केल्यास, या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा पाण्याचा किंवा विजेचा पुरवठा करण्यासंबंधीच्या कोणत्याही करारात काहीही अंतर्भूत असले तरी,कालवा अधिकाऱ्याने पोलिसांच्या आणि वीज पुरवठा करणाऱ्या लायसनधारकाच्या किंवा अन्य प्राधिकरणाच्या सहाय्याने, अशा कालव्यामधून ज्याच्या सहाय्याने अनधिकृतरीत्या पाण्याचा उपसा किंवा वापर केला जात होता किंवा करण्यात येत असेल असे यंत्र, यंत्रक, साधनसामग्री किंवा कोणताही अन्य उपकरण संच जप्त करण्याचा आणि तो काढून टाकण्याचा किंवा [2][लायसनधारक किंवा अन्य प्राधिकरण यांच्याद्वारे ग्राहकाला केला जाणारा वीज पुरवठा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीकरिता खंडीत किंवा कमी करण्याचा आदेशाद्वारे निदेश देणे विधीसंमत असेल ; आणि असा कालावधी आदेशानंतर लगेच येणाऱ्या ३० जून या दिनांकानंतरचा असणार नाही अशा प्रकारे जप्त करण्यात आलेले कोणतेही यंत्र, यंत्रक, साधनसामग्री किंवा उपकरण संच कालवा अधिकारी आपल्या आदेशात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीपर्यंत सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यात येईल.] या पोट-कलमान्वये कालवा अधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही निदेशाचे तात्काळ पालन करणे लायसनधारकावर किंवा अन्य प्राधिकरणावर बंधनकारक असेल.]

उपरोक्तप्रमाणे काढून टाकलेले यंत्र, यंत्रक, साधनसामग्री किंवा उपकरण संच आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर, तो जिच्या ताब्यामध्ये काढून टाकण्यात आला असेल त्या व्यक्तीला परत देण्यात येईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही कालव्यामधील पाणी सातत्याने अनधिकृतरीत्या वापरण्यात येत आहे असे कालवा अधिकाऱ्याचे मत होईल तर, कालवा अधिकारी, अशा व्यक्तीस तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन उपरोक्तप्रमाणे काढून टाकलेले यंत्र, यंत्रक, साधनसामग्री किंवा उपकरण संच यांचे समुचित प्राधिकरणाकडे समपहरण करण्यात यावे असा निदेश देऊ शकेल.

(२) कालवा अधिकाऱ्याच्या पोट-कलम (१) खालील आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश तिला प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, समुचित प्राधिकरणाकडे अपील करता येईल आणि त्या प्राधिकरणास, शक्य तितका कमी विलंब होईल अशा रीतीने, प्रकरणाच्या परिस्थितीमध्ये त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल. समुचित प्राधिकरणाचा अपिलावरील निर्णय आणि त्याच्या अधीन राहून कालवा अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

विवक्षित अपराधांची दखल.

**९८.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कलमे ९३, ९४ या खालील शिक्षापात्र असलेले सर्व अपराध दखलपात्र व जामीनयोग्य असतील. १९७४ चा २.

अपप्रेरणा.

**९९.** जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधास अपप्रेरणा देईल किंवा असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करील तिला या अधिनियमात अशा अपराधासाठी तरतूद करण्यात आलेली शिक्षा करण्यात येईल.

माहिती देणाऱ्यास बक्षीस देणे.

**१००.** या अधिनियमात आणि तदन्वये केलेल्या एखाद्या नियमात ज्याबद्दल शिक्षेची तरतूद केलेली आहे असा कालव्याच्या पाण्याचा अनधिकृत वापर होत आहे असे एखाद्या व्यक्तीच्या

[1] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, याच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

निदर्शनास आले आणि तिने अशा वापराबाबत कालवा अधिकाऱ्यास लेखी कळविले आणि अशी माहिती अपराधाचा आणि त्या अपराधास जबाबदार असलेल्या व्यक्तीचा तपास लावला जाण्यास सहाय्यभूत ठरली तर, समुचित प्राधिकरणास त्यास योग्य वाटेल असे बक्षिस त्या व्यक्तीस देता येईल.

**१०१.** कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाखालील अपराधासाठी दंड करण्यात आला असेल तेव्हा असा दंड लादणाऱ्या किंवा अशा दंडाची शिक्षा किंवा असा दंड ज्याचा भाग असेल असा शिक्षादेश अपिलात किंवा पुनरीक्षणात कायम करणाऱ्या न्यायालयास अशा दंडाचा पूर्ण किंवा कोणताही भाग, अशा अपराधामुळे क्षती पोहोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस भरपाई म्हणून देण्यात यावा असा निदेश देता येईल. क्षती पोहोचलेल्या खाजगी व्यक्तींना भरपाई.

**१०२.** (१) हा अधिनियम किंवा तदन्वये केलेल्या नियम याखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर समुचित प्राधिकरणास अशा अपराधाचा दोषारोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून समुचित प्राधिकरण निर्धारित करील अशा कालावधीत, असा अपराध मिटविण्यासाठी म्हणून जास्तीत जास्त दोनशे पन्नास रुपये इतकी रक्कम स्वीकारता येईल. अपराध समोपचाराने निकालात काढणे.

(२) अशा व्यक्तीकडून अशी रक्कम भरण्यात आल्यानंतर, ती व्यक्ती अभिरक्षेत असेल तर, तिला सोडण्यात येईल. आणि अशा अपराधाच्या बाबतीत अशा व्यक्तीविरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात कोणतीही कार्यवाही दाखल करण्यात आली असेल तर, अपराध समोपचाराने निकालात काढल्यामुळे दोषमुक्त असल्याचे मानण्यात येईल आणि अशा अपराधाच्या बाबतीत अशा व्यक्तीविरुद्ध कोणतीही पुढील फौजदारी कार्यवाही करण्यात येणार नाही.

## भाग अकरा

## अपील व पुनरीक्षण

**१०३.** (१) कलमे २०, २५, ३१, ३३, ५१, ५२, ५३, ५५ व ५६ अन्वये कालवा अधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश आणि कलम ३४ किंवा कलम ४० च्या तरतुदीच्या संबंधात, प्राधिकृत कालवा अधिकाऱ्याने काढलेला प्रत्येक आदेश, दर्जाने लगत वरचा असणाऱ्या कालवा अधिकाऱ्याकडे अपील योग्य असेल. मुख्य अभियंता असलेल्या कालवा अधिकाऱ्याने आदेश दिला असेल त्याबाबत तो आदेश समुचित प्राधिकरणाकडे अपील योग्य असेल. अपील व पुनरीक्षण.

(२) ज्यासाठी कोणतीही विनिर्दिष्ट तरतूद करण्यात आलेली नाही असा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये काढलेला प्रत्येक आदेश, विहित करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे अपील योग्य असेल.

(३) अपीलकारास आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक अपील सादर करण्यात येईल.

(४) समुचित प्राधिकरणास या अधिनियमाखालील कोणत्याही कालवा अधिकाऱ्याचा कोणताही निर्णय, आदेश किंवा कामकाज या संबंधीचा अभिलेख कोणत्याही निर्णयाच्या किंवा दिलेल्या आदेशाच्या कायदेशीरपणासंबंधी किंवा औचित्यासंबंधी आणि अशा कालवा अधिकाऱ्याच्या कार्यवाहीच्या नियमिततेसंबंधी स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, मागविता आणि तपासता येईल. जर कोणत्याही बाबतीत समुचित प्राधिकरणास अशा रीतीने मागविलेला

कोणताही निर्णय, आदेश किंवा कार्यवाही यात फेरबदल करण्यात यावा, तिचे विलोपन करण्यात यावे किंवा ती फिरविण्यात यावी असे वाटेल तर, त्यास, त्याला योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल :

परंतु, त्याची बाधा पोचलेल्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय समुचित प्राधिकरण कोणत्याही निर्णयात किंवा आदेशात फेरबदल करणार नाही, त्याचे विलोपन करणार नाही किंवा तो फिरविणार नाही.

## भाग बारा

### संकीर्ण

विवक्षित प्रकरणी दाव्यांना आडकाठी.

**१०४.** कालवा अधिकाऱ्याच्या कलम ३२, ७० किंवा ७१ खालील आदेशाच्या विधिग्राह्यतेस आक्षेप घेणारा कोणताही दावा कोणत्याही दिवाणी न्यायालयात दाखल करता येणार नाही आणि असा कोणताही आदेश मान्य किंवा मंजूर केल्याबद्दल समुचित प्राधिकरणाविरुद्ध केलेली कोणतीही हक्क मागणी कोणतेही दिवाणी न्यायालय दाखल करून घेणार नाही.

कालव्याच्या सिंचनलाभ क्षेत्रातील जमिनीमध्ये विहिरी खोदल्याचे कळविणे.

**१०५.** (१) या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्यावर किंवा त्या कलमान्वये त्या अधिसूचनेत फेरबदल केल्याच्या दिनांकापासून, अशा अधिसूचनेत उल्लेख केलेल्या कालव्याच्या सिंचन लाभ क्षेत्रातील आपल्या जमिनीमध्ये विहिर बांधण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती आपला तसे करण्याचा हेतू असल्याचे कालवा अधिकाऱ्यास कळविल.

(२) अशा व्यक्तीने कालवा अधिकाऱ्यास न कळविता कोणतीही विहिर बांधल्यास, कालवा अधिकाऱ्यास, जास्तीत जास्त शंभर रुपये इतक्या रकमेचा द्रव्यदंड त्या व्यक्तीवर लादता येईल.

समुचित प्राधिकरणाद्वारे नियंत्रण केल्या जाणाऱ्या किंवा व्यवस्था ठेवण्यात येणाऱ्या तलावाच्या पात्रामधील जमिनीसंबंधीचा आणि तलाव, इत्यादीमध्ये मच्छिमारी करणे व नौका चालवणे यासंबंधीचा हक्क समुचित प्राधिकरणाकडे निहित असणे.

**१०६.** समुचित प्राधिकरणाद्वारे व्यवस्था ठेवण्यात येणाऱ्या किंवा नियंत्रण केल्या जाणाऱ्या कोणत्याही कालव्याच्या पात्रातील किंवा काठावरील जमिनीवर गवत कापणे, गुरे चारणे, लागवड करणे, किंवा इतर कामे करणे किंवा कालवा किंवा पाट यावर त्यावरून पलीकडे किंवा अंगाने, जलाशयात किंवा तलावात मासेमारी करणे किंवा नौका चालविणे यासंबंधीचे सर्व हक्क समुचित प्राधिकरणाकडे निहित असतील आणि समुचित प्राधिकरण, असे कोणतेही हक्क विहित करण्यात येईल अशा रीतीने देऊ शकेल.

खाणकाम, दगड खाणकाम यास मनाई.

**१०७.** कोणतीही व्यक्ती कालव्याच्या हद्दीपासून दोनशे मीटर अंतरामध्ये ज्यात स्फोटकांचा वापर करणे आवश्यक असेल असे खाणकाम किंवा दगड खाणकाम विषयक कामे याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय करणार नाही.

**१०८.** ज्या बाबतीत कोणत्याही कालव्यास नुकसान पोहोचविणारी, त्यात फेरफार करणारी, तो मोठा करणारी किंवा त्यात अडथळा निर्माण करणारी किंवा अशा कालव्यात नुकसान पोहोचविण्यास किंवा त्यात अडथळा निर्माण करण्यास कारणीभूत होणारी किंवा योग्य प्राधिकाराशिवाय अशा कालव्यात फेरफार करण्यास किंवा तो मोठा करण्यास कारणीभूत होणारी व्यक्ती, कालवा अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतरही ओळखून काढता येत नसेल तेव्हा कालवा अधिकाऱ्यास, त्याचा लाभ मिळणाऱ्या सर्व जमिनीच्या धारकास व ताबाधारकास कमीत कमी एक महिन्याच्या मुदतीची लेखी नोटीस देऊन आणि त्यांची कोणतीही अभिवेदने असल्यास ती अभिवेदने ऐकून घेतल्यानंतर अशा नुकसानीच्या दुरुस्तीचा किंवा असा फेरफार, अडथळा काढून टाकण्याचा किंवा, यथास्थिति, मोठा केलेला कालवा पूर्ववत करण्यासाठी आलेला खर्च त्यास योग्य वाटेल अशा प्रमाणात त्यांच्याकडून वसूल करता येईल.

अपराधी निश्चित करता येत नसेल त्यावेळी नुकसानीच्या दुरुस्तीच्या खर्चाची वसुली.

**१०९.** या अधिनियमांन्वये कोणतीही चौकशी करण्याचा अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास, साक्षीदारांना समन्स काढून बोलावण्यासंबंधी व त्यांची तपासणी करण्यासंबंधी आणि कागदपत्र सादर करण्यासंबंधी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयास प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करता येईल ; आणि अशी प्रत्येक चौकशी भारतीय दंड संहितेची कलमे, १९३ व २२८ यांच्या अर्थांतर्गत न्यायीक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

१९०८ चा ५. १८६० चा ४५.

साक्षीदारांना समन्स काढून बोलावण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार.

**११०.** समुचित प्राधिकरणास आणि समुचित प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेस अधीन राहून कोणत्याही कालवा अधिकाऱ्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्याला देण्यात आलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार आणि त्यावर लादण्यात आलेली कोणतीही कर्तव्ये, कोणतेही निर्बंध व शर्ती असल्यास, त्यांना अधीन राहून, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या अधिकाऱ्यालाही वापरता व पार पाडता येईल.

अधिकार व कर्तव्ये सोपवणे.

**१११.** या अधिनियमांन्वये कोणत्याही नोटीशीचीबजावणी त्यामध्ये उल्लेख केलेल्या अधिकाऱ्याने सही केलेली नोटीशीची प्रत स्वाधीन करून किंवा देऊन करता येईल. शक्य असेल तेव्हा अशी नोटीस, तीत नाव नमूद केलेल्या व्यक्तीवर बजावण्यात येईल. अशी व्यक्ती सापडली नाही तर तिच्या कुटुंबातील तिच्याबरोबर राहणाऱ्या कोणत्याही प्रौढ पुरुषावर अशी नोटीस बजावण्यात येईल ; आणि असा कोणताही प्रौढ पुरुष सापडत नसेल तर, त्या नोटीशीत नाव नमूद केलेली व्यक्ती सामान्यतः ज्या घरात रहात असेल किंवा धंदा करीत असेल त्या घराच्या बाहेरच्या दरवाजावर नोटीशीची प्रत चिकटवून ती बजावण्यात येईल ; आणि अशा व्यक्तीचे सामान्यतः राहण्याचे ठिकाण त्या जिल्ह्यात नसेल तर, कोणतीही नोटीस अशा व्यक्तीच्या राहण्याच्या नेहमीच्या ठिकाणाच्या पत्त्यावर त्या व्यक्तीच्या नावाने अशा नोटीशीची एक प्रत डाक नोंदणी केलेल्या पाकीटातून पाठवून बजावता येईल.

नोटीस बजावणे.

**११२.** (१) राज्य शासनास लेखी आदेशाद्वारे कंपनीस किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेस तिच्याकडून बांधण्यात आलेल्या नियंत्रित करण्यात येणाऱ्या किंवा व्यवस्थापन करण्यात येणाऱ्या कालव्यांची, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व अशा मुदतीत, ते सुस्थितीत ठेवण्यासाठी किंवा व्यवस्था पाहण्यासाठी त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा सूचना किंवा निदेश देता येतील आणि अशा सूचना किंवा निदेश यांची अंमलबजावणी करणे हे कंपनीचे किंवा जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल.

कंपनी व जिल्हा परिषदांना त्यांच्या कालव्यांच्या सुस्थितीत ठेवण्याच्या संबंधात निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

(२) अशा सूचनांची किंवा निदेशांची, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत अंमलबजावणी करण्यात त्या कंपनीने किंवा जिल्हा परिषदेने कसूर केल्यास, राज्य शासनास, पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशात दर्शविलेल्या रीतीने स्वखर्चाने त्या कालव्याची दुरुस्ती किंवा तो सुस्थितीत ठेवता येईल ; आणि कालव्याच्या अशा दुरुस्तीचा किंवा सुस्थितीत ठेवण्याचा खर्च त्या कंपनीकडून किंवा जिल्हा परिषदेकडून राज्य शासनास ताबडतोब देण्यात येईल.

(३) अशा दुरुस्तीचा किंवा सुस्थितीत ठेवण्याचा खर्च अशा रीतीने देण्यात न आल्यास, याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास ज्यात कंपनीचे खाते असेल अशा किंवा ज्यात त्या जिल्हा परिषदेचा जिल्हा निधी ठेवण्यात येत असेल अशा कोषागाराच्या किंवा बँकेच्या प्रभारी अधिकाऱ्यास दुरुस्तीचा किंवा सुस्थितीत ठेवण्याचा खर्च किंवा त्याचा शक्य असेल तितका जास्त भाग अशा खात्याच्या किंवा, यथास्थिती, अशा निधीच्या शिलकीतून देण्याबाबत निदेश देता येईल.

लोकसेवक व अन्य काही व्यक्ती यांना कायदेशीर कार्यवाहीपासून संरक्षण देणे.

**११३.** या अधिनियमांन्वये नेमलेल्या कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध किंवा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध या अधिनियमाच्या तरतुदीद्वारे किंवा तद्न्वये केलेल्या नियमानुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणताही वाद, खटला किंवा अन्य कोणतीही कायदेशीर कार्यवाही चालविता येणार नाही.

नियम.

**११४.** (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पोट-कलम (१) च्या तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता अशा नियमांत पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) कलम २ च्या खंड (२४) अन्वये, कालव्यातून पाणीपुरवठा किंवा पाण्याची सोय केल्याबद्दल ज्या रीतीने रक्कम देण्यात येईल ती रीत ;

(दोन) कलम ४ च्या खंड (क) अन्वये जमिनीच्या संबंधात '' पाणथळ '' या शब्दाचा अर्थ घोषित करणे ;

(तीन) कलम १० अन्वये, ज्यांच्याकडून कर्तव्ये पार पाडण्यात येतील किंवा अधिकारांचा वापर करण्यात येईल अशा कालवा अधिकाऱ्यांचा वर्ग विनिर्दिष्ट करणे ;

(चार) (क) कलम ३४, पोट-कलम (२) च्या खंड (नऊ) अन्वये, शेतातील पाटांच्या सक्तींच्या बांधकामांच्या योजनेच्या मसुद्यात समाविष्ट असेल असा इतर तपशील विहित करणे ;

(ख) कलम ३४ ची पोट-कलमे (३) व (४) या अन्वये योजनेचा मसुदा व अंतिम योजना प्रसिद्ध करण्याची रीत विहित करणे ;

(पाच) कलम ३५ अन्वये, अंतिम योजनेखाली शेतातील पाट बांधण्याची रीत विहित करणे ;

(सहा) कलम ३७ च्या पोट-कलम (२) अन्वये, जमिनींच्या धारकांना व ताबाधारकांना शेतातील पाट बांधण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना व नोटीस द्यावयाची रीत विहित करणे ;

(सात) कलम ३९, पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये, प्राधिकृत कालवा अधिकाऱ्याकडून देण्यात यावयाच्या, शेतातील पाट पूर्ण झाल्याच्या प्रमाणपत्राचा नमुना विहित करणे ;

१८९४ चा १. (आठ) कलम ४४, पोट-कलम (३) अन्वये भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या तुरतुदी– जेथवर त्या भूमि संपादनाला किंवा हक्क किंवा हितसंबंध नष्ट करण्यास लागू होतात तेथवर– त्या अंमलात आणण्याशी संबंधित सर्व बाबी ;

(नऊ) कलम ४७, पोट-कलम (३) अन्वये पिके निर्धारीत करणे व अशा पिकांची ज्या कालावधीत पेरणी करण्यात येईल, लावणी करण्यात येईल व उत्पादन काढण्यात येईल तो किंवा ते कालावधी निश्चित करणे आणि त्या प्रयोजनासाठी आणि त्या पोट-कलमात निर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी पाणी पुरवठ्याचे विनियम करणे ;

(दहा) कलम ५२ अन्वये, पाण्याच्या अनधिकृत वापराबद्दल आकार निश्चित करणे;

(अकरा) कलम ५३, पोट-कलम (१) अन्वये, वाया जाऊ दिलेल्या पाण्याबद्दल आकार निश्चित करणे ;

(बारा) कलम ५७, पोट-कलम (१) अन्वये, कोणत्याही कालव्यातील पाणी पुरवठ्याचे विनियम करणे आणि तसेच पाणी पुरवठ्यासाठी करावयाचे अर्ज ज्या दिनांकापूर्वी करावयाचे तो दिनांक व पुरवठा मंजूर करण्याचा दिनांक विहित करणे ;

(तेरा) कलम ५८, पोट-कलम (१) अन्वये, कालव्यातील पाणी पुरवठ्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व पोट-कलम (५) अन्वये, पाणी पुरवठ्यासाठी केलेल्या अर्जावर ज्या रीतीने कार्यवाही करण्यात येईल ती रीत विहित करणे ;

(चौदा) कलम ६८ अन्वये, कालव्याच्या प्रमुख बांधकामात किंवा वितरण व्यवस्थेत दोष निर्माण झाल्यामुळे पिके आली नसतील किंवा पाणी वाटप करता आले नसेल त्या बाबतीत, सिंचन करारान्वये पाणी पुरवठ्याकरिता आकारावयाच्या पट्टीपासून सूट देण्याची आणि त्या कलमाच्या खंड (ड) अन्वये पट्टीतून वजात करण्याची तरतूद करणे ;

(पंधरा) कलम ७१ अन्वये, कोणत्याही सिंचन कराराखालील कोणत्याही जमिनींच्या संबंधात, असा करार रद्द करण्यात आल्यास द्यावयाच्या नुकसान भरपाईच्या वितरणाची व प्रदानाची तरतूद करणे ;

(सोळा) कलम ७४, पोट-कलम (३) (ग) अन्वये, पाणी समितीस देण्यात आलेल्या रकमांचे लेखे तिच्याकडून ज्या रीतीने ठेवण्यात येतील ती रीत विहित करणे ;

(सतरा) कलम ८८, पोट-कलम (१) अन्वये, जादा आकाराची रक्कम निर्धारित करणारे नियम करणे ;

(अठरा) कलम ९१, अन्वये तातडीने करणे आवश्यक असलेल्या बांधकामात किंवा दुरुस्तीच्या कामात साहाय्य करण्यास भाग पाडले जाण्यास योग्य अशा व्यक्तींची यादी, जिल्हाधिकारी, ज्या मार्गदर्शक तत्त्वांना अधीन राहून तयार करील, तीत भर घालील किंवा फेरफार करील ती मार्गदर्शक तत्त्वे ;

(एकोणीस) कलम ९३ अन्वये, कालव्याची कोणतीही बांधकामे, काठ किंवा पाट यामधून किंवा यावरून गुराढोरांच्या किंवा वाहनांच्या येण्या-जाण्याचे विनियमन करण्यासाठी आणि तसेच कोणत्याही नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती द्यावी लागेल असा निदेश देण्यासाठी ;

(वीस) कलम १०३ च्या पोट-कलम (२) अन्वये, जेथे कोणतीही विनिर्दिष्ट तरतूद नसेल अशा प्रकरणी, अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये काढण्यात आलेल्या आदेशाविरुद्ध ज्यांच्याकडे अपील दाखल करावयाचे ते अधिकारी विहित करणे ;

(एकवीस) कलम १०५ अन्वये, कालव्याच्या सिंचन योग्य क्षेत्राखालील स्वतःच्या जमिनीत विहीर बांधू इच्छिणाऱ्या व्यक्तीने कालवा अधिकाऱ्यास ज्या रितीने ते कळविणे आवश्यक आहे ती रीत विहित करणे ;

(बावीस) कलम १०६ अन्वये, समुचित प्राधिकरण, तलाव, पात्रातील जमिनी यासंबंधीचे आणि तलाव इत्यादीमध्ये मच्छिमारी करणे व नौका चालविणे यासंबंधीचे हक्क ज्या रितीने देऊ शकेल ती रीत विहित करणे ;

(तेवीस) कलम १२० अन्वये, कालवा अधिकाऱ्यास कोणत्याही दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारे विषयक बांधकामाच्या परिरक्षणाचा किंवा व्यवस्थापनाचा विचार करता, हक्क अभिलेखात अंतर्भूत असलेला जो कोणताही हक्क त्याच्या मते चालू ठेवणे शक्य नसेल तो, ज्या मार्गदर्शक तत्त्वास अधीन राहून कमी करता येईल ती मार्गदर्शक तत्त्वे ;

(चोवीस) कलम १२९, पोट-कलम (१) अन्वये, जेथे दुसऱ्या वर्गाचे पाटबंधारे विषयक बांधकाम असेल अशा प्रत्येक गावासाठी पाणी समिती घटीत करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करणे ;

(पंचवीस) या अधिनियमांन्वये किंवा सर्वसाधारणपणे त्याची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करणे आवश्यक असतील अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) या अधिनियमांन्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून असा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमांन्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**११५.** या अधिनियमातील कोणतीही गोष्ट, जिल्हा परिषदेखेरीज इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा त्याकडे निहित असणाऱ्या किंवा त्याच्या सुनियंत्रणाखालील कोणत्याही कालव्यास, पाटास, जलाशयास, सरोवरास किंवा इतर जलसंचयास लागू असल्याचे मानण्यात येणार नाही.

**११६.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उपसा सिंचनाचे बांधकाम एखाद्या संस्थेकडून बांधण्यात, देखभाल करण्यात आलेले असेल किंवा तिच्या नियंत्रणाखाली असेल किंवा अशा प्रारंभानंतर कोणत्याही संस्थेची, असे कोणतेही बांधकाम करण्याची, त्याची देखभाल करण्याची किंवा नियंत्रण करण्याची इच्छा असेल आणि या अधिनियमाच्या आणि त्या अन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या विवक्षित तरतुदी अशा बांधकामास किंवा बांधकामाच्या सिंचनलाभ क्षेत्राखालील सर्व जमिनींना किंवा त्याच्या लगतच्या जमिनींना लागू व्हावेत अशी त्या संस्थेची इच्छा असेल तर, ती संस्था, या बाबतीत राज्य शासनाकडून यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्याकडे, बांधकामाची जागा, बांधकामाच्या

सिंचनलाभ क्षेत्रातील क्षेत्र आणि अशा पूर्वोक्त बांधकामाला किंवा जमिनींना ज्या लागू व्हाव्यात अशा या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी व कालवा अधिकारी फर्मावील असा इतर तपशील त्यात नमूद केलेला अर्ज करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेला अर्ज मिळाल्यानंतर, कालवा अधिकारी अर्जातील मजकुराची पडताळणी करील व तो अर्ज त्यावरील त्याच्या स्वतःच्या अभिप्रायासह राज्य शासनाकडे पाठवील. अभिप्राय पाठवताना कालवा अधिकारी विशेषतः अधिनियमाच्या व नियमांच्या ज्या तरतुदी उपसा सिंचन बांधकामास आणि पूर्वोक्त जमिनींना लागू करण्यात याव्यात अशी त्या संस्थेची इच्छा असेल अशा तरतुदींचे परीक्षण करील आणि अशा बांधकामाच्या किंवा जमिनींच्या संबंधात संस्थेला जे संरक्षण मिळण्याची शक्यता असेल त्या संरक्षणाची व्याप्ती, अधिनियमाच्या किंवा नियमांच्या इतर कोणत्याही तरतुदी लागू करणे आवश्यक आहे किंवा नाही, किंवा त्याने विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदी अशा बांधकामास आणि जमिनींना लागू करण्यात येऊ नये आणि अशा तरतुदी उपसा सिंचन बांधकामास व जमिनींना लागू केल्यामुळे उद्‌भवणारे परिणाम याबाबतचे स्वतःचे अभिप्राय नमूद करील.

(३) अर्ज व कालवा अधिकाऱ्याचे अभिप्राय मिळाल्यानंतर राज्य शासनास, राजपत्रातील अधिसुचनेद्वारे, अधिनियमांच्या व त्याखालील कोणतेही नियम असल्यास त्या नियमांच्या अशा तरतुदी अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीच्या (कोणत्याही असल्यास) अधीन राहून अशा पाटबंधारे विषयक बांधकामांना व जमिनींना लागू होतील असा निदेश देता येईल आणि त्यानंतर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांच्या व नियम कोणतेही असल्यास त्यांच्या तरतुदी, समुचित प्राधिकरणाच्या कालव्याच्या संबंधात ज्याप्रमाणे अंमलात येतात त्याचप्रमाणे अशा उपसा सिंचनविषयक बांधकामांच्या व जमिनींच्या संबंधातील अंमलात येतील :

परंतु, पोट-कलम (१) अन्वये केलेल्या अर्जामध्ये अंतर्भूत असलेली संस्थेची विनंती मान्य करण्याची तरतूद जीमध्ये नसेल अशी कोणतीही अधिसूचना, बाधा पोहोचलेल्या व्यक्ती आणि ती संस्था यांना स्वतःची बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आलेली असल्याखेरीज काढण्यात येणार नाही.

१९६१ चा महा. २४. **स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये, संस्था याचा अर्थ, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याअन्वये नोंदणी केलेली किंवा नोंदणी झाल्याचे मानण्यात येणारी उपसा सिंचन संस्था, असा आहे.

## भाग तेरा

### दुसऱ्या वर्गाची पाटबंधारेविषयक बांधकामे

**११७.** हा भाग, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या फक्त दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामांनाच लागू होईल. दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामांना हा भाग लागू असणे.

**११८.** (१) दुसऱ्या वर्गाचे पाटबंधारेविषयक बांधकाम, कलम २ च्या खंड (२) च्या अर्थांतर्गत कालवा असल्याचे मानण्यात येईल आणि अशा बांधकामास फक्त पुढील कलमे व भाग, यथाशक्य, लागू होतील :— दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामांना या अधिनियमाची विवक्षित कलमे व भाग लागू असणे.

कलम २, भाग २, कलमे ११, १४, १५, १७ ते २१, २३ ते ३० (दोन्ही धरून), भाग ५, कलमे ४९, ५१, भाग ७ व भाग १० ते १२ (दोन्ही धरून).

(२) पूर्वोक्त कलमे व भाग हे, या भागाच्या प्रयोजनासाठी पुढील फेरबदलांच्या अधीन असतील :—

(एक) कलम २३ मध्ये, (जलप्रवाह वगळता) शेतातील पाट हे, या मजकुराऐवजी, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच तयार केलेल्या किंवा यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे सुधारणा केलेल्या हक्क अभिलेखात नोंदलेल्या कोणत्याही हक्कांना अधीन राहून (जलप्रवाह वगळता) शेतातील पाट हे, हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) कलम २४ मध्ये, ज्या व्यक्तीची या मजकुराऐवजी, पूर्वोक्ताप्रमाणे अधीन राहून, ज्या व्यक्तीची हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) कलम २७, पोट-कलम (२) मध्ये कलम ५९, या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि अशा अटींवर या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे तयार केलेल्या किंवा यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे सुधारणा केलेल्या हक्क अभिलेखात नोंद करण्यात येतील अशा अटींवर.

(चार) कलम २८ मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

परंतु, पूर्वीच तयार केलेल्या किंवा यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे सुधारणा केलेल्या हक्क अभिलेखात नोंदलेल्या, पाण्यासंबंधीच्या कोणत्याही हक्कांना अशा खाजगी व्यवस्थेमुळे बाधा पोहोचणार नाही.

(पाच) कलम ५१, पोट-कलम (१) मध्ये, " करण्याबद्दलचा प्रत्येक करार हा " या मजकुरा-ऐवजी " करण्याबद्दल, पूर्वीच तयार केलेल्या किंवा यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे सुधारणा केलेल्या हक्क अभिलेखात ज्यांची नोंद केलेली असेल असे सर्व हक्क हे," हा मजकूर आणि " हस्तांतरणीय असेल " या मजकुराऐवजी " हस्तांतरणीय असतील " हा मजकूर आणि " हस्तांतरित झाला आहे " या मजकुराऐवजी " हस्तांतरित झाले आहेत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ; व त्याच कलमाची पोट-कलमे (२) व (३) वगळण्यात येतील ;

(सहा) कलम ७५, पोट-कलम (१) मधील, परंतुकाचा खंड (क) आणि पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(सात) कलम ७७, पोट-कलम (१) मधील कलम १२, कलम १३ हा मजकूर वगळण्यात येईल ;

(आठ) कलम ९३, खंड (१) मध्ये, उप-खंड (ज) वगळण्यात येईल ;

(नऊ) कलम १०३ मध्ये, प्रत्येक आदेश या मजकुरानंतर आणि भाग तेरा अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखांचे पुनरीक्षण.

**११९.** (१) दुसऱ्या वर्गाच्या कोणत्याही पाटबंधारेविषयक बांधकामाच्या बाबतीत तयार केलेला आणि राज्याच्या पाटबंधारेविषयक हक्क अभिलेख्याची सुधारणा कोणत्याही भागात या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेला पाटबंधारेविषयक हक्क अभिलेख हा अशा दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामाचा हक्क अभिलेख असल्याचे मानण्यात येतील आणि तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणारा महसूल अधिकारी असेल असा याबाबत यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेला कालवा अधिकारी वेळोवेळी अशा हक्क अभिलेखात सुधारणा करू शकेल.

(२) अशा सुधारणा करते वेळी कोणत्याही व्यक्तीच्या हक्क मागण्यांची पूर्तता करण्यासाठी शासनाच्या अभिलेखातून आणि त्याची माहिती असण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष आणि संबंधित व्यक्ती किंवा त्यांचे साक्षीदार सादर करतील असे लेखी किंवा तोंडी पुरावे यावरून कालवा अधिकाऱ्यास हक्काचे स्वरूप निश्चित करून घेता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी, कालवा अधिकाऱ्यास स्वतः किंवा त्या प्रयोजनासाठी त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यामार्फत, कोणत्याही बांधकामालगतच्या जमिनीवर प्रवेश करता येईल आणि त्याचे सर्वेक्षण करता येईल, सीमांकन करता येईल किंवा त्याचा नकाशा तयार करता येईल.

**१२०.** जर या बाबत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास असे आढळून येईल की, दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामांचे देखभाल किंवा व्यवस्थापन या गोष्टी लक्षात घेता हक्क अभिलेखातील कोणत्याही हक्काचा, नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत, वापर करणे, चालू ठेवणे शक्य नाही, तर तो (याबाबतीत राज्य शासन वेळोवेळी विहित करील, अशा नियमांना अधीन राहून) असा हक्क तो धारण करणाऱ्यास त्याऐवजी रोख रक्कम देऊन किंवा जमीन देऊन किंवा त्यास योग्य वाटेल अशा अन्य रितीने संपूर्णतः किंवा अंशतः कमी करील, आणि त्यानुसार तो पाटबंधाऱ्याच्या हक्क अभिलेखात सुधारणा करील. हक्क कमी करणे.

**१२१.** दुसऱ्या वर्गाच्या कोणत्याही पाटबंधारेविषयक बांधकामातील पाणीपुरवठा, ज्या कामामुळे हक्क अभिलेख तयार करण्याच्या किंवा त्याची सुधारणा करण्याच्या वेळी असलेल्या पाणी पुरवठ्यापेक्षा अधिक होईल असे कोणतेही काम स्वखर्चाने राज्य शासन हाती घेईल त्यावेळी, राज्य शासनास, अशारीतीने नोंदलेल्या कोणत्याही हक्कांना बाधा न आणता, अशा अतिरिक्त पाण्यावरील हक्क, राज्य शासनाकडे निहित असेल आणि राज्य शासनास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याचे उपयोजन करता येईल असा निदेश देता येईल आणि अशा निदेशानुसार हक्क अभिलेखात सुधारणा करण्यात येईल. पुरवठा वाढविणारी कामे हाती घेण्यात येतील त्याबाबतीत राज्य शासनाचा अधिकार.

**१२२.** या भागान्वये जेव्हा कोणत्याही पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखात सुधारणा करण्यात आली असेल तेव्हा, ज्या तालुक्यात असे काम असेल त्या तालुक्याच्या तहसिलदाराच्या कार्यालयात आणि जिल्हाधिकाऱ्याचे मते ज्या शहरावर आणि गावावर अशा हक्क अभिलेखाचा परिणाम होत असेल अशा प्रत्येक शहरात व गावात त्या क्षेत्राच्या रहिवाशाच्या भाषेत तो प्रसिद्ध करण्यात येईल. पाटबंधारेविषयक हक्क अभिलेख प्रसिद्ध करणे.

**१२३.** कोणत्याही पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखात केलेली नोंद ही, अभिलिखित केलेल्या बाबीसंबंधीच्या कोणत्याही विवादामध्ये पुरावा म्हणून संबद्ध असेल आणि एतद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत किंवा तिच्याऐवजी नवीन नोंद कायदेशीररीत्या दाखल करण्यात येईपर्यंत उक्त नोंद खरी असल्याचे गृहीत धरण्यात येईल : पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखातील नोंदी पुरावा म्हणून संबद्ध असणे.

परंतु, या भागान्वये राज्य शासनाला देण्यात आलेल्या अधिकारांपैकी कोणताही अधिकार मर्यादित होतो असा अशा कोणत्याही नोंदीचा अर्थ लावण्यात येणार नाही.

**१२४.** (१) या भागान्वये जिल्हाधिकारी, कालवा अधिकारी किंवा अन्य व्यक्ती यांस किंवा राज्य शासनास प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करताना राज्य शासनाच्या आदेशानुसार कार्यवाही करणाऱ्या अशा जिल्हाधिकाऱ्याकडून, कालवा अधिकाऱ्याकडून किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात राज्य शासनाविरुद्ध कोणताही वाद किंवा कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. जिल्हाधिकाऱ्यास वादाची नोटीस देणे.

(२) ज्यामध्ये ठेवण्यात आलेल्या कोणत्याही पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखात केलेली एखादी नोंद प्रत्यक्षतः किंवा प्रश्नास्पद करण्यात आली असेल असा कोणताही वाद किंवा कार्यवाही ही जर या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून किंवा, कलम १२२ अन्वये सुधारित अभिलेख प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत दाखल करण्यात आली नसेल तर ती फेटाळण्यात येईल आणि अशा पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखातील कोणत्याही नोंदीच्या संदर्भात कालवा अधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध एक किंवा अधिक अपिले करण्यात आली असतील तर या भागानुसार निश्चित करण्यात आल्याप्रमाणे, अंतिम अपील प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून (बचाव म्हणून मुदत मर्यादेचा आधार घेतलेला नसला तरी) फेटाळण्यात येईल.

किरकोळ दुरुस्त्या पार पाडण्याचे बंधन.

**१२५.** दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक प्रत्येक बांधकामाच्या बाबतीत, पुढील दुरुस्त्या ज्या व्यक्तींवर पार करण्याचे बंधन लगत पुढील कलमांन्वये घालण्यात आले आहे अशा व्यक्तींकडून करण्यात येतील :—

(१) दर्शनी दगडी बांधकामाच्या विशेषतः मागील बाजूला असलेल्या घळी, खाचा व छिद्रे भरुन काढणे आणि बांध, तलाव, पाटाचे काठ किंवा उक्त दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक बांधकामाचे अन्य भाग यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या तत्सम स्वरूपाच्या सर्व किरकोळ दुरुस्त्या.

(२) अशा बांधकामाची सुरक्षितता धोक्यात आणणारी किंवा त्याची स्थिती झाकून टाकणारी काटेरी फळझाडे, रोपटे आणि अन्य वनस्पती यांची अशा बांधकामावर, वाढ होण्यास प्रतिबंध करणे.

(३) अशा बांधकामाच्या अंतर्भागातील पाण्याच्या उतार क्षेत्राच्या संरक्षणासाठी लावण्यात आलेल्या झुडुपांचे व गवतांचे जतन करणे.

(४) जलद्वारे, कालवे, चिरेबंदी किंवा कॉंक्रीट बांधकामे, पुरवठा व वाटप प्रणाल यांच्यामधील गाळ काढणे.

(५) सांडवे व सांडपाण्याचे प्रणाल स्वच्छ करणे.

किरकोळ दुरुस्त्या पार पाडण्याच्या बंधनाचा भार.

**१२६.** लगतपूर्ववर्ती कलमांन्वये तरतूद केलेल्या दुरुस्त्या पार पाडण्याचे बंधन अशा बांधकामामधून जलसिंचित होणाऱ्या कोणत्याही जमिनीच्या संदर्भात बिनदुमाला जमिनीच्या बाबतीत जमिनीच्या भोगवटादारावर आणि अन्य सर्व जमिनींच्या बाबतीत, जमिनीच्या धारकांवर संयुक्तपणे व पृथकपणे घालण्यात आले आहे असे मानण्यात येईल.

[...]क व बंधने अंमलात [...]आणण्याचा अधिकार.

**१२७.** ज्या व्यक्तीवर या भागाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींन्वये दुसऱ्या वर्गाच्या पाटबंधारेविषयक कोणत्याही बांधकामाच्या संदर्भात कोणतेही बंधन घालण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशा रीतीने घालण्यात आलेल्या बंधनाचे पालन करण्यात कसूर करील किंवा कोणतीही व्यक्ती पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखात नोंदणी केलेल्या कोणत्याही हक्काचे उल्लंघन करील तर, याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास तिला नोटीस देऊन त्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीमध्ये अशा बंधनाचे पालन करण्यास किंवा अशा हक्काच्या उल्लंघनापासून परावृत्त होण्यास फर्माविता येईल आणि त्यात कसूर झाल्याच्या बाबतीत, उक्त बंधन पार पाडण्यासाठी किंवा उक्त हक्काच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येईल आणि अशा रितीने केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम राज्य शासनास देय असलेली रक्कम असेल व ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य असेल.

१२८. कलम १२५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दुरुस्त्यांपैकी कोणतीही दुरुस्ती करण्यात झालेल्या कोणत्याही कसुरीबद्दल किंवा हयगयीबद्दल तहसीलदारास विनाविलंब कळविणे हे ज्याच्या हद्दीत दुसऱ्या वर्गाचे पाटबंधारेविषयक कोणतेही बांधकाम किंवा अशा बांधकामाचा कोणताही भाग असेल अशा कोणत्याही गावाच्या तलाठ्याचे किंवा त्या प्रयोजनासाठी नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे कर्तव्ये असेल.

दुरुस्त्या करण्यात झालेल्या कसुरीबद्दल कळविणे हे तलाठ्याचे कर्तव्ये असणे.

१२९. (१) ज्या गावात दुसऱ्या वर्गाचे पाटबंधारेविषयक बांधकाम असेल अशा प्रत्येक गावांमध्ये, अशा बांधकामामधील पाण्याच्या वाटपाचे नियमन करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमांन्वये केलेल्या नियमानुसार, एक पाणी समिती घटीत करण्यात येईल.

प्रत्येक गावासाठी पाणी समिती घटित करणे व तिचा अधिकार.

(२) अशा समितीमध्ये, पाच सदस्यांचा अंतर्भाव असेल, त्यापैकी, एक तलाठी असेल आणि उरलेली चार सदस्य हे अधीक्षक अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कालवा अधिकाऱ्याकडून पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखात तरतूद केल्याप्रमाणे पाणी घेण्याचा हक्क असलेल्या भूसिंचकामधून नामनिर्देशित करण्यात येतील. समितीचे सदस्य, त्याबाबतीत यथोचितरीत्या काढलेल्या आदेशाद्वारे केलेल्या त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीपर्यंत पद धारण करतील. राज्य शासनाने किंवा यथास्थिति जिल्हा परिषदेने कोणत्याही वेळी कोणतेही कारण नमूद न करता लेखी आदेशाद्वारे समितीच्या सर्व किंवा कोणत्याही सदस्याची नियुक्ती समाप्त करणे कायदेशीर असेल.

(३) पाणी समितीला वेळोवेळी बैठकी घेता येतील आणि आपले कामकाज करण्यासाठी तिला योग्य वाटेल अशी कार्यपद्धती अनुसरता येईल.

(४) ती पाणी समिती,—

(क) अशा कोणत्याही बांधकामाशी संबंधित असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणाचा तपास लावण्यात व त्यांस प्रतिबंध करण्यात कालवा अधिकाऱ्यास सहाय्य करील, अशा बांधकामास हानी पोहोचण्यास प्रतिबंध करील व त्यास बुद्धिपुरस्सर पोचविण्यात आलेल्या हानीबद्दल कालवा अधिकाऱ्यास कळवील ;

(ख) राज्य शासनाच्या किंवा याबाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने याबाबतीत केलेल्या विनियमानुसार पाण्याचे वाटप करण्यास जबाबदार असेल ;

(ग) आडपीक आणि अन्य पद्धतीने लागवड करावयाची पीके ठरवील ;

(घ) कलम १२५ मध्ये निर्देश केलेल्या दुरुस्त्या करण्यास जबाबदार असलेल्या व्यक्ती उक्त बांधकामाच्या योग्य निधीसाठी जबाबदार असल्याची सुनिश्चित करील ;

(ङ) कलम १२५ मध्ये निर्देशिलेल्या दुरुस्त्या करण्यात हयगय करणाऱ्या किंवा टाळाटाळ करणाऱ्या व्यक्तींची किंवा कोणत्याही कालव्यामधून— मग तो गावामध्ये असो वा नसो अनधिकृतरित्या पाणी वापरणाऱ्या व्यक्तींची नावे याबाबतीत यथोचितरीत्या अधिकार देण्यात आलेल्या कालवा अधिकाऱ्यास कळवील ;

(च) त्या पाणी समितीस पाण्याच्या अनधिकृत वापराबद्दल किंवा सिंचनासाठी अंगीकारलेल्या कोणत्याही क्रमबाह्य किंवा नियमबाह्य पद्धतीबद्दल दंड बसविण्याचा अधिकार असेल.

(५) शास्तीमध्ये दोनशे रुपयापेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाचा समावेश असू शकेल.

(६) दंडाची रक्कम भरण्यात न आल्यास ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल आणि भरण्यात आलेली दंडाची रक्कम राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्यात येईल.

(७) समितीच्या कोणत्याही निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत, अधीक्षक अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कालवा अधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल आणि समितीचा निर्णय, कालवा अधिकाऱ्याकडे केलेल्या अपिलाच्या अधीन राहून, अंतिम व निर्णायक असेल.

दुसऱ्या वर्गाचे पाटबंधाऱ्याचे कोणतेही विद्यमान बांधकाम निरधिसुचित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**१३०.** राज्य शासनास, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे दुसऱ्या वर्गाचे पाटबंधारेविषयक कोणतेही विद्यमान बांधकाम तसे असण्याचे बंद होईल, असा निदेश देता येईल आणि त्यानंतर, या भागानुसार करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वगळण्यात आलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात असेल त्या खेरीज या भागाच्या तरतुदी त्याच्या संबंधात लागू असल्याचे बंद होईल.

## भाग चौदा

## निरसन व व्यावृत्ती

निरसन व व्यावृत्ती.

**१३१.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर पुढील अधिनियम याद्वारे निरसित करण्यात येत आहेत :—

(एक) मुंबई पाटबंधारे अधिनियम, १८७९ ; — १८७९ चा मुंबई ७.

(दोन) मध्यप्रान्त पाटबंधारे अधिनियम, १९३१ ; — १९३१ चा म. प्रा. ३.

(तीन) मध्यप्रान्त व वऱ्हाड पाण्याचे नियम करण्याबाबत अधिनियम, १९४९ ; — १९४९ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ३७.

(चार) हैदराबाद पाटबंधारे अधिनियम, १३५७-फसली ; आणि — १३५७ फ. चा २४.

(पाच) हैदराबाद पाटबंधारे (सुधारणा अंशदान आणि अंतर्भाव फी) अधिनियम, १९५२ ; — १९५२ चा हैद्राबाद ५.

परंतु अशा निरसनाने,—

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याच्या पूर्वीच्या प्रवर्तनावर किंवा त्यानुसार योग्यरीत्या केलेल्या किंवा होऊ दिलेल्या कोणत्याही बाबीवर, किंवा

(ख) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्यानुसार संपादन केलेल्या, उपार्जित झालेल्या किंवा पत्करलेल्या कोणत्याही हक्कावर, विशेषाधिकारावर, बंधनावर किंवा दायित्वावर,

(ग) अशा रितीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याच्या बाबतीत केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेल्या कोणत्याही शास्तीवर, समपहरणावर किंवा शिक्षेवर, किंवा

(घ) उपरोक्तप्रमाणे असलेल्या कोणत्याही हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, बंधनाच्या, दायित्वाच्या, शास्तीच्या, समपहरणाच्या किंवा शिक्षेच्या बाबतीतील कोणत्याही अन्वेषणावर, कार्यवाहीवर, कायदेशीर कार्यवाहीवर किंवा उपाययोजनेवर, परिणाम होणार नाही ;

आणि जणू काही हा अधिनियम पारित करण्यात आलेला नाही असे समजून, असे कोणतेही अन्वेषण, कार्यवाही, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल, किंवा अमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल :

परंतु, आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकाला अधीन राहून, केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही (निर्माण केलेले कोणतेही भार, केलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही नेमणुका, नियम, अधिसूचना, आदेश, समन्स, नोटिसा, वॉरंट आणि उद्घोषणा, प्रदान केलेले किंवा निहित केलेले कोणतेही प्राधिकार आणि अधिकार, तयार केलेले किंवा सुधारलेले हक्क अभिलेख, बांधलेले कालवे किंवा कोणतीही जलदाय बांधकामे किंवा जलप्रवाह किंवा शेतातील पाट, केलेला पाण्याचा कोणताही पुरवठा, आकारलेल्या पाणीपट्ट्या केलेले करार किंवा संविदा, बसविलेले कोणतेही कर किंवा फी, दिलेली कोणतीही भरपाई, कालव्याच्या निकडीच्या कामासाठी प्राप्त केलेले किंवा पुरविण्यात आलेले कोणतेही कामगार, संपादन केलेले कोणतेही हक्क किंवा पत्करलेली दायित्वे, दाखल केलेले कोणतेही वाद किंवा केलेली कार्यवाही किंवा केलेले अपील आणि अशा रितीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्यानुसार तशी असल्याचे घोषित केलेली दुसऱ्या वर्गाची पाटबंधारेविषयक कोणतीही बांधकामे यांच्यासह), अशी केलेली गोष्ट किंवा केलेली कार्यवाही या अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीनुसार केली असल्याचे मानण्यात येईल, आणि या अधिनियमानुसार केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या कोणत्याही कार्यवाहीद्वारे तिचे अधिक्रमण झाले नाही तर व होईपर्यंत त्यानुसार अंमलात असण्याचे चालू राहील.

## शब्दसूची

| | |
|---|---|
| unify | एकीकरण [अधिनियमाच्या पूर्ण नावामध्ये] (पूर्वी) एकत्रीकरण. |
| assent | संमती [अधिनियमाच्या प्रारंभाला] (पूर्वी) अनुमती. |
| irrigable command | जलप्रदाय [अधिनियमाच्या ज्याअर्थी मध्ये] |
| pipe | जलवाहिन्या [कलम २ (३) (क)] |
| channel | प्रणाल [कलम २ (३) (क)] |
| escape channel | निस्सार प्रणाल [कलम २ (३) (ख)] (पूर्वी) द्वारक जलमार्ग |
| fields channel | शेतातील पाट [कलम २ (३) (ग)] |
| water courses | जलप्रवाह ।कलम २ (३) (ग)] |
| lift irrigation | उपसा सिंचन [कलम २ (३) (च)] |
| groins | जलभिंती [कलम २ (११)] |
| reclamation (system) | उपयोगक्षम (पूर्वी) लागवडयोग्य (पद्धत) [कलम २ (९) (ग)] |
| sewage disposal scheme | मलप्रवाह विल्हेवाट योजना [कलम २ (९) (ग)] |
| from inundation | पुरापासून (पूर्वी) जलमय [कलम २ (११)] |
| occupier | ताबाधारक (पूर्वी) वहिवाटदार [कलम २ (१६)] व (१७)] |
| land cultivation | जमीन कसणे (पूर्वी) लागवड करणे [कलम २ (१६)] |
| artesian well | आर्टिशियन विहिरी [कलम २ (२१)] |
| grantee | प्रदानग्राही (पूर्वी) ग्रहिता [कलम २ (२२) परंतुक] |
| grantor | प्रदानकर्ता (पूर्वी) दाता [कलम २ (२२) परंतुक] |
| ridge | आढेपाट [कलम ३ (४)] |
| affect | बाधा पोचणे (पूर्वी) परिणाम होणे [कलम ३ (५) परंतुक] |
| section | अनुभाग [कलम ४ (५)] |
| holding charge | कार्यभार धारण करणे [कलम ६ (१) (५)] |
| section officer | अनुभाग अधिकारी<br>(पूर्वी) कक्ष अधिकारी<br>कलम [६ (६)] पाटबंधारे विषयक पदनाम |
| holder | धारक |
| subordinate | दुय्यम [कलम ९ (१) ते (६)] |
| class | वर्ग [कलम १० (१) ते (३)] |

| | | |
|---|---|---|
| appropriate authority | समुचित प्राधिकरण | [कलम ११ (१)] |
| stream flowing in a natural channel | नैसर्गिक मार्गाने वाहणारा ओढा | [कलम ११ (१)] |
| still water | स्थिर पाणी | [कलम ११ (१)] |
| percolation | पाझरणे (पूर्वी) झरणे | [कलम ११ (१)] |
| regeneration | पुन्हा वळवणे (पूर्वी) पुनर्निर्मिती | [कलम ११ (१)] |
| release | (पाणी) सोडणे (पूर्वी) मुक्तता | [कलम ११ (१)] |
| water flowing in a natural channel | प्रणालातून वाहणाऱ्या (पूर्वी) जलमार्गातून वाहणाऱ्या. | [कलम ११ (३)] |
| take levels | पातळ्या घेणे (पूर्वी) पातळी मापने | [कलम १२ (ख)] |
| sub-soil | मातीखालील | [कलम १३ (ग)] |
| prosecution of such inquiry and examination. | अशी चौकशी व तपासणी करणे | [कलम १३ (च)] |
| field channel | शेतातील पाट | [कलम १४ (१)] |
| irrigated | सिंचन (पूर्वी) भिजणे | [कलम १४ (१)] |
| securing | करवून घेणे | [कलम १४ (२)] |
| gated waste weir on the dam | धरणावरील दारे असलेला उत्प्लव बांध | [कलम १६] |
| a dwelling house | राहते घर | [कलम १७] |
| flood embankment | पूरबंधारा | [कलम १७] |
| suitable means | वाजवी सोई | [कलम १८] |
| crossing | ओलांडणे (पूर्वी) पार करणे | [कलम १८] |
| culverts | नाले (पूर्वी) अधःप्रणाल | [कलम १८] |
| two dotted lines | ठिपक्यांच्या दुहेरी रेषा (पूर्वी) दोन बिंदूंच्या रेषा | [कलम १८] |
| in question | प्रश्नास्पद करणे (पूर्वी) आक्षेप घेणे | [कलम १८] |
| wide circulation | जास्त खप असणारे | [कलम १९] |
| sewage disposal scheme | सांडपाणी विल्हेवाट योजना (पूर्वी) मलप्रवाह विल्हेवाट योजना. | |
| disposal of effluent | सांड पाण्याची विल्हेवाट (पूर्वी) निःसृत पाण्याची विल्हेवाट. | [कलम २२] |

suitable alignment ... सुयोग्य आखणी करणे
(पूर्वी) अत्यंत योग्य आखणीबद्ध.
[कलम २५ (२)].

obligations ... आबंधने
(पूर्वी) बंधने [कलम २७]

shall call upon ... सांगण्यात येईल [कलम २७]
(पूर्वी) आवश्यक करण्यात आले पाहिजे.

shall ... करील/येईल/जाईल

shall be liable ... जबाबदार असेल
(पूर्वी) पात्र होईल [कलम २५ (५)]

in a fit state of repair ... योग्य अशा सुस्थितीत ठेवणे [कलम २७ (१) (ख)]
(पूर्वी) योग्य अशा दुरुस्त स्थितीत.

subject to the terms ... शर्तींना अधीन राहून
(पूर्वी) शर्तींच्या अधीनतेने [कलम २७ (२) परंतुक]

next superior canal officer ... लगत वरचा वरिष्ठ कालवा अधिकारी
(पूर्वी) लगतचा वरिष्ठ कालवा अधिकारी [२९]

next in rank officer ... लगत वरच्या दर्जाचा अधिकारी.
(पूर्वी) लगतचा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी [३२]

prohibition ... मनाई
(पूर्वी) प्रतिषेध [३० समास]

make a declaration to that effect ... तशा आशयाची घोषणा करणे
(पूर्वी) तशा अर्थाची घोषणा करणे [४७]

to remove or cause to be removed any machine. कोणतेही यंत्र काढून टाकणे किंवा काढून टाकण्याची व्यवस्था करणे.
(पूर्वी) कोणतेही यंत्र हलविणे किंवा हलविण्याची व्यवस्था करणे.
[कलम ५१ (३-क)].

person chargeable ... आकारणी केली जाण्यास योग्य असलेली व्यक्ती.
(पूर्वी) आकारणी योग्य असलेली व्यक्ती.
[कलम ५२ (ख)].

liability when water runs to waste पाणी वाहून वाया जात असेल अशा वेळेचे दायित्व.
(पूर्वी) पाणी वाहून वाया जात असेल अशा वेळेची जबाबदारी.
[कलम ५३ (१)].

in addition to any penalty incurred on कोणत्याही शास्तीसह, शिवाय आणखी....
(पूर्वी) कोणत्याही शास्तीसह.
[कलम ५४].

stream ... ओढा

flow ... ओघ

| | | |
|---|---|---|
| water course | ... | जलप्रवाह |
| artificial drain | ... | कृत्रिम नाली |
| catchment area | ... | पाणलोट क्षेत्र |
| irrigable command area | .... | सिंचन लाभक्षेत्र |
| any cultivated land | ... | लागवडीखालील कोणतीही जमीन<br>(पूर्वी) कोणतीही लागवड केलेली जमीन<br>[कलम ५५ (ख)] |
| volumetric basis | ... | घन परिमाणमापी आधारावर<br>(पूर्वी) घनफलात्मक आधारावर<br>[कलम ५७ (२)] |
| on yearly or seasonal basis | ... | वार्षिक किंवा हंगामी तत्त्वावर<br>(पूर्वी) वार्षिक किंवा हंगामी आधारावर<br>[कलम ५८ (२)] |
| such manner | ... | अशारीतीने<br>(पूर्वी) अशा पद्धतीने<br>[कलम ५८ (५)] |
| shall from time to time be determined by the appropriate authority. | | समुचित प्राधिकरणाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल<br>(पूर्वी) समुचित प्राधिकरणाकडून वेळोवेळी ठरविण्यात येईल<br>[कलम ५९ (१)] |
| water committee | ... | पाणी समिती<br>(पूर्वी) जल समिती<br>[कलम ६० (समास टीप)] |
| management of the canal | ... | कालव्याचे व्यवस्थापन<br>(पूर्वी) कालव्याची व्यवस्था<br>[कलम ७२ (२ च)] |
| reversing the order | ... | आदेश फिरविणे<br>[कलम ७५ (६)] |
| navigation | ... | नौपरिवहन<br>(पूर्वी) नौकानयन<br>[कलम ७५ (ख)] |
| stoppage or diminution of supply of water. | | पाणीपुरवठा बंद किंवा कमी करणे<br>(पूर्वी) पाणीपुरवठा थांबविणे, घट करणे<br>[कलम ८५] |
| percolation | ... | पाझरणे<br>(पूर्वी) झिरपणे<br>[कलम ८८ (२)] |

| | | |
|---|---|---|
| sum amount | ... | विशिष्ट रक्कम |
| sum due amount | ... | विशिष्ट देय रक्कम |
| one person constituted by the state government. | | राज्य शासनाने गठित केलेली एक व्यक्ती<br>(पूर्वी) राज्य शासनाने प्रस्थापित केलेली एक व्यक्ती<br>[कलम ८९ (१-ख)] |
| practice and procedure of the tribunal. | | न्यायाधिकरणाची पद्धती व कार्यपद्धती<br>(पूर्वी) न्यायाधिकरणाची प्रथा व कार्यपद्धती<br>[कलम ८९ (३)] |
| to maintain the established course of irrigation. | | जलसिंचनाचा विद्यमान प्रवाह कायम राखण्यासाठी<br>(पूर्वी) जलसिंचनाचा प्रस्तापित क्रम राखण्यासाठी<br>[कलम ९० (ख)] |
| destroys, defaces or removes any land or level mark or water guage. | | कोणतीही सिमा किंवा पातळी चिन्ह किंवा जलप्रमापी नष्ट करणे, विरुप करणे किंवा काढून टाकणे.<br>(पूर्वी) कोणतीही भूमि किंवा पातळी चिन्ह किंवा जलमापक नष्ट करणे, विरुप करणे किंवा काढून टाकणे.<br>[कलम ९३ (घ)] |
| destroys, tampers with, or removes | | नाश करणे, त्यात अनधिकृत फिरवाफिरव करणे किंवा ते काढून टाकणे.<br>(पूर्वी) नाश करणे, त्यात बिघाड करणे किंवा ते काढून टाकणे<br>[कलम ९३ (ङ)] |
| hedge | ... | झुडपी कुंपण<br>(पूर्वी) कुंपण |
| punishable | ... | शिक्षापात्र<br>(पूर्वी) शिक्षायोग्य<br>[कलम ९८] |
| wet | ... | पाणथळ<br>(पूर्वी) ओलित<br>[कलम ११४ (२) (दोन)] |
| determine the crops | ... | पिके निर्धारित करणे<br>(पूर्वी) पिके निश्चित करणे |
| accounts of the amounts | ... | रकमांचे लेखे<br>(पूर्वी) रकमेचा हिशोब<br>[कलम ११४ (२) (सोळा)] |

| | | |
|---|---|---|
| vessels | ... | नौका<br>(पूर्वी) गलबते<br>[कलम ११४ (२) (बावीस)] |
| water works | ... | जलदाय<br>(पूर्वी) जलप्रदाय<br>[कलम ११५] |
| maintain | ... | देखभाल<br>(पूर्वी) परिरक्षण<br>[कलम ११६] |
| lift irrigation work | ... | उपसा सिंचनाचे बांधकाम<br>(पूर्वी) उद्धरण (उपसा) सिंचनाचे बांधकाम<br>[कलम ११६ (१)] |
| remark | ... | अभिप्राय<br>(पूर्वी) शेरा<br>[कलम ११६ (२)] |
| such conditions, if any | ... | अशा शर्तीच्या कोणत्याही असल्यास<br>(पूर्वी) अशा शर्तीच्या (तशा शर्ती असल्यास) |
| shall be added | ... | जादा दाखल करण्यात येईल<br>(पूर्वी) भर घालण्यात येईल<br>[कलम ११८ (२) (चार)] |
| irrigation record-of-rights | ... | पाटबंधारेविषयक बांधकामाचा हक्क अभिलेख<br>(पूर्वी) (१) पाटबंधारेविषयक बांधकामाचे अधिकार अभिलेख<br>(२) पाटबंधाऱ्याचे अधिकार अभिलेख<br>[कलम ११९ (१)] |
| revise | ... | सुधारणा<br>(पूर्वी) पुनरीक्षण<br>[कलम ११९ (१)] |
| settle the claims | ... | हक्क मागण्यांची पूर्तता करणे<br>(पूर्वी) दावे निश्चित करणे<br>[कलम ११९ (२)] |
| call in question | ... | प्रश्नास्पद करणे<br>(पूर्वी) हरकत घेणे<br>[कलम १२४ (२)] |

publication of the revised record ... सुधारित अभिलेख प्रसिद्ध करणे
(पूर्वी) सुधारित अभिलेख्याचे प्रकाशन
[कलम १२४ (२)]

back of revetments ... दर्शनी दगडी मागील बाजू
(पूर्वी) दर्शनी बांधकामाची मागील बाजू
[कलम १२५ (१)]

gullies, ruts and holes ... घळी, खाचा व छिद्रे
(पूर्वी) घळी, चाकोऱ्या व छिद्रे
[कलम १२५ (१)]

concealing the condition of such work अशा बांधकामाची स्थिती झाकून टाकणे
(पूर्वी) अशा बांधकामाची स्थिती लपविणे
[कलम १२५ (२)]

recorded in the irrigation record of rights. पाटबंधारेविषयक हक्क अभिलेखात नोंदणी केलेला
(पूर्वी) पाटबंधाऱ्याच्या अधिकार अभिलेखात अभिलिखीत केलेला
[कलम १२७]

irrigator ... भूसिंचक
(पूर्वी) भूसेचक

phase (relevant to crops) ... आडपीक
(पूर्वी) फड
[कलम १२९ (४) (ग)]

compounding of offences ... अपराध सामोपचाराने निकालात काढणे
(पूर्वी) अपराध आपसात मिटविणे

alignment ... आणखी

cognizable ... दखल-पात्र

denotify ... निरधिसूचित करणे

endanger ... धोका उत्पन्न करणे

established course of irrigation ... जलसिंचनाचा प्रस्थापित क्रम

water guage ... जलमापक

measuring device ... मोजणीचे साधन

reckon ... गणना करणे

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.